Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख ६ माहे जलै सन १९१४ इ० [ अंक २६


### वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

### नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुडें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल- तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ६।९।०९ — J. G. Ridlard. एजंट

नो. नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{?}{?}$ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० — J. G. Ridlard. एजंट

न० नं० २

### चांदीचीं भांडीं.

#### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १।८०

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S. I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

### ' विकावयाचा आहे. '

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लौकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ६ — वऱ्हाड

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेम्प्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०१




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. १७

### "खरें पैाष्टिक औषध"

पाहिजे असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकुन गुण देते, असे वंगभस्म वापरा किं. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाळ भस्त तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. ज्यांना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळ्यांत, उन्हाळी लघवींत आग, धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु. शिवाय पैाष्टीकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपैण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमाची जरूरी नाहीं. किं. ८ आणे वि. खु. कॅटलाग मागवा. फुकट--व्ही. आर. मुळे, नांदुरा, जी. आय. पी.

नो. नं. ८

श्रीराम, श्रीहरी, सच्चिदानंद, ॐ दत्त कृष्ण, विठ्ठल, संतदर्शन व मोनोग्राम ह्या कार्डसा ९ प्रुफांत दुर्मीळ साधुसंतांचे २९० फोटो ! किं. २। रु. चौऱ्याशी आसनें, लोकोत्तर चमत्कार, सृष्टींतील अद्भुत चमत्कार व मनोविकार ह्याका. सा. ४ प्रुफांत २०० फोटो ! किंमत १ रुपया.

श्री. वा. नगरकर नाशिक

नो. नं. ९


### नोटीस

नोटीस बेशमी बापूजी उर्फ बारकाजी वा। राघोजी पाटील रा० मौजे गळमगांव इजारा प्र० गिरोली ता० मंगळपीर जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा मुलगा आहेस. मी तुला चार शेतें ईजाऱ्याचे वहितीस दिलें आणि गांवचें पाटीलकीचें काम दिलें त्याप्रमाणें तूं पाटीलकीचें काम करीत जाऊन शेतांतील उत्पन्न खात जावें. तसें तूं वागत नसून माझे शेतांतील माल सर्व तूं घेऊन जातो आणि माझे घरांत येऊन दाळदाणा रुपये व जनावरें तूं घेऊन जातो. माझे जिंदगीची तूं फार धुळधाणी करितो. ईजाऱ्याचे वहित दिलेले इसमापासून रुपये घेऊन खातो. त्या वहितदार लोकांशीं गैर वर्तणुकीनें वागतो. मला शिवीगाळ करून माझी इज्जत घेतोस करितां त्वां माझे नांवावर लोकांचे कर्ज काढूं नये व ईजाऱ्याची शेती कोणास वहितीस देऊं नये. कोणास कोणते प्रकारचा लेख त्वां करून न देणें दिल्यास तूं जबाबदार ठरला जाशील माझे शेतीचे व देण्या घेण्याचे काम त्वां न करावे मी सर्व प्रकारें मजपाशीं इस्टेट आहे तिचा मी मालक आहे. माझा कोणते प्रकारचा व्यवहार त्वां न करावा माझे घरीं येऊन माझा माल पैसा आधला त्वां घेऊन जाऊं नये. माझे मनाप्रमाणें तूं वागत नाहीं. माझी मर्यादा बिलकूल ठेवित नाहीं करितां माझे तर्फे तूं कोणतेही काम देण्याघेण्याचें करूं नये. करितां या नोटीसीनें तुला कळविलें आहे कळावें ता० २२।६।१४ इ.

द० नारायण रामासा महाजन राहणार मानोरा.

सही
राघोजी वा। बापूजी कडसडे
पाटील इजारदार राहणार
गळमगांव इजारा याची
नि० खु० असे
द० नारायण रामास

नो० नं० १०

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषढ शुद्ध १४ शके १८३६

## मुलींचें शिक्षण.

सध्या सरकारचें व सुशिक्षित समाजाचें लक्ष मुलांच्या शिक्षणाकडे अधिकाधिक लागल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत ही सुदैवाची गोष्ट आहे. मुलांच्या सरकारी व खाजगी शाळांची संख्या वाढत आहे. सरकार शिक्षणाकडे अधिक रकमा देत आहे. लोकांनाही शिक्षणाचें महत्त्व कळूं लागून ते खाजगी फंड व संस्था उभारून शिक्षणाचा प्रसार करूं लागले आहेत. शाळेंतल्या शिक्षणक्रमांत अवश्यकता दिसते. तसतसे फेरफार होत आहेत. शिक्षणाच्या सुधारलेल्या पद्धति प्रचारांत येऊं लागल्या आहेत व ट्रेन्ड शिक्षकांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. हें सगळें ठीक चाललें आहे गेल्या दहा वर्षांत झालेली ही शिक्षण विषयक क्रांति पाहून कोणालाही समाधान वाटेल. आणि मृतास्थींत जीवनसंचार झालेला पाहून भावी उत्कर्षा विषयींची उत्कट आशा प्रत्येकाच्या अंतःकरणांत उभी राहील. पण येवढ्यानें फारतर आमचीं मुलें पोटापाण्याला लागतील व देशाची सांपत्तिक स्थिति सुधारेल किंवा सुशिक्षितामधला असंतोष अंशतः कमी होईल. पण तेवढ्यानें आमचीं कुटुंबें सुखी होतील अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. जोंपर्यंत आमच्या गृहिणींना योग्य प्रकारचें शिक्षण मिळण्याची तजवीज होत नाहीं, तोंपर्यंत कुटुंबसुखाची वृद्धि होण्याची फारशी आशा करावयास नको. त्याचप्रमाणें देशाच्या प्रगतीचें सातत्य ही कायम राहील असा भरंवसा बाळगतां येत नाहीं. कारण, मुलाचे पहिले गुरु शाळेंतले ट्रेन्ड मास्तर नव्हेत, तर त्या मुलांच्या आया होत. मुलाच्या शिक्षणाचा पाया त्यांच्या हातून घातला जातो. पुढच्या शिक्षणाची इमारत ट्रेन्ड शिक्षकांनीं जरी चांगली उभारली तरी त्या इमारतीचा पाया जें गृहशिक्षण तो कच्चा राहील तोंपर्यंत ती इमारत भव्य, मजबूत व चिरस्थायी होणार नाहीं. हा पाया घालणाऱ्या आयांच्या शिक्षणाकडे अद्याप जावें तसें लक्ष कोणाचेंच जात नाहीं ही शोचनीय गोष्ट आहे. मुलांबरोबर मुलींच्याही शाळा निघत आहेत व जुन्या चालीच्या कुटुंबांतल्या मुलीही शाळेंत जाऊं लागल्या आहेत ही संतोषाची गोष्ट आहे खरी, पण या मुलींच्या शाळेंत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचें उद्देश्य काय आहे? सध्यां तरी मुलींच्या व मुलांच्या शाळेंतला शिक्षणक्रम बहुतेक एकसारखाच आहे. मुलींच्या शाळेंत शिवणकामासारखा एखादा विषय ज्यास्त शिकविला जात असेल. पण मुलींचा सध्याचा शिक्षणक्रम त्यांना सुगृहिणी बनविण्याच्या कामीं कितीसा उपयोगी पडण्या सारखा आहे हें कोणी पाहत नाहीं. यामुळें होणारे दुष्परिणामाकडे अद्याप कोणाचें लक्षही जात नाहीं. आमच्या समाजांत तरी स्त्री व पुरुष यांच्या कर्तव्याचीं क्षेत्रें निरनिराळीं आहेत. आमच्या बायकांना सफ्रेजेट सारखे किंवा अमेरिकन बायकासारखे आफिसांतून, दुकानांतून, किंवा स्वतंत्र कारखान्यांतून नोकऱ्या मिळतील किंवा त्या पार्लमेंट किंवा कांग्रेसपुढें उभ्या राहून पुरुषांच्या बरोबरीनें हक्कासाठीं भांडतील तो दिवस अद्याप दूर आहे. पण आजच्या आमच्या समाजाच्या स्थितीला अनुरूप असें स्त्रियांचें काम ह्मणजे गृहव्यवस्था व लहान मुलांचें शिक्षण हें आहे. आमच्या गृहिणींची हींच मुख्य कर्तव्यें आहेत, आणि हीं करण्याची पात्रता येण्यास अवश्य लागणारें शिक्षण सध्याच्या मुलींच्या शाळेंतून देण्यांत येतें काय हा प्रश्न आहे. स्पष्टपणें बोलावयाचें ह्मणजे तसें कांहीं एक होत नाहीं, उलट गृहव्यवस्थेच्या ज्ञानाचा गंधही त्यांना प्राप्त होत नाहीं, उलट गृहकृत्याविषयीं कंटाळा उत्पन्न होईल, आणि नाटकें, कादंबऱ्या, व गोष्टींचीं पुस्तकें वाचूनच काळ कंठावा अशी प्रवृत्ति होण्यासारखें शिक्षण मात्र शाळांतून व शाळेच्या बाहेर देण्यांत येत असतें. शिवणकाम हा गृहव्यवस्थेविषयींचा एक विषय मुलींच्या शिक्षणक्रमांत ठेविलेला असतो. पण त्यांतही मुलांचीं अंगडीं टोपडीं किंवा परकर चोळ्या बेतणें व शिवणें इकडे लक्ष न देतां इंग्रजी मडमांच्या तऱ्हेवर जाळीदार पोलकीं शिवणें किंवा ज्याचा गरिबीच्या संसारांत बिलकुल उपयोग नाहीं असें दुसरें शिवणकामाचे प्रकार शिकविण्यात येतात. उपयोगापेक्षा व काटकसरीपेक्षां शोभा व फ्याशन यांच्याकडेस अधिक लक्ष असतें. पण इकडे कधीं स्त्रीशिक्षण प्रसारेच्छु लोकाग्रणींचें व सरकारी अधिकाऱ्यांचें लक्ष गेलें आहे काय? मुलगी चक्रवाढ व्याजाचीं उदाहरणें भराभर सोडविते, पण घरांतले साधे दुधवाल्याचे हिशोब तिला करतां येत नाहींत. व्याकरणातले नियम घडाघड पाठ ह्मणते, पण घरांतला केर कसा काढावा संध्येपूजेचें कसें मांडावें, किंवा चार पानें कशीं वाढावीं तें तिला कळत नाहीं. रसायनशास्त्राचे प्रयोग व सृष्टिशास्त्रांतले चमत्कार. ती शाळेंत पाहते, पण घरीं चार माणसाला रोज कणीक, तांदूळ, डाळ, तिखट, मीठ, वगैरे किती लागतें याचें तिला बिलकुल ज्ञान नसतें, व ही माहिती करून घेणें अवश्य आहे असें तिला वाटत नाहीं. अर्थात घरच्या कामाकडे दुर्लक्ष होतें. जमेचा व खर्चाचा मेळ राहत नाहीं, आणि घरच्या माणसांना अशी शिकलेल्या मुलींची काडी इतकी सुद्धां मदत होत नाहीं. ही स्थिति समाधानकारक आहे काय या प्रश्नाचें उत्तर सामाजिक परिषदेचे अध्यक्ष किंवा इतर स्त्री सुधारणेच्छु मंडळी काय देईल? सगळ्याच मुली पुढें विलायतेस जाऊन एल. आर सी. पी. व्हावयाच्या नाहींत, किंवा सगळ्यानाच अविवाहित राहून श्रीमंत बापाच्या जिवावर मौजा मारता यावयाच्या नाहींत. त्यापैकीं पुष्कळ जणींना गरीब किंवा मध्यम स्थितींत आपल्या पतीच्या संसाराचा गाडा ओढावा लागेल. पुष्कळ जणींना योग्य काळीं अपत्य संगोपन व बालशिक्षणाची जबाबदारी पतकरावी लागेल. ती जबाबदारी येऊन पडण्यापूर्वी तिच्या अंगीं ती सहन करण्याची पात्रता हल्लींच्या शिक्षणक्रमानें येईल असें जर कोणास वाटत असेल तर तो निवळ भ्रम आहे. मुलींच्या शाळेंतल्या अभ्यासक्रमांत भूगोल, इतिहास, गणित, व्याकरण वगैरे विषय थोडेसे कमी झाले तरी पत करतील, पण गृहव्यवस्थेला, आरोग्यविज्ञानाला, गृहकृत्यांच्या शिक्षणाला व व्यवहारोपयोगी शिवणकामाला अवश्य स्थळ मिळालें पाहिजे. हल्लीं जें मराठींत वाङ्मय तयार होत आहे त्यांत सुद्धां गृहव्यवस्थे संबधाचें पुस्तक एक सुद्धां असूं नये ही किती शोचनीय गोष्ट आहे! नुसतें मनोरंजन करण्यावर किंवा फार तर लोण्याचीं भजीं, बटाट्याचीं पक्वान्नें यासारखे श्रीमंती चोचले शिकविण्यावर मनोरंजन कारांचा सारा भर! पण गरीब स्थितींतल्या मुलींनीं कसा टापटिपीनें संसार करावा याबद्दल लेख येईल तर शपथ! सगळ्या शाळा सगळीं मासिक पुस्तकें, सगळें वाङ्मय श्रीमान् व सुखवस्तु लोकांसाठीं आहे, गरिबां करितां कांहीं नाहीं, किंवा नसावें अशी कां आमच्यांतल्या विद्वान् संपादकांची समजूत आहे? खरोखर आमच्या मुलींचें सध्याचें शिक्षण गृहकृत्यां विषयीं पराङ्मुखता उत्पन्न करणारें असल्यामुळे त्याला उत्तेजन देण्यापेक्षां तें नसलेलें बरें असें ह्मणण्याची पाळी येईल कीं काय अशी भीती वाटते. या संबंधांत जून महिन्याच्या 'नवयुगा' च्या अंकांत रा. पळ्ळकर यांनीं जो इषारा दिला आहे तो सर्वथा योग्य आहे, आणि समाजाचे पुढारी तिकडे वेळेवर लक्ष न देतील तर सध्याच्या एकांगी शिक्षणाचे दुष्परिणाम लवकरच दृगोचर झाल्यावाचून राहणार नाहींत. अशी आमची समजूत आहे. स्त्रीशिक्षण प्रसारेच्छु मंडळीनें व आपापल्या मुलींचें कल्याण इच्छिणाऱ्या आईबापांनीं या गोष्टीचा विचार केल्यावांचून आतां चालावयाचें नाहीं.

---

## आर्यवैद्यक.

आमच्या लोकांनीं आर्य वैद्यकाची महती यथार्थ रीतीनें वर्णन केली आणि त्याला युनिव्हर्सिटीच्या वैद्यकी शिक्षणक्रमांत जागा द्या ह्मणून ह्मटलें कीं लागलीच कांहीं परप्रकाश मंडळी अशा मागणीची टर उडविते आणि वेदांतून टेलिफोन आणि आगगाड्या काढणारांच्या पंक्तीला अशी सूचना करणारास बसवून आर्यवैद्यशास्त्र अगदीं नादान आहे असें जाहिर करते. मुंबईचे डा० नरिमन हे अशा मंडळींत प्रमुख आहेत. वाग्भटाचें मराठी भाषांतर करणार पुण्याचे डा० गर्दे यांनीं सुद्धां एकदां वसंत व्याख्यान मालेंत अध्यक्षाच्या आसनावरून आर्यवैद्यकाचा उपहास केला होता. पण आता खुद्द पाश्चात्य शास्त्रज्ञ सुद्धां आर्यवैद्यकाचें स्तोत्र गाऊं लागले आहेत. अमेरिकेंत वाशिंग्टन येथील वैद्यक लायब्ररीचे लायब्रेरियन डा० गॅरिसन यांनीं लिहिलेला वैद्यशास्त्राचा इतिहास नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत आर्य वैद्यकांत कोणकोणत्या गोष्टी चांगल्या आहेत व पाश्चात्य वैद्यक आर्यवैद्यकाचें किती ऋणी आहे हें सांगतांना त्यांनीं ह्मटलें आहे कीं मालिश करणें, मोहिनी विद्या ह्मणजे हिप्नॉटिझमच्या प्रयोगांनीं रोग बरे करणें, देवी टोचणें, वगैरे गोष्टी पाश्चात्यांच्या अगोदर कित्येक शतकें आर्यांना उत्तम प्रकारें अवगत होत्या. त्याच प्रमाणें अत्यंत कठीण असे शस्त्रप्रयोग सुद्धां आर्यवैद्य करीत असत. अफू, गांजा वगैरे मादक पदार्थांचा औषधांत उपयोग करण्याची विद्या मूळची आर्यांची हें निर्विवाद आहे. अजून ही वैद्य लोकांना शारीरशास्त्राची किंवा रसायनशास्त्राची माहिती नसली तरी औषधी वनस्पतींचें परंपरागत ज्ञान त्याना उत्तम प्रकारचें असतें. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेणारा मात्र कोणी दिसत नाहीं. सगळे पाश्चात्य ज्ञानाच्या प्रकाशानें अंध होऊन आपल्या जवळ पडलेल्या दिव्य रत्नाची अवहेलना करीत आहेत. आह्मांस स्वानुभवावरून ठाऊक आहे कीं कलकत्त्यास कित्येक असे उत्कृष्ट आयुर्वेदज्ञ वैद्य आहेत कीं त्यांच्यापुढें सर्जनजनरलचें तेज पडत नाहीं. त्यांच्या काढ्यामध्याच्या औषधानें गोरगरीब रोगी बरे होतात तितके विलायती, महाग, व श्रीमंतीसच लभ्य होणाऱ्या औषधांनीं होत नाहींत. पण ते बिचारे अंधारांत पडून राहिले आहेत. खऱ्याचें मोल होत नाहीं हीच गोष्ट खरी.

---

## भावी व्हाइसराय.

लॉर्ड हार्डिंज साहेबांची लोकांना प्रिय झालेली कारकीर्द आणखी दोन वर्षांनीं वाढवावी ह्मणून अर्ज करण्यासाठीं हिंदुस्थानांतल्या प्रमुख शहरांतून ज्या दिवशीं सभा झाल्या त्याच दिवशीं किंवा लगेच विलायतच्या डेलीमेल पत्रांत लॉर्ड हार्डिंज यांच्या नंतर त्याचे जागीं लॉर्ड किचनर यांची नेमणूक होण्याचे बहुतेक ठरलें असल्याची तार प्रसिद्ध झाली ही गोष्ट काकतालीय न्यायानें घडली असली तरी ती सहेतुक असावी अशी शंका घेण्यास पुरेसें कारण आहे. लॉर्ड हार्डिंज यांच्या राज्यकारभाराचें धोरण हिंदुस्थानांत शांतता प्रस्थापित करून हिंदी लोकाना सहानुभूतीनें वागविण्याकडे आहे हें दिसूं लागताच आमचे व्हाईसराय साहेब राजीनामा देणार अशा कंड्या कित्येक पत्रांतून फडकूं लागल्या, आणि शेवटीं खुद्द लॉर्ड हार्डिंज साहेबांनीं आपली मुदत संपण्यापूर्वी विलायतेस परत न जाण्याचा आपला निश्चय भाषणांत स्पष्टपणें सांगताच त्यांचें तोंड गप्प झालें. पण खोडसाळपणाची खोड अशी थप्पड मिळाल्यानें थोडीच जाणार आहे? त्यांनीं आतां लॉर्ड किचनर साहेबांचें नांव पुढें करून पूर्वीचीच कंडी निराळ्या स्वरूपानें पुढें आणिली आहे इतकेंच. वस्तुतः सध्याच्या प्रधान मंडळीला आयरिश होमरूल बिल अमेंडमेंट बिल, इंडिया हौस सुधारणा बिल वगैरे संबंधांत इतकीं जरूरीचीं व महत्वाचीं कामें आहेत व त्यांचे स्वतःचच पाय अधिकाराचे जागीं टिकतील कीं नाहीं याविषयीं येवढी जबरदस्त शंका आहे कीं हार्डिंज साहेबांची मुदत संपण्यापूर्वी १८ महिने त्यांच्या जागीं कोणास नेमावें या गोष्टीचा विचार हातीं

घेण्या इतकें मूर्ख प्रधानमंडळ खास नाहीं ही गोष्ट डेलीमेलकर्त्यास कशी समजू नये हेंच आश्चर्य आहे. लॉर्ड हार्डिंज साहेबांची मुदत वाढविण्यासंबंधानें अर्ज करणारांना ही गोष्ट ठाऊक नाहीं असें नाहीं. तथापि सध्याच्या व्हाइसरायासंबंधानें सर्व जातींच्या लोकांचें मत किती अनुकूळ आहे व तेच आणखी कांहीं वर्षे हिंदुस्थानांत व्हाइसराय राहावेत अशी लोकांची कशी उत्कट इच्छा आहे तें बादशहाच्या कानावर घालून त्याची नोंद सरकारी दप्तरात राहावी येव ढ्याच साठीं त्यांनीं तरी इतक्या घाईनें सभा भरविल्या आहेत. या सभा स्वयंभू नसून ना. मि. अली इमाम यांच्या सारख्यांच्या प्रेरणेनें झाल्या आहेत असें ही सुचवि-णारें धाडस स्टेटस्मन् सारखीं पत्रें बेधडक करीत आहेत. त्यासंबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं तसा प्रकार आहे अशी घटकाभर कल्पना केली तरी देशातले हिंदु व मुसलमान हे दोन्ही ही पक्ष ना. मि. अली इमाम यांची सूचना एकमतानें पसंत करताना दिसतात, यावरून ना. मि. अली इमाम हे जरी सरकारी अधिकारी असले तरी त्यांचेवर लोकांचा अमर्याद विश्वास आहे ही गोष्ट कांहीं थोडी थोडकी समाधान मानण्यासारखी नाहीं.

---

## परदेशीं जाऊन काय शिकावें?

आमच्यांतले पुष्कळ लोक इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, वगैरे देशांत जातात आणि प्रवासाचे पायीं लाखो रुपये दरसाल उडवितात. पण इतका अंगी खर्च करून त्यांनीं आजपर्यंत कोणती उपयुक्त गोष्ट इकडे आणिली आहे असा प्रश्न केला तर फारच थोड्यांनीं आपल्या देशच्या पैशाचा सद्व्यय केला असें म्हणता येईल. कोणी ब्यारिस्टर, किंवा डाक्तर होऊन येतात, आणि स्वतःच्या प्राप्तींत भर घालतात ही गोष्ट खरी आहे. पण देशाच्या फायद्याची अशी कोणती गोष्ट त्यानीं आणिली आहे? तेच अमेरिकन, जर्मन, वगैरे लोकाकडे पहा. ते लोक इकडे येतात ते आपले डोळे बरोबर घेऊन येतात, आणि इकडे कोणत्या गोष्टी चांगल्या किंवा वाईट आहेत तें नीट पाहून त्यांची नोंद करतात, व स्वदेशीं गेल्यावर आपण मिळविलेल्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशाला देतात व्या पारी व्यापारासंबंधानें, मिशनरी धर्मासंबंधानें, मुत्सद्दी राजकारस्थानासंबंधानें व शिल्पी शिल्पकामासंबंधानें इकडची माहिती नेऊन आपल्या देशाचा फायदा करतात. तसें आमच्या किती देश-बंधूंनीं केलें आहे? जर्मनींतली शिक्षणपद्धती व व्यापार वृद्धिंगत करण्याच्या युक्त्या, इंग्लंडमधली म्युनिसिपालिटीची व्यवस्था, अमेरिकेंतली लोकतंत्रानें संस्था चालविण्याची पद्धति, स्वित्झर्लंडमधला शारीरिक शिक्षण देण्याचा प्रकार, इटली-मधली चित्रकला व गायन, हालंडमधलें थोड्या खर्चांत कालवे काढण्याचें कौशल्य, इ० गोष्टी शिकण्यासारख्या नाहींत असें आमच्या लोकांना वाटतें काय? या दृष्टीनें पाहतां कविवर्य डा० रवींद्रनाथ टागोर यांनीं आपल्या विलायतच्या प्रवासाचें साफल्य केलें असें म्हटलें पाहिजे. त्यांनीं विलायतेस जाऊन कीर्ति मिळविली, पण त्या बरोबरच आपल्या देशाच्या हिताचे ही विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होते. त्यांनी तिकडच्या उत्कृष्ट प्रतीच्या शाळेच्या नमुन्यावर आपली शाळा चालविण्यासाठीं त्या पद्धतीची माहिती करून घेतली. त्याचप्रमाणें हिंदुस्थानचें दारिद्र्य घालविण्याचा एक उपाय जाणणारा कॅ० पेटव्हिल नांवाचा एक इसम इकडे आणून त्याच्या करून उद्योगधंद्याचीं कामें शिकविणारी मुलांची एक संस्था काढण्याचा व अशा उद्योगधंद्याच्या वसाहती इकडे काढण्याचा विचार करून तो अंमलांत आणण्यास ही सुरुवात केली आहे. ही त्यांची योजना लार्ड क्रू सारख्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांस ही पसंत पडली आहे व ही योजना पार पाडण्यासाठीं डा० रवींद्रनाथ आपली मोठी थोरली इस्टेट ही देण्यास तयार झाले आहेत. ईश्वर त्यांच्या या प्रयत्नास यश देवो.

---

## संस्कृत साहित्य संमेलन.

हरिद्वार येथें हें संमेलन महामहोपाध्याय सतीशचंद्र विद्याभूषण एम्. ए. पि. एच्. यांच्या अध्यक्षत्वाखालीं भरलें होतें. या प्रसंगीं अनेक विद्वानांचीं चांगलीं भाषणें झालीं, पण संस्कृत साहित्याची उन्नति हा प्रश्न बाजूलाच राहून ब्रह्मचर्य, बालविवाह वगैरे निराळ्या विषयावरच वक्त्यांनीं प्रतिपादन केलें! तथापि या प्रसंगी ना. मि. मदन मोहन मालवीय यांच्या भाषणात एक गोष्ट चमत्कारिक रीतीनें बाहेर पडली, म्हणून तिचा उल्लेख येथें करणें अवश्य आहे. ते म्हणाले कीं मुलांनीं ब्रह्मचर्य पाळावें असा उपदेश येथें अनेक वक्त्यांनीं आपल्या भाषणांत केला, पण ब्रह्मचर्य हें नुसत्या मुलांकरिताच नाहीं तें पालकानीं—मुलांच्या आईबापांनींही—कडक रीतीनें पाळलें पाहिजे अशी शास्त्रांची आज्ञा आहे. गोष्ट अगदीं खरी आहे. पण आमचा समाज कोठें तें लक्षांत घेतो? आहार, निद्रा व मैथुन या तिन्हो बाबतींत आमचा समाज अतिरेक करीत आहे हें डोळे उघडून पाहणारास सहज दिसणार आहे. लोकांत दारिद्र्य वाढत आहे अशी एकीकडे आम्ही ओरड करतों आणि दुसरीकडे पाहावें तों मोठाल्या शहरांतूनच नव्हे तर लहानसान गांवांतूनसुद्धां चहापानाचीं व फराळाचीं दुकानें झपाट्यानें उघडण्यांत येत आहेत. हें दारिद्र्याचें किंवा मिताहाराचें लक्षण म्हणावयाचें काय? पूर्वींचे लोक प्रातःकाळीं चार वाजतां उठून आपल्या नित्यक्रमाला लागत. आतां लोक सूर्यवंशी बनले आहेत. निद्रेसंबंधानें मितपणा वाढत आहे असें यावरून कोणी म्हणेल काय? तिसऱ्या गोष्टीसंबंधानें तर मौन धरणेंच बरें असें आम्हांस वाटतें. इतकी शोचनीय आमच्या समाजाची सद्यःस्थिति आहे. प्रेमविषयक कादंबऱ्या व नाटकें यांना आलेला महापूर कामोद्दीपक औषधांच्या वाढत्या संख्येच्या बरोबर पुढेंपुढें पाऊल टाकीत आहे. नाटक मंडळ्या या आमच्या तरुण मंडळीच्या नाकाचे बाल होऊन बसल्या आहेत. रंगभूमीवर प्रेमविषयक नाटकांचे जे प्रयोग होतात, त्याच्या दशांशानेंसुद्धां उच्च प्रतीच्या मनोवृत्तींना उत्तेजित करणाऱ्या नाटकांचे प्रयोग होत नाहींत. या नाटकांतून मधून मधून दिसणारे देखावे, अभिनय, आणि विनोद इतके निकृष्ट प्रतीचे असतात कीं, कोवळ्या मनाच्या तरुणाना व तरुणींना कुमार्गाला लाविल्यावाचून ते राहतात असें म्हणणें म्हणजे निव्वळ डोळ्यावर कातडें ओढण्यासारखें आहे. अशा स्थितींत ब्रह्मचर्याचे शास्त्रनियम पाळण्याबद्दलचा उपदेश पालथ्या घागरीवर पाणी ओतण्या सारखा आहे. दुसरी एक गोष्ट ना. मि. मालवीय यांच्या तोंडून निघाली ती अगीच महत्त्वाची आहे. ते म्हणाले कीं आमच्या लोकांत दीर्घ प्रयत्न करण्याची संवयच नाही. युरोपांत ती आहे. सत्कार्याला पैसा मिळत नाहीं ही ओरड व्यर्थ आहे. हिंदुयुनिव्हर्सिटी साठीं ९० लाख काय पण १०।१२ कोट रुपये सुद्धां जमविण्याची माझी हिंमत आहे. त्या कामीं माझा शरीरपात झाला तरी बेहत्तर आहे. माझा आत्मा तें काम कोणत्याना कोणत्या तरी रूपानें करीत राहील. साठीच्या जवळ जवळ गेलेल्या देशभक्ताचे हे उद्गार आहेत. ना. मि. मालवीयांचीही हिंमत जितकी प्रशंसनीय तितकीच अनुकरणीयही आहे असें कोण म्हणणार नाहीं?

---

## रा० ब० गंगाप्रसाद वर्मा.

दुष्ट काळानें गेल्या महिन्यांत लखनौचे सुप्रसिद्ध कांग्रेसभक्त व अॅडव्होकेट पत्राचे संपादक रायबहादूर मुनशी गंगाप्रसाद वर्मा यांच्यावर अचानक झडप घालून त्यांचा बळी घेतला. हे हिंदु व मुसलमान दोहोंत सलोखा ठेवून सार्वजनिक कामें मोठ्या उल्हासानें करणारे होते. हे कांग्रेसभक्त होते तरी यांची म्युनिसिपालिटींतली व इतर सार्वजनिक सेवा उत्कृष्ट प्रतीची पाहून सरकारानें यांना रायबहादुर या पदवीनें भूषित केलें होतें. संपादकाच्या व्यवसायांत पडलेल्यांना सरकारच्या अनुग्रहाचा लाभ घडल्याचीं उदाहरणें आमच्या देशांत फारच दुर्मिळ आहेत. पण अशा दुर्मिळ व्यक्तींपैकीं हे एक होते. 'नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता' असें एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे आणि ती गोष्ट अनुभवाला ही पटते. म्हणूनच रा० ब० मुनशी गंगाप्रसाद वर्मा यांच्यासारखे पुरुष हरपल्याबद्दल सरकारी अधिकारी व लोकपक्ष या उभयतांना ही हळहळ वाटून राहिली आहे, आणि यांच्या मृत्यूबद्दल शोक प्रदर्शित करण्यासाठीं लखनौचे जिल्हाधिकारी व हिंदु आणि मुसलमान ख्रिस्ती वगैरे ज्ञातींचे नायक सभा भरून त्यांचें स्मारक करण्याचें ठरलें ही गोष्ट त्यांच्या सर्वसामान्य लोक प्रियतेची साक्ष देणारी आहे. अशा सत्पुत्राचा शोक करण्यास त्यांची वृद्ध मातुःश्री अद्याप मागें हयात आहे! काय तिची अवस्था झाली असेल!

---

## स्टेट्समनचें धाष्टर्य.

कलकत्याचें स्टेट्समन् पत्र थोड्या वर्षांपूर्वी मि० एस० रॅटाक्लिफ यांच्या संपादकत्वाखालीं होते तेव्हां लॉर्ड कर्झन यांच्या संबंधानें कांहींशी कडक टीका त्या पत्रांत येतांच हिंदुस्थानसरकारानें त्यावर किंचित् वक्र दृष्टि फिरविली. त्याबरोबर त्या पत्राच्या मालकानें रॅटाक्लिफ साहेबांचा त्या पत्राशीं असलेला संबंध तोडून रंग पालटला आणि तेव्हांपासून तें सरकारच्या धोरणाला सर्वतोपरी अनुकूळ आणि देशी लोकांच्या चळवळीला हाणून पाडण्यांत सर्वथा तत्परता दाखविणारें बनलें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. पण सरकारची आपणावर पूर्ण कृपादृष्टि आकर्षून घेणाऱ्या या पत्राचें धाष्टर्य आतां इतकें अमर्याद वाढलें आहे कीं त्या पत्राचे चालकाच्या पुढें प्रेस आक्ट अगदीं निर्बळ तरी असला पाहिजे किंवा त्या आक्टाला अपवाद ठरविण्या इतकी सरकारची त्यावर मेहेरबानी तरी असली पाहिजे अशी शंका कोणाच्याही मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. कलकत्याहून राजधानीचें ठिकाण उचलून दिल्लीला नेलें तेव्हांपासून हें पत्र हिंदुस्थानसरकारवर विशेषतः लार्ड हार्डिंज साहेबावर चरफडत आहे आणि सरकारच्या या कृत्यासंबंधानें उल्लेख करण्याचा केव्हांही प्रसंग आला तरी आपलें अपशब्द भांडार खुलें केल्याखेरीज त्याच्यानें राहवत नाहीं. लोकांनीं विश्वासानें स्वाधीन केलेल्या पैशाची उधळपट्टी करणारें, बेमुर्वतखोर, उद्दाम, लटपटी, पाताळयंत्री वगैरे सारख्या विशेषणांचा सरकारवर वर्षाव करूनच हें पत्र राहिलें नाहीं, तर सरकारी अधिकारी व रयत यांच्यांत कायमची दुही उत्पन्न करून ठेवणारे लेख या पत्रांत बेलाशक येत असतात. लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकिर्दीची मुदत वाढविण्याविषयींचे अर्ज करण्याची चळवळ लोकांनीं खरी मनापासून केलेली नाहीं. ती हिंदुस्थान सरकारचे न्यायमंत्री ना. मि. अलीइमाम यांच्या उठावणीनें झालेली आहे. ना. अलीइमाम हे लॉर्ड हार्डिंज यांची खुशामत करीत असतात. आणि व्हाइसराय साहेबानीं त्यांना तोंडीं लाविलें आहे अशा प्रकारचीं व्यंगविधानें स्टेट्समननें केलीं आहेत. तीं पाहून त्या पत्राच्या संपादकाच्या धाष्टर्याचें किंवा हिंदुस्थान सरकारच्या सहिष्णुतेचें अधिक कौतुक करावें तें कळत नाहीं. या पत्राला कलकत्याच्या चेंबर ऑफ कॉमर्स सारख्या धनवान् आणि वजनदार गोऱ्या संस्थेचा पाठिंबा असला म्हणून प्रेस आक्टची मात्रा त्यावर चालूं नये अशी त्यांत काय जादू आहे ती कळत नाहीं.

---

## अलबानिया

अलबानियाची अवस्था सध्या अत्यंत शोचनीय झाली आहे. बंडवाल्यांनीं त्या देशाची राजधानी डुराझो यास वेढा दिला आहे. अलबानियाच्या शोचनीय अवस्थेचें दुसरें एक प्रमाण हें आहे कीं तेथील राणीच्या विनंतीवरून रुमानियाच्या राणीनें अलबानियाच्या राजपुत्राचें रक्षण करण्यास आपण तयार आहों असें कळविलें आहे. या राजपुत्राच्या रक्षणार्थ

आस्ट्रिया व इटली या देशांचीं आरमारेंही सज्ज होऊन बसलीं आहेत. इकडे बंडवाल्यांनीं एकामागूनएक ठाणीं सर करून तेथें तुर्की पताका उभारल्या आहेत यावरून अलबानियांतल्या मुसलमानांना तेथील राजाच्या अमलाखालीं राहण्याचा किती कंटाळा आला आहे तें दिसून येतें.

## महा लाभ.

आमच्या नगरीला गेल्या गुरुवारी व शुक्रवारीं विशेष शोभा आली. आलिशान नामदार सर बेंजामिन् राबर्टसन् यांचा येथें दोन दिवस मुक्काम होता. ह्मणून सरकारी लोक व इतर नागरीक यामध्यें एकच धांदल व गडबड उडाली होती. सर राबर्टसन् कार्यकर्ते व प्रेमळ मुत्सद्दी असल्याकारणानें सरकारी लोकांपेक्षां प्रजाजनांचे मनांत त्यांचें विषयीं विशेष आदर व प्रेम वास करीत आहे. येथील म्युनिसिपालिटीनें त्यांचा अत्यंत गौरव केला आणि सर्व नागरिकांतर्फे त्यांस मानपत्र सादर करण्याचा समारंभ मोठ्या थाटाचा झाला. गेल्या गुरुवारीं सकाळीं ज्युबिली पार्कच्या भव्य मैदानांत असलेल्या क्रिकेट पॅव्हिलियन्ला जोडून शामियाने देऊन ठिकाठिकाणीं कमानी उभारून निरनिराळ्या रंगाच्या पताकांनीं विशेष शोभा आणिली होती. कमानीवर मोठ्या सोनेरी अक्षरांत सर साहेबांच्या दक्षिण आफ्रिकेंतील कामगिरीचें द्योतक असें ( Long live the peacemaker ) “ साम मंत्री चिरायु होवो ” आणि या सारखीं इतर अभीष्ट चिंतनाची वाक्यें झळकत होतीं. साहेबबहादुरांची स्वारी सकाळीं बरोबर सवासात वाजतां स्टेशनवरून परभारे सभास्थळी येतांच त्यांस येथील रिझर्व पोलिस फोर्सकडून त्यांच्या वाद्यांनीं मोठ्या जयघोषांत संगिनींची सलामी देण्यांत आली. साहेबबहादूर स्वस्थानीं विराजमान होतांच रा. रा. रामचंद्र मार्तंड गुते, व्हाइसचेअरमन, आकोला म्युनिसीपालिटी, यांनीं म्युनिसिपालिटीचें मानपत्र वाचून दाखविलें आणि तें एका सुंदरशा रौप्य करंडकांत घालून साहेब बहादुरांस सविनय व सप्रेम सादर करण्यांत आलें. मानपत्राची भाषा सुंदर होती. अर्थात ती स्तुतिपर होतीच. पण स्तुति सत्पात्रींच होत असल्यामुळें तिनें मानपत्र विशेष खुलविलें होतें. या समारंभाकरितां सर्व अधिकारी, शहरातील शेट सावकार व इतर प्रमुख प्रमुख सभ्य ग्रहस्थांचा मोठा जमाव जमला होता. मानपत्रास उत्तर देतांना आलिशान् सर राबर्टसन् साहेबांनीं मुख्य मुख्य प्रचलित गोष्टी संबंधानें स्थानिक सरकारचें धोरण चांगलें व्यक्त केलें आहे. रा० गुते व इतर म्युनिसिपालिटीचे सभासद यांना उद्देशून ते ह्मणाले कीं या प्रसंगीं आकोल्याला येण्याचा विशिष्ट उद्देश हा कीं या शहराला पाण्याचा चांगला पुरवठा करण्याकरितां जीं नुकतींच कामें सुरु करण्यांत आलीं आहेत तें स्थल स्वतः पहावें. या कामास मूर्तस्वरूप येण्यास बराच काळ लागला आणि प्रत्यक्ष कामास सुरुवात होण्यास झालेल्या विलंबामुळें आपण सहाजिकपणें अतूर झाला असाल. या पाण्याच्या योजनेसंबंधानें लोटलेला काल व्यर्थ गेला नाहीं हें मी आपणाला खात्री पूर्वक सांगतों. वऱ्हाडसारख्या अनिश्चित पर्जन्याच्या प्रदेशांत आमच्या इंजीनिअर मंडळींना पाणी आणण्याच्या योजनेसंबंधानें विशेष दक्षता आणि काळजी घेऊन वागावें लागतें. या शिवाय ही आकोल्याची योजना पुष्कळशा मोठ्या खर्चाची आहे. या पाण्याच्या संबंधाचा बोजा या नगरीला किती उचलावा लागेल हें नक्की कळणें फार आगत्याचें होतें ह्मणून त्याची अंदाज पत्रकें होतां होईल तों नक्की करण्याची विशेष काळजी घेतली आहे.

आतां तर या कामाला आरंभ झालाच आहे. मेजर ओल्डहाम साहेबांना हें काम शक्य तितकें लवकरीनें पुरें करण्याबद्दल विशेषेंकरून सांगितलें आहे. शहरांत पाणी चांगलें खेळूं लागलें ह्मणजे लागलींच एक पाणी पट्टी बसवून जो हल्लीं आपण मोठा खर्च करीत आहां त्याचें कर्ज फेडण्याचें आपणाला सामर्थ्य येईल. गेल्या दोन तीन वर्षांमध्यें आकोल्यास पाण्याच्या टंचाईमुळें फार हाल भोगावे लागले ही गोष्ट आमच्या लक्षांत आहे. पाण्याच्या टंचाईमुळें लोकाचे हाल होऊन शिवाय आकोल्यासारख्या मोठ्या व मुख्य शहराची वाढहि खुंटली होती. या शहराची भरभराट व्हावी व व्यापार धंदा वाढावा या उद्देशानें सरकारनें ही योजना मुद्दाम हातीं घेतली आहे.

पाण्याच्या पुरवठ्याबरोबरच ड्रेनेजची ही मागणी आपण केली आहे. तीही हलके हलके मिळेल. परंतु आह्मीं अनेकवेळा जाहीर रीतीनें सांगितल्याप्रमाणें हल्लीं वऱ्हाडांतील बऱ्याच शहरामध्यें वरचेवर पाण्याची टंचाई भासते ती दूर करून चांगला पाण्याचा पुरवठा करण्याकडे प्रथम लक्ष पुरविलें पाहिजे. तों पर्यंत आपणासर्वांनीं म्युनिसिपालिटीच्या गंगानळीकडे लक्ष पुरवावें तें बरें. आपलें तिकडे दुर्लक्ष नाहीं हें मी जाणून आहे. तथापि सुधारलेल्या पद्धतीच्या आरोग्याचे व स्वच्छतेचे फायदे मिळविण्यासाठीं ज्यामानानें आपण खर्चहि करण्यास तयार होऊन खरी कळकळ दाखवाल तेव्हांच हे फायदे घेण्याला आपण अधिकारी व्हाल.

शाळांसाठीं चांगल्या इमारती बांधण्याकडे आपलें अधिक लक्ष आहे हें पाहून आह्मास आनंद वाटतो. आपणास ठाऊक असेल कीं प्राथमिक शाळांसाठीं इमारती बांधण्याकरितां हिंदुस्थान सरकारकडून पांच लाखाची जी देणगी देण्यांत आली आहे तिचा विल्हेवारीनें उपयोग करण्याबद्दल नुकतेच हुकूम सुटले आहेत. या शिवाय प्राथमिक शाळांसाठीं सालोसाल दिल्या जाणाऱ्या आवर्त देणग्यापैकीं जी अद्याप शिल्लक राहिली आहे तीहि शालागृहें बांधण्याकडे खर्च करण्याचा विचार ठरला आहे. या आवर्त देणग्या हिशोबी वर्षाच्या आरंभीं ठरविण्यांत येतात. आणि त्या देणग्यांचा संपूर्ण रितीनें उपयोग होण्याला वेळ लागतो व त्यमुळें जी शिल्लक रहाते तिचा उपयोग कायमच्या कार्याकडे करावा लागतो. शालागृहांच्या उपयोगासाठीं दीड लाख रुपये मिळण्या सारख्या होतील असा अंदाज आहे. आणि या रकमेंतीं आकोल्याच्याही वाट्याला कांहीं येईल अशी आह्मास उमेद वाटते.

आकोल्यास स्त्रियासाठीं एक चांगल्या प्रतीचे रुग्णालय स्थापण्यासंबंधानें जी योजना चालू आहे तिचा मी येथें आहे तोंपर्यंत आपल्या कमिशनर साहेबांबरोबर विचार करणार आहे प्रांतिक उत्पन्नांतून कांहीं मदत मिळावी ह्मणून रा० स्टॅंडन साहेबांनीं आह्मांकडे लिहिलें आहे. रुग्णालयाची इमारत व त्याला लागणारीं उपकरणीं यांच्यासाठीं लोकांकडून वर्गणी उभारण्यांत येत आहे. तेव्हां ज्यामानानें लोकाश्रय मिळेल त्याच मानानें सरकारांतून आपणाला मदत देण्यास आह्मी सिद्ध आहों. गेल्या कांहीं वर्षांत हें शहर व हा जिल्हा याची पुष्कळ भरभराट झाली आहे. ह्मणून मला खात्री वाटते कीं, वऱ्हाडचा जो जुना लौकिक आहे त्याला अनुरूप अशा उदार देणग्या या प्रकारच्या संस्थेला मिळतील. स्त्रियांना औषधोपचार मिळण्याची फार जरूर आहे हें सरकारच्या पूर्णपणें लक्षांत आहे आणि त्यापेक्षांही हल्लीं जे पुष्कळ बालमृत्यू होतात ते कमी करण्यासाठीं योग्य तजवीज करण्याची विशेष आवश्यकता आहे या नव्या रुग्णालयांत इतकें चांगलें व व्यवस्थेशीर काम चालेल कीं त्याच्या योगानें हें बालमृत्यूचें संकट दूर होईल.

हल्लींच्या वऱ्हाड म्युनिसिपल कायद्यांत जे दोष आपण दर्शविले आहेत ते आह्मी ध्यानांत घेतले आहेत. मध्यप्रांताकरिता एक नवीनच कायद्याचा मसुदा तयार करण्यांत आला आहे. आणि योग्य क्रमानें तो मसुदा नव्या होणाऱ्या प्रांतिक कौंसिलापुढें ठेवण्यांत येईल. वऱ्हाडला तो कायदा लागू करण्याचा पुढें विचार करण्यांत येईल तेव्हां म्युनिसिपल संस्थांचा विचार घेण्यांत येईल. आपल्या मानपत्रांतील प्रारंभीच्या भागा वरूनच आपलें व आमचें एक मत पडते कीं दोन्ही प्रांतांतील म्युनिसिपल कारभार होतां होईल तों पर्यंत एकसारख्याच कायद्याच्या धोरणानें चालणें इष्ट आहे. आणि मध्यप्रांताचा मसुद्याचा कायदे कौंसिलापुढें विचार चालला असतां आपल्यातर्फेनें कौंसिलदार आपापला सल्ला देणार आहेतच तेव्हां मध्यप्रांताचा खर्डा या प्रांताला लागूकरण्याला अडचण पडणार नाहीं असा आह्माला भरंवसा वाटतो.

सद्ग्रहस्थहो, चालू वर्षाच्या प्रारंभीं दक्षिण आफ्रिकेंतील इंडियन लोकांची राजकीय स्थिती सुधारण्या संबंधानें माझ्याकडे जी स्वतंत्र कामगिरी दिली होती तिचा उल्लेख आपण फार प्रेमळपणें केला आहे आणि तसेंच त्या देशांत जाऊन मी जी कामगिरी केली तिच्या संबंधात आपल्या चक्रवर्ती बादशहानें मला मोठा किताब देऊन माझ्या वर जो मोठा नुकताच अनुग्रह करण्यांत आलेला आहे त्यासंबंधानें आपण जे आनंदोद्गार काढले आहेत त्याबद्दल मी आपला आभारी आहे. या भानगडीच्या बाबतींत तडजोड करून जी कांहीं माझे हातून अल्पस्वल्प कामगिरी झाली आहे त्याबद्दल मला मोठें समाधान वाटतें. सद्गृहस्थो, उभयपक्षांनीं जो सामोपचार दाखविला त्यामुळें वादाच्या गोष्टींचा योग्य उहापोह करण्यांत आला आणि चौकशी करण्याकरितां जें कमिशन बसलें होतें त्याच्या पुढील वादाच्या विषयांचा व्यावहारिक दृष्टीनें व सरळ पणानें निर्णय करण्यांत आला ह्मणून हल्लींची तडजोड घडून आली. आपण मानपत्रामध्यें दर्शविलेला हा आनंदाचा निकाल होण्याला वास्तविक सरळ दृष्टीची व विचारीपणाची न्यायबुद्धि हीच कारण होय. दक्षिण आफ्रिकेंत इंडियन लोक व राजकीय लोक यांचे मधील संबंध याच निकालाचें धोरणानें आबाधित चालू राहील अशी मला पूर्ण उमेद आहे.

वरील आशयाचें संभाषण टाळ्यांच्या गजरांत संपूर्ण झाल्यावर हार तुरे पान सुपारी वाटण्यांत येऊन सभा विसर्जन झाली.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान —** गेल्या आठवड्याभर पूर्ण उघाड असून हवा स्वच्छ व निरोगी आहे. क्वचित मध्यंतरी अभ्रे येत असतात. पेरण्याचें काम जारीनें सुरूं आहे. रोगराई विशेष नाहीं.

आलिशान चीफ कमिशनर साहेब बहादुर हे गेल्या शुक्रवारीं सकाळीं कापशीची वाटर वर्क्स पाहण्याकरितां मुद्दाम गेले होते. साहेब बहादुरांचे आगमना प्रीत्यर्थ शहर सफाई व रोशनाई येथील म्युनिसिपल कमिटीनें फार उत्तम प्रकारें केली होती.

म्युनिसिपल मानपत्रानिमित्त भरलेल्या दरबारांत नामदार चीफ् कमिशनर साहेब यांनीं येथील सरकारी शेतीच्या प्रयोग शालेचे सुपरिंटेंडेंट राय साहेब भयालाल दुबे यांस राय साहेब किताबाचीं राजचिन्हें अर्पण केलीं आणि रा. रा. सदाशिव नारायण उंटवाले पोलिस इन्स्पेक्टर वर्धा, यानीं वऱ्हाडांत असतांना असल दरवडेखोर देवजी कोळी यांस वाशीम जवळील कळंबे येथें मोठ्या शिताफीनें १९१३ चे एप्रिल मध्यें पकडलें ह्मणून त्यांस एक चांदीचें पदक दिलें. तसेंच अनसिंगी येथें आग लागली असतां जिवाकडे नपाहता रा. रा. महमद याकुब पोलिस कान्स्टेबल यानें आगींत शिरून लोकाचे जीव वाचविले याबद्दल त्यांसही एक चांदीचें पदक देण्यांत आलें.

**श्री जीवदया ज्ञानप्रसारक फंड –मुंबई–** याचे असिस्टंट म्यानेजर रा. रा. लगनलाल वि. परमानंददास नाणावटी यांनीं लिहिलेलें “ खुराक और स्वास्थ ” या नांवाचें एक छोटें हिंदी बुक या अंकासोबत वाटलें जात आहे. तिकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें अशी आह्मी शिफारस करितों.

मौजे उंद्री तालुके चिखली जिल्हा बुलडाणा येथील रहिवासी भिकंभट शिवराम भट जोशी यानीं रावसाहेब पंचमजॉर्ज यावर शार्दूल विक्रीडित वृत्तांत एक अष्टक रचिलें आहे. तें आमचे कडे आलें आहे. यानीं जास्त पद्धतशीर रीतिनें प्रयत्न केल्यास याची कविता छापण्यालायक होईल.

## नोटीस ६७

रा० रा० गोविंदराम टीकमदास शट साहू व रामचंद तेजमल शेट सखाराम तेजमल या दुकानचे मालक दुकान कसबे कोथळी ता० मलकापूर जि० बुलडाना यासः—

पितांबर लालमन व दुर्लाचंद लालमन रा० क० कोथळी यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता० १ माहे १२ सन १९१० इ० रोजीं आह्मीं तुह्मास राउतमल सुरजमल रा० कोथळी यांची शेती आमचा मानस नसतां केवळ तुमचे आग्रहा वरून व विनंती वरून दर एकरास १०० शंभर रुपये प्रमाणें ४० चाळीस एकर शेती चार हजार रुपयांस खरेदी देण्याचा सवदा येथें पंचा समक्ष झाला. सदरहू शेती राउतमल यानें खामगांवकर टीकमदास शट यांस देण्यांत दिली होती व टीकमदास याचे तर्फे तुह्मी आमचेशीं वरील सौदा केला व त्याकारितां आह्मी तुह्मास आडव्हान्स बद्दल नगदी रोख ३०० तीनशे रुपये दिले. सदरहू शेतीबद्दल टीकमदास व राउतमल यांच्यांत दिवाणी होऊन शेती राउतमल याकडे राहिली व फैसला मात्र राउतमलचे आंगावर झाला. अर्थात तुह्मास ती शेती आह्मांस देतां आली नाहीं. हा निकाल गेले सालचे श्रावण महिन्यांत झाला. नंतर आह्मी तुह्मास बयान्याचे पैसे मागूंलागलों. तेव्हां तुह्मी अह्मांस ७० रुपयांचा येथील ईसबखा मुसलमानाचा हवाला दिला. त्यांत तुमचेकडे असलेले आमचे वाण सौद्याचे दुकानची उधार बाकी ३२ रुपये वजाजातां बाकी राहिले रुपये ३८ व गेलेल्या शिमग्याचे वेळीं नगदी रोख दिले रुपये १०० एकुण १३८ रुपये आह्मास पोंचले बाकी राहिले रुपये एकशे बासष्ट १६२ हे आह्मी तुह्मास बरेच वेळ मागीतले तरी तुह्मी ते न देतां भलतेच तर्क कुतर्क काढून कुभांड रचून माझे पैसे बुडविण्याची तुमची नजर दिसून येत आहे. अखेरही नोटीस देणें भाग पडलें. साहू मनुष्यानें एवढा प्रकार होऊं देऊं नये. तरी या नोटिसीनें कळवितों कीं सदर नोटीस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत वरील रुपये एकशे बासष्ट १६२ व बयाना दिल्या पासून आज पावेतों एकोत्र्याचें व्याज हे आह्मास चुकते करून आमची पावती घ्यावी. नाहीं तर रीतीं प्रो दिवाणींत दावा करून व्याजा सहित व नोटिशीचे खर्चासह रुपये घेतले जातील. कळावे ता०

सह्या

१ पितांबर लालमन सही द० खुद

१ दुर्लीचंद लालमन द० खु०

नो. नं. ११

---

## *WANTED.* 13

Two Matrics having knowledge of Science and drawing on Rs. 25 and 30 per month respectively for the A. V. School Nandura. The successful candidates shall have to execute a bond to serve at least for one year. Apply sharp with certificates to the

1—7—14 } President—E. School Committee Nandura Berars

No. No. 12

---

## नोटीस २८

रा. रा. पुंडलीक वा सखाराम थारकर कुणबी राहणार बोंडगांव पोष्ट भोनगांव तालुका खामगांव जिल्हा बुलडाणा

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मी पेंढकापूर येथें आमचें शठीनागें घरीं जाऊन रात्रीं एकदम कोणास न विचारतां माझी बायको नामें भागिर्थी इला घरून तिचे अंगावरील दागिने अंदाज रु. ३०० अक्षरी तीनशेचे होते त्यासुद्धा तिला घेऊन गेले. तरी आतां असें ऐकण्यात येते कीं तिला गंधर्वानें दुसऱ्या ठिकाणीं देणार आहां तरी या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं जर दागिन्यासमेत ८ आठ दिवसाचें आंत आमचें घरीं पोहोंचती न केली तर फौजदारी आणि दिवाणी कोर्टांत कायदेशीर योग्य तऱ्हेनें इलाज केला जाईल. मग तुमचा कोणचाही उजर चालणार नाहीं कळावें ता० २३।६।१४ इ०

सही

पांडु मनाजी मोहळ दस्तुर खुद

ठिकाणा गणेश वामन देशपांडे

रा० आकोट

नो० नं० १३

---

## नोटीस २९

नोटीस बेशमी भागाई मर्द नीनाजी माळी देवकर रा० मौजे घानेगांव ता० खामगांव

यासीः—

नोटीस देणार सखाराम वा जानजी माळी देवकर रा० मौजे घानेगांव ता० खामगांव मी नोटीसीनें तुजला कळवितो कीं माझा मुलगा सुपडाजी वा नीनाजी हा तुह्मांस मिती कार्तीक वा १४ संवत १९६३ तारीख १५।११।१९०६ रोजीं दत्तक दिला आहे. व दत्तकपत्र होऊन नोंदले आहे. तुह्मांस मुलगा नसल्यामुळें तुह्मी तुमचे खुषीनें माझा मुलगा मागून घेतला आहे. व त्याप्रमाणें तुह्मी वागावित असून मुलगा तुमचेत आहे. तुमचा मालक नीनाजी हा माझा सखा भाऊ होता. नीनाजीची सर्व जिनगी वडीलोपार्जीत संपादन केलेली आहे. आमचे शिवाय तुम्हांस कोणी नसल्यामुळें व तुमचे मागे आह्मीच वारस असल्यामुळें मी माझा मुलगा तुमचे मागणी प्रमाणें दत्तक दिला आहे. व तुमची मर्जी संपादन केली तुह्मी तुमचे मुलाचे मैताचे खाते सुपडाजीचे नावे सेतीचे खाते मलकापूर येथे वि० तहसीलदारसाहेब याचे समक्ष करून दिलें आहे.

आज बारा महिने झाले सरकारनीं हक्क नोंदणीचे रजिष्टर केलें. त्यावेळीं तुह्मी सुपडाजी हा दत्तक घेतला असे कबूल केले. परंतु नोंदणींत आपले नांव दाखल करून दत्तकपत्र नाकबूल केले ह्मणजे नाकारले. दत्तकपत्राप्रमाणें सुपडा हा तुमचा मुलगा असून तुमचे जवळ राहत आहे. हल्लीं सुपडाजी हा अज्ञान आहे मी या नोटीसीनें कळवितो कीं तुह्मी हक्क नोंदणीचे रजिष्टरांत दत्तक नाकबूल केल्या वरून मुलगा सज्ञान होईपावेतों जिनगीचा हीशेब तुमचे जवळून घेतला जाईल. तुमचे मनांत जीनगीची अफरातफर करणें आहे असे दिसून आलें आहे. दरसाल सेतीचे उत्पन्न रुपये १५०० असून दरसाल खर्च रुपये ६०० होत आहे. याप्रमाणें तुमचे जवळून हिशेब घेतला जाईल. माझा मुलगा जो मी तुह्मास दत्तक दिला तो सज्ञान झाल्यावर तुह्मास हिशेब मागील-तो तुह्मास द्यावा लागेल ह्मणून मी तुह्मास आगाऊ या नोटीसीनें कळविलें आहे.

माझे वडीलोपार्जीत संपादन केलेले जिनगीचा तुह्मी आपले आपसांत कांहीं तरी अफरातफर करून दत्तक घेतलेले मुलास नंगे करून ठेवावे. असे दिसते तेव्हा तुह्मी विनाकारण खर्च करूं नये व जिनगीचा अफरातफर करूनये व कोणास गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देऊनये. सुपडाजी हा जिनगीचा पूर्ण मालक आहे. तेव्हां तुह्मास हीशेब देणें भाग आहे. तो तुह्मी ठेवित जावा. ह्मणून या नोटीशीनें कळविले आहे कळावें. तारीख ६।६।१४

सही

सखाराम जानजी देवकर

घाणेगांव द. खु.

नो० नं० १४

---

## नोटीस ३०

बीबी मर्द शहा महमद मुसलमान मन्यार राहणार वाडेगांव ता बाळापूर

इसः—

या जाहिर लेखानें कळविण्यांत येतें कीं तुमच्या लग्नाचे वेळीं तुमच्या आप्तांनीं मोठा धोका दिला आणि आमच्या घराण्याला कमीपणा आणणाऱ्या गोष्टी तुह्मी करूं लागला ह्मणून त्यांच्या कपटाच्या वर्तनामुळें आणि इतर लबाडीमुळें मला तुमच्या नांवानें बक्षीसपत्र लिहून नोंदून द्यावें लागलें. मी त्या बक्षीसपत्राला कबूल नाहीं, आणि त्या अन्वयें तुह्माला कांहींच अधिकार पोंचत नाहीं. शेतीवर माझ्या दुसऱ्या मुलांची मालकी आहे आणि त्यांचें पालन करण्याचें काम माझें आहे. मला ही शेती गहाण बक्षीस वगैरे देण्या[...] अधिकार नाहीं. तर ही नोटीस पोचल[...] तारखेपासून आठ दिवसांच्या आंत तु[...] उलट कागद करून द्यावा आणि त[...] केल्यानें माझ्या घरांत शांतता व स्वस्थ[...] कायम राहील. शेतीचा ताबा तुह्मा[...] मिळणार नाहीं कळावें तारीख २९ जू[...] १९१४ इ.

सही उर्दुंत

महमद हाशम वल्लद शेखमदा[...]

नि. खु.

द० शेखकरीम वा महमदहाश[...]

नो. नं. १[...]

---

## नोटीस

इब्राम वा रुंजाजी दातीर बारी रा[...] अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा उमरावती

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची मुलगी नामे अंबी या नांवची माझी लग्नाची बायको असून लहानपणापासून माझे आई बापाचे येथें राहत आली. शहाणी झाल्यादिवसापासून साल गुदस्ता सालापर्यंत माझे येथेंच होती व ती बायकाचे रितीप्रमणें सासरी जसे वागावें तशा रीतीनें न वागून वेळोवेळीं पळून जाऊं लागली याकरितां तुह्मास ही गोष्ट कळतांच तुह्मी तिजला आपले येथें घेऊन गेला व आतां मजला खोटी नोटीस ता० १६।६।१४ एलिचपूर एथील प्रमात पत्रांत दिली त्यांत खोटें लिहित कीं पाच वर्षांपासून बायको वागवीत नाही हें लिहिणें किती तुमचे खरें आहे [...] आकोट येथील आपले जातीचे चार पं[...] लोक आहेत ते सांगतील व उल[...] बायकोची खावटीहि मागता हे तुम[...] केवढें खोटपणाचे आहे तुह्मी माझे सास[...] वडील अहात ह्मणून तुह्मास उपास[...] दिहित नाहीं आतां तुमचे नोटीसीचें उत्[...] रानें असें कळवितों कीं ही नोटी[...] पावले दिवसापासून १५ दिवसांत तु[...] माझे बायकोस चार पंचा समक्ष मा[...] घरीं आणून पोंचते करावे मी नांदवि[...] ण्यास राजी आहे असे न केल्यास [...] तिजला योग्य कोर्टमार्फत फिर्याद कर[...] ताब्यांत घेईन व खर्च भरून घेईन. तु[...] मागता खावटी खर्च तो मी कांहींच देण[...] नसून पुढेही तुह्मी बायकोस मुदतींत मा[...] येथें न आणून घातल्यास खावटी ख[...] मी बिलकूल देणार नाहीं आपले जाति[...] बायका बीलकूल घरबशा नसून उ[...] मनुष्यास त्यांची संसारांत मदत अ[...] हें तुह्मास माहित आहेच कळावें तार[...] २७।६।१४ इ०

द० जयकृष्ण नारायण रा० आवं[...]

सही

गंगाराम वा किसन [...]

असवार आकोट नि.

नो. नं. १६

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख १३ माहे जुलै सन १९१४ इ० [ अंक २७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊ व घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Rid'and.
आकोला ९।९।०९ } एजंट
नो. नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¾ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } J. G. Ridland
आकोला २१-९-१० } एजंट
न० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं० रु. १०८०

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला ने. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.
नो० नं० ४

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S. I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

### ' विकावयाचा आहे. '

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लौकरच रेलवे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ६ वऱ्हाड

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हींमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ७

### "खरें पैाष्टिक औषध"

पाहिजे असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकुन गुण देते, असे वंगभस्म वापरा किं. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाल भस्म तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. ज्यांना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळयांत, उन्हाळी कचवींत आग, धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु. शिवाय पैाष्टीकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपैण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमाची जरुरी नाहीं. किं. ८ आणे वि. खु. क्याटलाग मागवा. फुकट--व्ही. आर. मुळे, नांदुरा, जी. आय. पी.
नो. नं. ८

बंगाली कथानकाचे आधारें लिहीलेली

## मधुर-मीलन.

लेखक--श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर.

**वाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी अत्यंत चित्तवेधक नवी कादंबरी.**

कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण चटकदार. प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठआणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना-सिटी
नो. नं. ९

### नोटीस

सदासीव वा॥ कळताजी कुनबी वानखळे राहणार एडकी तालुका मुर्तिजापुर यास-:

खालीं सही करणार याजकडून नोटीसीचें उत्तर देण्यांत येतें कीं आमचा जावाई किसन, याचे संमतीनें तुम्ही नोटीस ता० २ माहे जून सन १९१४ कर्तव्य उमरावती यांत दिली आहे तर रुपयांत ह्मणजे सोळा आण्यांत एक आणा तरी खरी देण्याची होती कारण सर्व हिशोब करून तुह्मास दोनशे अठावन रुपये २९८ दिले. बैल जवारी वगैरे कांहींच आणलें नसून फक्त दोन गाई व एक गोऱ्हा हा होता. तर मागील सर्व हिशोब केला तेव्हां गाई गोऱ्हा हे आह्मास वजा करून दिले व राहीली रकमही तुह्मास दिली. आतां ज्याअर्थी नोटीसच तुह्मी दिली आहे तर माझे मलाही घेणें जरूर आहे तेव्हां एक वर्ष दोघांचा खाण्याचा खर्च रुपये १०० व बाळंतपणाचा खर्च रुपये २९ व मरणाचा खर्च रुपये ३० व जनावरांचा खाण्या बद्दल खर्च रुपये ४० व नोटीसीचा खर्च एकूण एकशे पचाण्णव रुपये १९९ शिवाय नोटीसीचा खर्च हा तुह्मी नोटीस पावले दिवसा पासून एक महिन्याचे आत आणून द्यावा. नोटीस अमान्य केल्यास तुह्मावर योग्य न्यायकोर्टांत दावा करून दाव्याच्या खर्चासह रकम भरून घेतली जाईल कळावें ता० २८।६।१९१४ इ० द० पांडुजी सखाराम पा० काळगव्हाण द० खु०

सही

विटोबा मटाजी पाटील धारे कुणबी रा० धामणगांव ता० आकोट निशानी हातची खु०
नो० नं० १०

## नोटीस ६३

रा० रा० गोविंदराम टीकमदास शट साहू व रामचंद तेजमल शेट सेवाराम तेजमल या दुकानचे मालक दुकान कसेबे कोथळी ता० मलकापूर जि० बुलडाना यास:—

पितांबर लालमन व दुर्लाचंद लालमन रा० क० कोथळी यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता० १ माहे १२ सन १९१० इ० रोजीं आह्मीं तुह्मास राउतमल सुरजमल रा० कोथळी यांची शेती आमच मानस नसतां केवळ तुमचे आग्रहा वरून व विनंती वरून दर एकरास १०० शंभर रुपये प्रमाणें ४० चाळीस एकर शेती चार हजार रुपयांस खरेदी देण्याचा सवदा येथें पंचा समक्ष झाला. सदरहू शेती राउतमल यानें खामगांवकर टीकमदास शेट यांस देण्यांत दिली होती व टीकमदास याचे तर्फे तुह्मी आमचेशी वरील सौदा केला व त्याकरितां आह्मी तुह्मास आइव्हान्स बद्दल नगदी रोख ३०० तीनशे रुपये दिले. सदरहू शेतीबद्दल टीकमदास व राउतमल यांच्यांत दिवाणी होऊन शेती राउतमल याकडे राहिली व फैसला मात्र राउतमलचे आंगावर झ.ला. अर्थात तुह्मास ही शेती आह्मांस देतां आली नाहीं. हा निकल गेले सालचे श्रावण महिन्यांत झाला. नंतर आह्मी तुह्मास बयान्याचे पैसे मागू लागलों. तेव्हां तुह्मी आह्मास ७० रुपयांचा येथील ईसबखा मुसलमानाचा हवाला दिला. त्यांत तुमचेकडे असलेले आमचे वाण सौद्याचे दुकानची उधार बाकी ३२ रुपये वजा जातां बाकी राहिले रुपये ३८ व गेलेल्या शिमग्याचे वेळीं नगदी रोख दिले रुपये १०० एकुण १३८ रुपये आह्मास पोंचले बाकी राहिले रुपये एकशे बासष्ट १६२ हे आह्मी तुह्मास बरेच वेळ मागितले तरी तुह्मी लक्ष न देतां भलतेच तर्क कुतर्क काढून कुमांड रचून माझे पैसे बुडविण्याची तुमची नजर दिसून येत आहे. अखेरही नोटीस देणें भाग पडलें. साहू मनुष्यानें एवढा प्रकार होऊं देऊं नये. तरी या नोटिसीनें कळवितों कीं सदर नोटीस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत वरील रुपये एकशे बासष्ट १६२ व बयाना दिल्या पासून आज पावेतों एकोड्याचें व्याज हे आह्मास चुकते करून आमची पावती घ्यावी. नाहीं तर रिती प्रो दिवाणींत दावा करून व्याजा सहित व नोटिशीचे खर्चासह रुपये घेतले जातील. कळावे ता०

सह्या

१ पितांबर लालमन सही द० खुद

१ दुर्लीचंद लालमन द० खु०

नो. नं. ११

---

## *WANTED.* 13

Two Matrics having knowledge of Science and drawing on Rs. 25 and 30 per month respectively for the A. V. School Nandura. The successful candidates shall have to execute a bond to serve at least for one year. Apply sharp with certificates to the

1—7—14 } President—E. School Committee Nandura Berars

No. No. 12

---

## नोटीस २८

रा. रा. पुंडलीक वा सखाराम धारकर कुणबी राहणार बोंडगांव पोष्ट भोनगांव तालुका खामगांव जिल्हा बुलढाणा यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मी पेंढकापूर येथें आमचें राठीनागे घरीं जाऊन रात्रीं एकदम कोणास न विचारतां माझी बायको नामें भागिर्थी इला घरून तिचे अंगावरील दागिने अंदाज रु. ३०० अक्षरी तीनशेचे होते त्यासुद्धा तिला घेऊन गेले. तरी आतां असें ऐकण्यात येते कीं तिला गंधर्वानें दुसऱ्या ठिकाणीं देणार आहां तरी या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं जर दागिन्यासमेत ८ आठ दिवसांचें आंत आमचें घरीं पोहोंचती न केली तर फौजदारी आणि दिवाणी कोर्टात कायदेशीर योग्य तऱ्हेनें इलाज केला जाईल. मग तुमचा कोणचाही उजर चालणार नाहीं कळावें ता० २३।६।१४ इ०

सही

पाडु मनाजी मोहळ दस्तुर खुद

ठिकाणा गणेश वामन देशपांडे

रा० आकोट

नो० नं० १३

---

## नोटीस २९

नोटीस बेशमी भागाई मर्द नीनाजी माळी देवकर रा० मौजे घानेगांव ता० खामगांव

यासीः—

नोटीस देणार सखाराम वा नानजी माळी देवकर रा० मौजे घानेगांव ता० खामगांव मी नोटीसीनें तुजला कळवितोकीं माझा मुलगा सुपडाजी वा नीनाजी हा तुह्मांस मिती कार्तीक वा १४ संवत १९६३ तारीख १९।११।१९०६ रोजीं दत्तक दिला आहे. व दत्तकपत्र होऊन नोंदले आहे. तुह्मांस मुलगा नसल्यामुळें तुह्मी तुमचे खुशीनें माझा मुलगा मागून घेतला आहे. व त्याप्रमाणें तुह्मी वागवित असून मुलगा तुमचेत आहे. तुमचा मालक नीनाजी हा माझा सखा भाऊ होता. नीनाजीची सर्व जिनगी वडीलोपार्जीत संपादन केलेली आहे. आमचे शिवाय तुह्मांस कोणी नसल्यामुळें व तुमचे मागे आह्मीच वारस असल्यामुळें मी माझा मुलगा तुमचे मागणी प्रमाणें दत्तक दिला आहे. व तुमची मर्जी संपादन केली तुह्मी तुमचे मुलाचे मैताचे खाते सुपडाजीचे नावे सेतीचे खाते मलकापूर येथे वि० तहसीलदारसाहेब याचे समक्ष करून दिलें आहे.

आज बारा महिने झाले सरकारनीं हक्क नोंदणीचे रजिष्टर केलें. त्यावेळीं तुह्मी सुपडाजी हा दत्तक घेतला असे कबूल केले. परंतु नोंदणींत आपले नांव दाखल करून दत्तकपत्र नाकबूल केले ह्मणजे नाकारले. दत्तकपत्राप्रमाणें सुपडा हा तुमचा मुलगा असून तुमचे जवळ राहत आहे. हल्लीं सुपडाजी हा अज्ञान आहे मी या नोटीसीनें कळवितोकीं तुह्मी हक्क नोंदणीचे रजिष्टरांत दत्तक नाकबूल केल्या वरून मुलगा सज्ञान होईपावेतों जिनगीचा हीशेब तुमचे जवळून घेतला जाईल. तुमचे मनांत जीनगीची अफरातफर करणें आहे असे दिसून आलें आहे. दरसाल सेतीचे उत्पन्न रुपये १५०० असून दरसाल खर्च रुपये ६०० होत आहे. याप्रमाणें तुमचे जवळून हिशेब घेतला जाईल. माझा मुलगा जो मी तुह्मास दत्तक दिला तो सज्ञान झाल्यावर तुह्मास हिशेब मागील-तो तुह्मास द्यावा लागेल. ह्मणून मी तुह्मास आगाऊ या नोटीसीनें कळविलें आहे.

माझे वडीलोपार्जीत संपादन केलेले जिनगीचा तुह्मी आपले आपसांत कांहीं तरी अफरातफर करून दत्तक घेतलेले मुलास नंगे करून ठेवावे. असे दिसते तेव्हा तुह्मी विनाकारण खर्च करूं नये व जिनगीचा अफरातफर करूनये व कोणास गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देऊनये. सुपडाजी हा जिनगीचा पूर्ण मालक आहे. तेव्हां तुह्मास हीशेब देणें भाग आहे. तो तुह्मी ठेवित जावा. ह्मणून या नोटीशीनें कळविले आहे कळावें. तारीख ६।६।१४

सही

सखाराम नानजी देवकर

घाणेगांव द. खु.

नो० नं० १४

---

## नोटीस ३०

बीबी मर्द शहा महमद मुसलमान मन्यार राहणार वाडेगांव ता बाळापूर

इस:—

या जाहिर लेखानें कळविण्यांत येतें कीं तुमच्या लग्नाचे वेळीं तुमच्या आप्तांनीं मोठा धोका दिला आणि आमच्या घराण्याला कमीपणा आणणाऱ्या गोष्टी तुह्मी करूं लागला ह्मणून त्यांच्या कपटाच्या वर्तनामुळें आणि इतर लबाडीमुळें मला तुमच्या नांवानें बक्षीसपत्र लिहून नोंदून द्यावें लागलें. मी त्या बक्षीसपत्राला कबूल नाहीं, आणि त्या अन्वयें तुह्माला कांहींच अधिकार पोंचत नाहीं. शेतीवर माझ्या दुसऱ्या मुलांची मालकी आहे आणि त्यांचें पालन करण्याचें काम माझें आहे. मला ही शेती गहाण बक्षीस वगैरे देण्य[ाचा] अधिकार नाहीं. तर ही नोटीस पोच[ल्या] तारखेपासून आठ दिवसांच्या आंत [तु]... उलट कागद करून द्यावा आणि ... केल्यानें माझ्या घरांत शांतता व स्वस्[थता] कायम राहील. शेतीचा ताबा तुह्मा[स] मिळणार नाहीं कळावे तारीख २९ ... १९१४ इ.

सही उर्दुत

महमद हाशम वल्लद शेखमद...

नि. खु.

द० शेखकरीम वा महमदहा[शम]

नो. नं. १५

---

## नोटीस

इब्राम वा रुंजाजी दातीर बारी रा... अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा उमराव[ती] यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटी[स] देण्यांत येते कीं तुमची मुलगी ना... अंबी या नांवची माझी लग्नाची बायक[ो] असून लहानपणापासून माझे आई बापा[चे] येथें राहत आली. शहाणी झाल्यादिवस[ा]पासून साल गुदस्ता सालापर्यंत माझे येथें होती व ती बायकाचे रितीप्रमाणें सासरी ज... वागावें तशा रीतीनें न वागून वेळोवेळ[ी] पळून जाऊं लागली याकरितां तुह्मास ही गोष्ट कळतांच तुह्मी तिजला आपल[े] येथें घेऊन गेला व आतां मजला खोट[ी] नोटीस ता० १६।६।१४ एलिचपूर एथील प्रभात पत्रांत दिली त्यांत खोटें लिहित[ो] कीं पांच वर्षापासून बायको वागवीत नाह[ीं] हें लिहिणें किती तुमचे खरें आहे ... आकोट येथील आपले जातीचे चार पं[च] लोक आहेत ते सांगतील व उल... बायकोची खावटीहि मागता हे तुम[चे] केवढें खोटपणाचे आहे तुह्मी माझे सास[रे] वडील अहात ह्मणून तुह्मास उपा[य] लिहित नाहीं आतां तुमचे नोटीसीचे उत्[त]रानें असें कळवितों कीं ही नोटी[स] पावले दिवसापासून १५ दिवसांत तु[ह्मी] माझे बायकोस चार पंचा समक्ष मा[झे] घरीं आणून पोंचते करावे मी नांद[वि]ण्यास राजी आहे असे न केल्यास ... तिजला योग्य कोर्टमार्फत फिर्याद कर[ून] ताब्यांत घेईन व खर्च भरून घेईन. तु[ह्मी] मागता खावटी खर्च तो मी कांहींच देण[ार] नसून पुढेही तुह्मी बायकोस मुदतींत मा[झे] येथें न आणून घातल्यास खावटी ख[र्च] मी बिलकूल देणार नाहीं आपले जात[ीच्या] बायका बीलकूल परवशा नसून उ... मनुष्यास त्यांची संसारांत मदत अ[सते] हें तुह्मास माहित आहेच कळावें ता[रीख] २७।६।१४ इ०

द० नवकृष्ण नारायण रा० आवे...

सही

गंगाराम वा किसन

अत्तार आकोट नि.

नो. नं. १६

## ्री भूत श्री वासुदेवानंद सरस्वति महाराज.

श्रीमत् भगवत् अनुग्रहपूर्वक ज्ञानप्राप्त्यर्थ । देणाऱ्या हल्लींच्या काळच्या गुरुवर्गातील ते श्रेष्ठ विभूति मंगळवार तारीख २३ । रोजीं श्री गरुडेश्वरीं समाधिस्त झाली वार केला असतां एका मनुष्याचा देखील ेक आणि पारमार्थिक भार दुसऱ्यास ळे शिरावर घेतां येत नाहीं. तसेंच कृत न जाणणारे गोंदवलेकर महाराज उर्फ चैतन्य महाराज अगर चवंडे महार.जां- खे गुरुजी पुष्कळ लाभतात. हल्लींही ासानें आपणास प्रसिद्ध करून घेणारे ार दत्तोपासनेस लावणारे बरेच गुरु हेत. परंतु आर्त जनांचे तापहरण करून स नुसत्या परमार्थासच लावणारे नव्हे ऐहिक शांति देऊन आपणांस परमार्थ स मिळेल अशी खातरी पटवून देणारे एकटेच महाराज होते. हे शिष्यानुवृत्ती : कधीं राहिले नाहींत. चतुर्थाश्रमांत अध्य- न अध्यापन करूं नये अशी आज्ञा सतांही केवळ भूतदयेमुळें दरसाल दोन हिने कोठेतरी राहून मंत्रोपदेश करीत असत. ांस नरूर असेल त्यांनीं यांचा शोध ून त्यांचें दर्शन घ्यावें व आपणांस पुनित रून घ्यावें. हे कोणत्याहि शिष्याचे घरीं र्षासन पटकावण्यास कधींच गेले नाहींत. शाच्य बाधेनें पीडित झालेल्यांचीं भूतें ज रात्रीं नुसत्या उदक सिंचनानें ायमचीं काढून टाकीत असत. नस्पति शास्त्र त्यांस इतकें अवगत होतें ीं वनस्पतिरसांनीं त्यांनीं दिनार्धात मुक्याम ोलकें केलें आहे, महारोगग्रस्तांस व्याधि- क्त केलें आहे, आणि सर्पदंष्ट्रांस विषवि- ुक्त केलें आहे, अशा आख्यायिका आहेत. ांस अधुनिक सुधारणांचा इतका तिटकारा से कीं शिखा सूत्रवान् ब्राह्मण हल्लींच्या ाळीप्रमाणें केश ठेवून त्यांच्या कडे गेला सेल तर त्यास हे आपल्या शिष्यांकडून व्हांच हाकलून लावीत असत. मग विधवा पुनरुद्वाह पक्षाभिमान्यांस यांच्या जवळ थारा कोठून मिळणार ? स्वत: आगगाडीनें कधींच गेले नाहींत. सारांश वैराग्याचें आदिस्थान, निस्पृहतेचें मूळ, आणि साच्छिलाचें अग्रस्थान आज नाहींसें झालें. त्यांची शिष्यमंडळी त्यांस दत्तांच अवतार असें समजत असे. दत्त झाले तरी निर्गुणातूनच सगुणरूप घेऊन आलेले. हे आमच्या मतें त्यापक्षांही श्रेष्ठ होते. यांस विद्या, संस्कृत ज्ञान आणि ज्योतिष इतकें उत्तम येत होतें कीं अनेक प्रसंगीं त्यांनीं वर्तविलेलीं भवि- ष्यें शास्त्राच्या जोरावर आहेत का यांच्या अवतारी ईश्वरी सामर्थ्यामुळें आहे हेंच समजत नसे. अशा विभूतींच्या आख्यायिका मागें रहाणार. त्यांचें वर्णन केल्यानेंच नामस्मरण घडणार. नाममहिमा रामदासा- दिकांनीं वर्णिलेलाच आहे. एवंच पार्थी हल्लीं आपला अवतार संपविला तरी ते ब्रह्मरूपानें आपल्यांतच आहेत. यामुळें त्यांचा वियोग वाटणें अशक्य आहे. शिवाय त्यांचा सांप्रदाय कोणता होता हें ज्या शिष्यांस माहित असेल त्यांची सांप्रदाय परंपरा कायम राहीलच. परंतु केवळ ऐहिक लाभाची आपेक्षा ठेवून इष्ट कार्यार्थ त्यांजकडे जाणाऱ्यांची मात्र निराशा झाली. नवीन वळण लागणें बंद झालें. व या दृष्टीनें आमची मोठी हानि झाली यांत संशय नाहीं. ज्यावेळीं धर्मबंधनें शिथिल होऊं लागलीं आहेत पाश्चिमात्य वेदान्ताचा पौर्वात्य वेदान्ताबरोबर जयश्रीसाठीं कलह होऊं लागला आहे. मनें संशयग्रस्त होऊं लागलीं आहेत. अशावेळीं प्रत्ययाशिवाय नुसत्या कल्पनांनीं पौर्वात्य शास्त्रें टिकाव धरतील असें दिसत नाहीं. व प्रत्यय देणारी विभूति अर्थात् क्वचितच असणार आणि ती अंतर्धान पावली ह्मणजे. जें दुःख व्हावयाचें तेंच आह्मांस होत आहे- परंतु आमच्या दुःखाचे वाटेकरी सहस्त्रशः अन्य पामरें आहेत ह्मणून समाधान मात्र होणारें नाहीं.

इत्यलम्


अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

**ओटोमोहिनी**

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—आरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १८

**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें

**राजवंशी सांध्याचें तेल,**

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप**

कसल्याही प्रमेहावर तीन दीवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक खास अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई

नो० नं० १९

न कत्थेकी परवा न चुनेसे काम,
हमारे मसालेका सबको सलाम.

| | |
|---|---|
| **तांबूल नवरत्न** | पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| **नवरत्न टेबलेट** | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| **नवरत्न तमाखु** | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| **मद्रासी नस** | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| **गजकर्णाचें मलम** | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे |
| **केश काढण्याचें तेल** | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| **चन्द्रकान्त बाम** | मेंदूला व डोक्याला आत उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार- आकोला.

नो. नं. १७

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

**आयोडाईज्ड सार्सापरिला.**



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव

नो० नं० २०                ५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला— सोमवार तारीख १३ माहे जुलै सन १९१४ इ० [ अंक २७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेत खाली दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप-यांप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ J. G. Ridland. एजंट

नो. नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें ज्यास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१¾ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० J. G. Ridland. एजंट

न० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. ने अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें मागधठा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्काळ दूर होतात. किं० रु. १८०

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला ने. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN 301, *Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

### 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते हिंगोली व्हाया वाशीम लोकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला

नो० नं० ६ वऱ्हाड

### अनायासें देवदर्शन.

नेटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०९




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. ७

### "खरें पौष्टिक औषध"

पाहिजे असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकुन गुण देते, असे वंगभस्म वापरा किं. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाळ भस्म तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. ज्यांना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळ्यांत, उन्हाळी कधवीत आग, धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु. शिवाय पौष्टीकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपैण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मकमाची जरुरी नाहीं. किं. ८ आणे बि. वु. क्याटलाग मागवा. फुकट—व्ही. आर. मुळे, नांदुरा, बी. आय. पी.

नो. नं. ८

बंगाली कथानकाचे आधारें लिहिलेली

## मधुर-मीलन.

लेखक—श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर.

वाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी असंत चित्तवेधक नवी कादंबरी. कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण चटकदार, प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठआणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना-सिटी

नो. नं. ९

### नोटीस

सदाशीव वा॥ कळताजी कुनबी वानखळे राहणार एदली तालुका मुर्तिजापूर यास–:

खाली सही करणार याजकडून नोटीसीचें उत्तर देण्यांत येतें कीं आमचा जावाई किसन, याचे संमतीनें तुली नोटीस ता० २ माहे जून सन १९१४ कर्तव्य उमरावती यांत दिली आहे तर रुपयांत ह्मणजे सोळा आण्यांत एक आणा तरी खरी देण्याची होती कारण सर्व हिशोब करून तुह्मास दोनशे अठावन रुपये २५८ दिले. बैल जवारी वगैरे काहींच आणले नसून फक्त दोन गाई व एक गोऱ्हा हा होता. तर मागील सर्व हिशोब केला तेव्हां गाई गोऱ्हा हे आह्मास जमा करून दिले व राहीली रकमही तुह्मास दिली. आतां व्यार्थी नोटीसच तुह्मी दिली आहे तर माझे मलाही घेणें जरूर आहे तेव्हां एक वर्ष दोघाचा खाण्याचा खर्च रुपये १०० व बाळंतपणाचा खर्च रुपये २५ व मरणाचा खर्च रुपये ३० व जनावरांचा खाण्या बदल खर्च रुपये ४० व नोटीसीचा खर्च एकूण एकशे पचाण्णव रुपये १९५ शिवाय नोटीसीचा खर्च हा तुह्मी नोटीस पावले दिवसा पासून एक महिन्याचे आत आणून द्यावा. नोटीस अमान्य केल्यास तुह्मावर योग्य न्यायकोर्टीत दावा करून दाव्याच्या खर्चासह रकम भरून घेतली जाईल कळावें ता० २८।६।१९१४ इ० द० पांडुजी सखाराम पा० काळगव्हाण द० खु०

सही

विटोबा मटाजी पाटील चारे कुणबी रा० धामणगांव ता० आकोट निशानी हातची खु०

नो० नं० १०

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १ शके १८३६

## प्राच्य भाषांचें अध्ययन.

प्राच्य भाषांच्या—विशेषतः संस्कृत भाषेच्या—अध्ययनाकडे पाश्चात्य विद्वानांचें लक्ष्य अधिकाधिक लागत चाललें आहे ही गोष्ट खरोखर अभिनंदनीय आहे. कारण त्यापासून हिंदुस्थानच्या प्राचीन संस्कृती विषयी पाश्चात्यांना ज्ञान होऊन त्यांच्या आह्मा लोकांविषयींच्या गैरसमजुती दूर होतील व आह्मी त्यांच्या दृष्टीनें आज जे अगदीं निकृष्ट दर्जाचे आहों ते आह्मांस योग्य मान देऊं लागतील. जर्मनीचे सुप्रसिद्ध तत्ववेत्ते प्रो० आयकेन यांचें संस्कृत भाषेच्या अध्ययनाकडे जें लक्ष्य लागलें आहे तें या दृष्टीनें अभिनंदनीय आहे. पण खुद्द आमच्या लोकांत ही मुसलमान पारशी, ज्यू वगैरे लोकांनीं संस्कृताचें व हिंदूनीं फारशी, झेंद, अरबी वगैरे भाषांचे अध्ययनास लागले असतां ती गोष्ट आह्मांस ज्यास्त अभिनंदनीय वाटेल. कारण पाश्चात्यांचें आमच्याविषयीं असणाऱ्या अज्ञानापेक्षां आमच्याच बंधूंचें आमच्याविषयीं असणारें अज्ञान अधिक हानिकारक होत आहे. या दृष्टीनें विचार केला ह्मणजे जे पारशी किंवा मुसलमान बंधु संस्कृत भाषेच्या अध्ययनास प्रवृत्त झाले आहेत त्यांचें अधिक सप्रेम अभिनंदन करणें अवश्य आहे. मुंबईचे एक पारशी ब्यारिस्टर संस्कृत भाषेचें अध्ययन जर्मनींत विख्यात प्रोफेसराच्या हाताखालीं करून नुकतेच परत आले आहेत. तसेंच मध्यप्रांताच्या सरकारचे ओरिएंटल ट्रान्स्लेटर खान बहादुर अब्दुल अझीझखा हे मोठे संस्कृतज्ञ पंडित असून 'शास्त्री' या पदवीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत. या दोघांचा ही सन्मान आमच्या हिंदुसमाजानें अवश्य केला पाहिजे. येथें आमच्या हिंदुबांधवांना ही अशी प्रार्थना करणें अवश्य आहे कीं वर सांगितलेले गृहस्थ जसे संस्कृत भाषेचा व्यासंग करून आपल्या मनाचा थोरपणा आणि विद्याप्रियता व्यक्त करीत आहेत तसें एखाद्या संस्कृतज्ञ हिंदूनें आरबी भाषेच्या किंवा झेंद भाषेच्या अध्ययनाकडे आपली बुद्धि व उत्साह खर्च केल्यास आमचे मुसलमान व पारशी बंधु यांचे धर्म व तत्त्वज्ञान यांविषयीं आमचें घोर अज्ञान त्यास दूर करतां येईल व जाती जातींत अधिकाधिक बंधुप्रेम वाढविण्याचे कामीं त्याचा चांगला उपयोग होईल.

## वर्णभेद नष्ट होणार तरी कधीं ?

हिंदुस्थानांत सरकारी नोकरींत नेमणुका करतांना लायकीकडे दृष्टि असावी, वर्णभेद मनांत आणू नये असा बादशाही जाहिरनाम्याचा मूल मंत्र असतां त्याचें प्रतिपालन प्रत्यक्ष व्यवहारांत होत नाहीं असें पदोपदीं दिसून येतें. बंगालच्या विद्याखात्याच्या मुख्य डायरेक्टराच्या जागेवर बाबू फणिभूषण यांचा हक्क असतां तेथें एक युरोपियन नेमिला गेला; डा० जगदीशचंद्र बोस व डा. पी. सी. राय यांची विद्वत्तेबद्दल त्रिखंडी कीर्ति गाजत असतां त्यांना इंडियन एज्युकेशन सर्व्हिसमध्यें घेण्यात येत नाहीं; पाटणा कॉलेजचे इतिहासाचे प्रोफेसर बाबू जदुनाथ सरकार यांचे मुसलमानी कारकीर्दीविषयींचे ऐतिहासिक शोध पाश्चात्य इतिहासज्ञांनाही माना तुकावण्यास लावणारे झाले असतां व जदु बाबूंनीं आज कित्येक वर्षें इतिहासाच्या प्रोफेसराचें काम अतिशय उत्साहानें आणि दक्षतेनें केलें असतांही त्यांच्या डोक्यावर एक तरणा बांड युरोपियन सीनियर प्रोफेसर ह्मणून नेमिला जातो. असे प्रकार पाहिले आणि पब्लिक सर्व्हिस कमिशनपुढें उघडकीस आलेल्या आणखी कित्येक गोष्टींचा विचार केला ह्मणजे अतिशय सुधारलेल्या ह्मणविणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या राज्यपद्धतीला कलंक लावणारा हा वर्णभेद नाहींसा तरी कधीं होणार? असा प्रश्न उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. पब्लिक सर्विस कमिशनचा रिपोर्ट अद्याप प्रसिद्ध झाला नाहीं, तथापि विलायतच्या कित्येक पत्रांतून त्याच्या शिफारशी विषयींचा जो अंदाज प्रसिद्ध झाला आहे त्यावरून पाहतां या कमिशनाच्या हातूनही या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागला आहे असें ह्मणवत नाहीं. वर्णभेदापुढें बुद्धिमान् व उदार प्रकृतीच्या इंग्रजांची न्यायबुद्धि ही लटपटली असें ह्मणण्याचा प्रसंग न येवो अशी प्रत्येक हिंदी माणसाची मनापासून इच्छा आहे. काय घडून येईल तें खरें.

## पोलिसांच्या वर्तनाचा एक विचित्र मासला.

संयुक्त प्रांतांत इटावा येथें घडलेल्या पोलिसांच्या वर्तनाचा एक विचित्र मासला बाहेर आला आहे. आठ वर्षांपूर्वी तेथील एक हीरा नांवाचा एक मनुष्य त्रिनिदाद येथें उद्योगधंद्यासाठीं गेला होता. तो तेथें थोडें बहुत द्रव्य संपादून नुकताच आपल्या पत्नीसह परत स्वदेशीं आला. त्याच्या कमरेचा रुपया याचा तोडा पाहून महमद जाफरखां नांवाच्या एका अर्थ लोलुप पोलिस इन्स्पेक्टराच्या तोंडाला पाणी सुटलें आणि त्यानें हीरावर चोरीचा आरोप ठेवून त्याला पकडलें, मारहाण केली व अटकेंत ठेविलें. इतकेंच नाहीं तर त्याच्याजवळची चारशें रुपयांची पुंजी हिरावून घेऊन सुटकेसाठीं आणखी वर वीस रुपये दक्षिणा मागूं लागला. ते कोणाजवळून तरी आणून हीरानें आपली सुटका तर करून घेतली, आणि कलकत्त्याच्या प्रोटेक्टर ऑफ इमिग्रंटस नांवाच्या अधिकाऱ्याकडे दाद मागितली. त्या अधिकाऱ्याला त्याची दया येऊन त्यानें पोलिस इन्स्पेक्टरवर काम चालविलें. इन्स्पेक्टर साहेब पकडले गेले व त्यांची चौकशी झाली. त्याच्यावर अपराध शाबीत होऊन त्याना पांच वर्षें सक्त मजूरीची शिक्षाही झाली. हें सगळें व्हावें तसें न्यायाचें झालें. या एका हीऱ्याचें भाग्य बलवत्तर ह्मणून सगळें ठीक झालें. पण पोलिसांत असे किती जाफरखा असतील आणि कित्येक हिरे त्यांच्या जुलुमाला मुकाट्यानें बळी पडत असतील हा विचार मनांत आला ह्मणजे कोणालाही अस्वस्थता वाटल्या वांचून राहणार नाहीं.

## वकील आणि जज्ज.

हायकोर्टाच्या जज्जाच्या जागीं हायकोर्टांतल्या अनुभवशीर व हुशार वकिलाच्या नेमणुका होतात हें सुप्रसिद्ध आहे. इंदूरचे हल्लींचे दिवाण सर नारायणराव चंदावरकर, सर आशुतोष मुकरजी, सरभाष्यं आयंगार वगैरे अनेक उदाहरणें देतां येतील. या सर्वांनीं आपलीं कामें उत्तम प्रकारें केलीं ही गोष्ट सरकारानें ही मान्य केली आहे. आतां प्रश्न असा उद्भवतो कीं जर हायकोर्ट वकिलांना हायकोर्ट जज्जाची जागा देतां येते तर डिस्ट्रिक्ट कोर्ट वकिलांत जे कोणी हुशार व अनुभवी असतील त्यांना डिस्ट्रिक्ट जज्जाचें काम करतां येणार नाहीं काय ? त्यांच्या जागीं सिव्हिलियनच नेमण्याची काय जरूर आहे ? या प्रश्नाकडे मद्रास सरकारचें लक्ष गेलें आहे व त्यांनीं डिस्ट्रिक्ट प्लीडरांतून डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्जाच्या नेमणुका करून अनुभव पाहिला आहे. तो अनुभव यशस्वी झाला आहे अशी खात्री झाल्यावर आतां बरहॅमपूर येथील सेशन्स जज्जाचे जागेवर त्यांनीं नुकतीच एका हुशार वकिलाची नेमणूक केली असल्याचें कळतें. या बद्दल मद्रास सरकार खरोखर स्तुतीस पात्र आहे. मद्रास सरकारचें अनुकरण इतर प्रांतिक सरकार ही करतील अशी आह्मी आशा करतों.

## एका तेजस्वी ताऱ्याचा अस्त.

ब्रिटिश राजकीय तारामंडळांतल्या एका तेजस्वी ताऱ्याचा गेल्या आठवड्यांत अस्त झाला. मि. जोसेफ चेंबर्लेन, युनिआनिस्ट पक्षाचे एक मोठे आधारस्तंभ आणि जकातीच्या प्रश्नाचे आद्यप्रवर्तक यांना दुष्ट काळानें ता. ३ जुलै रोजीं इहलोकांतून काढून नेलें. मि. चेंबर्लेन यांचें चरित्र अनेक तऱ्हेनें मोठें विचित्र व बोधप्रद आहे. त्यांचा दीर्घोद्योग, महत्त्वाकांक्षा, ब्रिटिश साम्राज्याविषयींचा अभिमान, दुसऱ्यावर छाप पाडण्याची अलौकिक शक्ति इ. लोकोत्तर गुणांनीं त्यांनीं ब्रिटिश लोकांवर आपली जादू चालविली कीं डिझरायली खेरीज करून गेल्या शेपंनास वर्षांत असा जादुगार ब्रिटिश मुत्सद्यापैकीं युनियनिस्ट पक्षांत तरी कोणी झाला नाहीं. हें कबूल करणें भाग आहे. यांचा जन्म १८३६ मध्यें झाला होता. लंडन युनिव्हर्सिटींतला शिक्षणक्रम पुरा केल्यावर ते प्रथम स्क्रू करण्याच्या कारखान्यात राहिले आणि १८७४ मध्यें तेथलें पेनशन घेतल्यावर मग त्यांनीं राजकीय विषयाकडे मोर्चा फिरविला. हुशार व महत्त्वाकांक्षी मनुष्य कोणत्याही मार्गांत पडला तरी आपला बुद्धिप्रभाव दाखविल्यावांचून राहत नाहीं असा नियम आहे. हा नियम चेंबर्लेन यांनीं अक्षरशः खरा करून दाखविला. प्रथम त्यांनीं पार्लमेंटांत लिबरल पक्षातर्फे निवडून येण्याचा यत्न १८७४ मध्यें केला, पण त्यावेळीं त्यांना यश आलें नाहीं. राजकीय शिक्षणाचा ओनामा घेण्याची शाळा म्युनिसिपालिटी होय हें ओळखून त्यांनीं प्रथम म्युनिसिपालिटीच्या कारभारांत मोठ्या उत्सुकतेनें लक्ष घातलें आणि ग्यासचा व पाण्याचा पुरवठा, आरोग्य, इमारती बांधण्यांत सुधारणा वगैरे गोष्टी संबंधानें लोकसेवा करून मग १८७६ मध्यें विख्यातवक्ते मि० जॉन ब्राईट यांच्या बरोबर ते पार्लमेंटांत निवडून आले. त्यावेळीं मि० ग्ल्याडस्टन हे मुख्य प्रधान होते. त्यांनीं मि० चेंबर्लेन यांची तरतरी व हुशारी पाहून त्यांस व्यापारखात्याचे प्रेसिडेंट नेमिलें. तेथेंही त्यांनीं दिवाळखोरीचा कायदा, पेटंटाबद्दलचा कायदा वगैरे अनेक व्यापारोपयोगी कायदे घडवून आपली हुशारी दाखविली. त्यामुळें ते मि० ग्ल्याडस्टन यांस प्रिय झाले. पण पुढें लवकरच होमरूल बिलाचा प्रश्न आला, तेव्हां मि० ग्ल्याडस्टन यांच्या विचाराशीं त्यांचे विचार न जुळल्यामुळें त्यांना लिबरल प्रधान मंडळांतल्या आपल्या जागेचा राजीनामा देऊन जावें लागलें. येवढी मोठी हुद्द्याची जागा केवळ मतस्वातंत्र्यासाठीं सोडणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. पण काम सोडल्यावर चेंबर्लेन सारखा चळवळ्या मनुष्याच्यानें स्वस्थ कसें बसवणार? त्यानें लागलीच लिबरल युनियनिस्ट पक्षाचें नायकत्व पतकरलें, व हळूंच रंग पालटतपालटत ते पक्के युनियनिस्ट बनले. इतके कीं १८९५ सालीं लॉर्ड सालिसबरी हे मुख्य प्रधान झाले तेव्हां त्यांनीं चेंबर्लेन याना वसाहतीच्या सेक्रेटरीची जागा दिली. व्हिक्टोरिया महाराणी साहेबांच्या कारकीर्दीच्या अखेरीस जें बोअरयुद्ध झालें त्याला पुष्कळ अंशीं कारण चेंबर्लेन हे होते. ते मुत्सद्देगिरीचा अर्क होते ही गोष्ट यावेळीं त्यांनीं जगाच्या निदर्शनाला आणिली. दुसरें कांहीं युद्धाला कारण सांपडेना, तेव्हां बोअर लोकांच्या वसाहतींत हिंदी लोकांचा छळ होतो ही सबब पुढें करून त्यांनीं युद्धाला प्रारंभ केला. पण या युद्धात इंग्रज जरी यशस्वी झाले तरी एकंदरींत त्यांनीं मिळविलेला विजय अपयशपेक्षां ही ज्यास्त मानहानिकारक झाला, तेव्हां त्याचें अपेश आपणावर येऊन आदळेल हें पाहून त्यांनीं युक्तीनें आपली वसाहतीच्या सेक्रेटरीच्या जागेवरून सुटका करून घेऊन ब्रिटिश लोकांवर आपली छाप बसविण्यासाठीं स्वदेशाभिमानाचा डोस भरपूर भरलेला असा जकातीचा प्रश्न उपस्थित केला, आणि त्यासंबंधानें ब्रिटिश लोकांमध्यें येवढी जंगी जागृति केली कीं लोक त्याला स्वदेशाभिमानाचा मूर्तिमंत अवतार समजूं लागले. अशारितीनें ग्रेट ब्रिटन मधल्या चांगल्याचांगल्या हुशार मुत्सद्यांना चकवून त्यानीं त्यांना आपल्या भजनीं लाविलें. ही कर्तृत्वशक्ति अलौकिक ह्मटली पाहिजे. सतारीची तार आतां ज्यास्त ताणण्यांत अर्थ नाहीं, ताणली असतां तुटेल हें जाणून १९०६ मध्यें त्यांनीं सार्वजनिक चळवळींना रामराम ठोकला; आणि परवा मरणापर्यंत ते पुनः कोणत्याही चळवळींत पडले नाहींत. तथापि युनिअनिस्ट पक्षाला

प्रत्येक अडचणीचे वेळीं त्यांच्याकडून गुरुमंत्र घेत असे असें ह्मणतात. सत्तरवर्षांचें वय होईपर्यंत ते इतक्या उत्साहानें सार्वजनिक कामें करीत असत कीं तरुणांनीं ही त्यांची उत्साहशक्ति पाहून तोंडांत बोटें घालावीं. मि. जोसेफ यांच्या या संक्षेपानें दिलेल्या चरित्रांत आमच्या लोकांना शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आढळतील. एका संस्कृत कवीनें ह्मटल्याप्रमाणें त्यांची राजनीति वारांगने सारखी चंचल होती. पण ही एक गोष्ट सोडून दिली तर त्यांच्या वर्तनांत नांव ठेवण्यासारखें कांहीं नव्हतें. त्यांच्या राजनीतींत सुद्धां स्वार्थापेक्षां स्वदेशहिताचाच भाग अधिक होता. कीर्ति लोभानें त्याना पछाडलें, तथापि देशहितावर पाणी ओतण्या सारखें नीच कृत्य त्यानें त्यांच्या हातून करविलें नाहीं. उलट कीर्तीच्या अभिमानें कां होईना, पण त्यांनीं आपला पेनशनचा काळ आळसांत किंवा निरर्थक वेदांतचर्चेंत न घालवितां सार्वजनिक कृत्यांत घालविला आणि ब्रिटिश साम्राज्यवादाचा पुरस्कार करून आपलें नांव ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासांत अमर करून ठेविलें. त्यांच्या इतका उत्साह, त्यांच्या सारखी वक्तृत्वशक्ति, व महत्त्वाकांक्षा आमच्या लोकांत ही कित्येकांच्या ठायीं असेल. नाहीं असें नाहीं. पण त्यांचे ते गुण अकार्यत्वामुळें जागचे जागीं गंजून जात आहेत. गुण अंगीं असूनही त्यांची योग्य कार्याकडे योजना होत नसल्यामुळें ते असून नसून सारखे होत आहेत. आह्मा लोकांना मि. चेंबर्लेन यांच्या चरित्रांत पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या खात्रीनें आढळतील. मि. चेंबर्लेन सारखा धूर्त, उत्साही, महत्वाकांक्षी, निरलस, आणि स्वदाभिमान प्रेरित अशा पांच चार व्यक्ति जरी आमच्यांत निघाल्या तरी आमचा हा प्रचंड देश सारें जग हरवून सोडील, हल्लीच्या अनेक बिकट प्रश्नांचा उलगडा झपाट्यानें होईल आणि ब्रिटिश साम्राज्यात आमच्या देशाला जें योग्यस्थान मिळावयास पाहिजे आहे तें त्यास मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

---

## आमचें प्राचीन शस्त्रवैद्यक.

मुंबई युनिव्हर्सिटी कलकत्ता युनिव्हर्सिटीपेक्षां श्रेष्ठ असा वृथाभिमान ना. गोखल्यासारखे महाराष्ट्रीय लोकाग्रणी किती ही धरोत, पण विद्वान्, शोधक, व लेखनकलानिपुण असे सपुत्र प्रसविण्याचा सर्व श्रेष्ठ हक्क आपला आहे असें कलकत्ता युनिव्हर्सिटीनें अनेकवेळां जगाच्या निदर्शनाला आणिलें आहे. या तिच्या हक्काला नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आर्यशस्त्रवैद्यकावरील प्रचंड ग्रंथानें चांगलीच पुष्टि आणिली आहे यांत शंका नाहीं. हा ग्रंथ दोन भागांत डा. जी. एन. मुकरजी यांनीं लिहून कलकत्ता युनिव्हर्सिटी प्रेसनें प्रकाशित केला आहे. आर्यवैद्यकांत चिकित्सा व निदान हीं प्रकरणें किती हीं चांगलीं असलीं तरी शस्त्रक्रियेनें रोग बरे करण्याची विद्या आर्यांना खास माहित नव्हती असें विधान मोठमोठ्या जाणत्या डाक्तरांनीं केलेलें आह्मांस ठाऊक आहे. डा. मुकरजी यांचा हा ग्रंथ पाहून त्यांना आतां आपली जीभ आवरून धरावी लागेल. आमच्या देशांत अशोकाच्या वेळेपासून इस्पितळें होतीं हें जसें आतां पाश्चात्यांना मुकाट्यानें मान्य करावें लागलें आहे तसें आर्य शस्त्रवैद्यकांत ही निष्णात होते, मूतखडा मोती बिंदूसारखे नेत्ररोग व उदरस्थ रोग शस्त्रक्रियेनें ते बरे करीत हें मि. मुकरजी यांनीं सप्रमाण दाखविलें आहे. ॲबडॉमिनल आपरेशन करणारे हुशार डाक्तर हल्लींच्या काळांत सुद्धां थोडे आहेत, पण या शस्त्रक्रिया दोन हजार वर्षांपूर्वी आमच्याकडे यशस्वी रीतीनें होत असत. त्याचप्रमाणें नाक कापलें असतां नवें नाक बसविणें या क्रिया ही त्यावेळीं ठाऊक होत्या. या क्रिया कोणत्या शस्त्रांनीं करीत असत त्याची वर्णनें चरकसंहितेंत आहेत. त्या वर्णन बरहुकूम शस्त्रांचीं चित्रें ही या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत दिलीं आहेत. इतक्या पूर्णत्वाला गेलेली आमच्यांतली शस्त्रक्रिया कालांतरानें नष्ट व्हावी ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. पण त्या विद्येला राजाश्रय मिळेनासा झाल्यावर तिनें तरी कशाच्या आधारावर जगावयाचें या प्रश्नाचें उत्तर कोणी देत नाहींत. हल्लींचीं शस्त्रें पूर्वींच्या पेक्षां शतपटीनें चांगलीं आहेत, व शस्त्रवैद्यकांत अचंबा वाटण्यासारखी प्रगति पाश्चात्य वैद्यकानें केली आहे, तेव्हां आतां आर्यशस्त्रवैद्यकाची महती गाऊन आणि पुरलेलीं मढीं उकरून काढण्यांत अर्थ काय आहे? असा प्रश्न कित्येक करीत असतात. त्यांना येवढेंच सांगावयाचें कीं गतवैभवाची आठवण काढून अश्रु ढाळण्यापासून दुसरा कांहीं फायदा नसला तरी तुमचे आर्यलोक जंगली, अडाणी होते, त्यांना कांहीं विद्या येत नव्हत्या, आह्मी आता तुह्मांस ज्ञानामृत पाजून माकडाचीं माणसें बनवीत आहों अशी नसती शेखी मिरविणारांचीं तोंडें अशा शोधांनीं बंद होतील, आणि आम्ही जरी आर्यांचे वंशज विपन्न स्थितींत आहेत तरी आमचे पूर्वज पाश्चात्य संस्कृतीचे ही पूर्वज आहेत येवढें तरी त्यांस अभिमानानें आह्मांस सांगतां येईल, आणि राष्ट्रीय अभिमानाच्या दृष्टीनें हा फायदा कांहीं सामान्य नाहीं. ह्मणून मि. मुकरजी यांनीं हा ग्रंथ इंग्रजींत लिहिल्याबद्दल आह्मीं त्यांना धन्यवाद देतों आणि अशी राष्ट्रसेवा त्यांच्या हातून आणखी घडत राहो असें इच्छितों.

---

## कर्तव्य क्षेत्राचें वर्तुळ.

मनुष्यानें सुशिक्षण प्राप्त करून घेतल्या नंतर आपल्या कर्तव्याचें क्षेत्र आंखून घेणें हें एक महत्त्वाचें कार्य त्याला करावयाचें असतें. आणि तें करण्यांत जर चूक झाली तर ती त्याला जन्मभर भोवते. त्यालाच भोवते असें नाहीं तर त्याच्याशीं संबंध घडणाऱ्या त्याच्या देशबंधूच्या हिताला ही ती हानिकारक होते. सुशिक्षित हिंदी तरुणांसाठीं हें कर्तव्यक्षेत्र एका उदार मताच्या ख्रिस्ती प्रोफेसरानें आंखून दिलें आहे तें येणें प्रमाणें —सुशिक्षित हिंदी माणसानें प्रथम आपल्या शाळेचा, नंतर युनिव्हर्सिटीचा, नंतर क्रमानें आपल्या गांवाचा, प्रांताचा, देशाचा, ब्रिटिश साम्राज्याचा, पूर्वेचा आणि नंतर एकंदर मनुष्यजातीचा अभिमान धरून त्यांच्या हिताची वृद्धि करण्यास झटावें. ही एकेक पायरी क्रमानें चढत जात असतां मागच्या पायरीचें विस्मरण मात्र होतां कामा नये. या क्षेत्रगोलाचा मध्यबिंदु नेहमीं मनुष्य स्वतः असणारच तो मनुष्य स्वभावाचा भागच आहे. पण स्वतःच्या मध्य बिंदूपासून चढत्या लांबीच्या त्रिज्येनें काढलेलीं निरनिराळ्या कालांतल्या कर्तव्याचीं हीं क्षेत्रें खरोखर फार महत्त्वाचीं आहेत. मनुष्यानें आपल्या शाळेविषयींच्या, नंतर स्थानिक म्युनिसिपालिट्या व सार्वजनिक संस्था यांच्यांत मन घालून मग प्रांतिक व एकंदर हिंदुस्थान विषयक प्रश्नांत हात घालावा, आणि त्यानंतर ब्रिटिश साम्राज्याचा अभिमान बाळगून त्याच्या पुढची पायरी ह्मणजे आपण प्राच्य देशांतले आहों, व पाश्चात्य ब्रिटिश साम्राज्याचेही एक घटक आहों हें लक्षांत ठेवून या दोघांत समदृष्टि उत्पन्न करण्याचा यत्न करावा. इतकी उदार दृष्टि झाल्यावर तिच्या बरोबर व्यावहारिक साधुत्वाचाही पुष्कळसा अंश आल्या वांचून राहणार नाहीं. मग तें साधुत्व एकंदर मनुष्य जातीच्या उपयोगीं पडेल. सदर प्रोफेसर येथेंच थांबले आहेत. परंतु खरोखर मनुष्याच्या कर्तव्याचें क्षेत्र आमच्याकडच्या गौतम बुद्धासारख्या थोर विभूतींनीं याच्याही पलीकडे ह्मणजे कीटकसृष्टी व नंतर एकंदर सृष्टि येथपर्यंत नेऊन भिडविलें आहे. पण हल्लीं उलट प्रकार होत नाहीं काय? मनुष्य अगोदर साऱ्या जगाची सुधारणा करूं पाहतो त्यानंतर प्राच्य आणि पाश्चात्य हा भेद त्याच्या लक्षांत येतो. त्याच्याही नंतर त्याचें लक्ष मधली ब्रिटिश साम्राज्याची पायरी गाळून तो स्वतःच्या देशाकडे वळतो. आणि त्यासंबंधाच्या शुष्क उठाठेवींतून फुरसत मिळाली तर तें स्थानिक गोष्टीकडे व संस्थांकडे वळतें, शाळेकडे वळण्यास विसरून शेवटीं स्वतःच्या सुधारणेला लागतें. ' हें सगळें आधीं कळस मग पाया रे ' असें विपरीत प्रकारें होतें ह्मणूनच सुशिक्षित हिंदी लोकांच्या प्रयत्नाला यश येत नाहीं.

---

## पोलीस खात्याचा वाढता खर्च.

जसजसा शिक्षणाकडे अधिक खर्च करीत जाल तसतसा तुमचा पोलीस खात्याचा खर्च कमी होत जाईल असें एकदां लॉर्ड मेकाले साहेबांनीं ब्रिटिश सरकारला उद्देशून केलेल्या आपल्या एका भाषणांत ह्मटलें होतें. पण हिंदुस्थानांत सध्यां उलट प्रकार दिसत आहे. हिंदुस्थान सरकार शिक्षणाकडे अलीकडे सढळ हातानें खर्च करूं लागलें आहे. पण त्या बरोबर पोलीस खात्याचा खर्च वाढतच चालला आहे. सन १९१०—११ सालीं हिंदुस्थानचा हा खर्च ६॥ कोट रुपये होता. १९१४ सालच्या बजेटांत ही रकम जवळ जवळ ८ कोटी पर्यंत गेली आहे! हें कसें? असें कोणी विचारील आणि लॉर्ड मेकाले साहेब चुकले असें ह्मणूं लागेल. पण नाहीं. वस्तुस्थिति लार्ड मेकाले साहेबांच्याच विधानाचें समर्थन करणारी आहे. खरोखर दिवसें दिवस खऱ्या गुन्ह्यांची संख्या शिक्षण प्रसाराबरोबर हिंदुस्थानांत वाढत नसून उलट कमी होत चालली आहे. पण सरकारची सुशिक्षितांविषयींची साशंकवृत्ति होत गेल्याचा हा परिणाम आहे. पोलिस खर्चाची जी वाढ झालेली आहे तींत बरीचशी रकम राजद्रोहाच्या शंकेमुळें ठेवाव्या लागलेल्या गुप्त पोलिसांच्या आणि राजद्रोही खटले कोर्टांत चालविण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चासाठीं ठरविलेली आहे. ही संशयपिशाचिका दूर होईल तर पोलिस खात्याचा बराचसा खर्च एकदम कमी झालेला दिसेल, लार्ड मेकाले साहेबाचें विधान अक्षरशः खरें आहे असें आढळून येईल. अलीकडे विलायतेंत होमरूल बिलासंबंधानें जी धामधूम चालली आहे तिच्या संबंधाची हकीकत वाचावी ह्मणजे असें दिसून येईल कीं तिकडे ज्या कित्येक तीव्र भाषणांविषयीं राजद्रोहाची शंका सुद्धां सरकारला येत नाहीं त्याच्या शतांश तीव्रता ही हिंदुस्थानांत खपत नाहीं. अशी स्थिति जेथें आहे तेथें पोलिसचा खर्च उड्या मारीत वाढत गेला तर काय नवल आहे?

---

## कॉड लिव्हर तेलाचा नवा उपयोग.

अलीकडे हिंदुस्थानांत मलेरिया नांवाच्या दूषित ज्वराचा प्रसार ज्यास्त होऊ लागल्यापासून त्याचा प्रतिकार करण्याकडे सरकारी अधिकाऱ्यांचें लक्ष विशेष लागलें आहे. हा रोग साचलेल्या घाणेरड्या पाण्यांत अंडीं घालणाऱ्या डासांपासून उत्पन्न होऊन त्यांच्या द्वारें तो पसरतो असें आतां सिद्ध झालें आहे व या डासांचा प्रतिकार करण्यासाठीं डबकीं, व जुनाट विहिरी बुजविणें वगैरे सारखे उपाय करून पाहण्यांत येत असतात. अलीकडे एका फ्रेंच शास्त्रज्ञानें हे डास नाहींसे करण्याचा एक सोपा उपाय शोधून काढला आहे. तो ह्मणतो कीं कॉड लिव्हर तेल जर थोडेसें घाणेरड्या डबक्यांत ओतलें तर तें माशा आणि डास या दोघांचाही नाश करतें. घोड्याच्या अंगाला हें लावल्यानें त्यावर माशा व डास बसत नाहींत, व घोड्याला ही कोणत्याही प्रकारें इजा होत नाहीं. प्रश्न इतकाच आहे कीं हें तेल महाग असल्यामुळें डबक्यांतून ओतण्याचा खर्च सरकारला परवडेल कीं नाहीं.

---

## बाजीराव आणि नेपोलियन.

मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडिया पत्रांत सी. ए. के. या सहीनें पुष्कळ वेळ फार वाचनीय ऐतिहासिक लेख येत असतात, हे लेखक ह्मणजे पुण्याचे सेशन्स जज मि. सी. ए. किंकेड साहेब होत ही गोष्ट आतां पुष्कळांना ठाऊक झाली आहे. यांनीं परवा एका लेखांत दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या अखेरच्या दिवसांचें वर्णन दिलें आहे, तें इतिहाससंग्रहांत पूर्वी येऊन गेलें आहे. तथापि हें वर्णन करतांना मि. किंकेड यांनीं बाजीराव आणि नेपोलियन यांच्यात तुलना केली आहे ती वाचनीय आहे. नेपोलियन विषयीं इंग्रज गृहस्थानें स्तुतिपर शब्द काढावयाच

ह्मणजे अब्रह्मण्यं असा एक काळ होता. नेपोलियनला तो कैदेंत असतांना वेड लागलें होतें, तो आपलें दैन्य लोकांपुढें दाखवून त्यांचें फाटके तुटके कपडे मागुन आणून पांघरीत असे, खाण्यासाठीं पुढें आणिलेल्या सुग्रास अन्नावर थुंके, आणि मागाहून तेंच अन्न आधाशीपणानें खाई वगैरे किळस आणणारीं आणि नेपोलियनच्या कीर्तीला कलंक लावणारा वर्णनें प्रसिद्ध करण्यांत कित्येक इंग्रज लेखकांना मोठा अभिमान वाटे, पण अलीकडे तें मन्वंतर बदललें आहे, आणि नेपोलियननें आपला मानी स्वभाव विपन्नावस्थेंत अतिशय तीव्र कसोटीला लागला असतांही सोडला नाहीं, त्याच्यावर देखरेख करण्यासाठीं ठेविलेला इंग्रज गव्हर्नर मि० लो हा त्याच्यापुढें जातांना थरथर कांपत असे, आणि सर्कशींतल्या वाघाच्या पिंजऱ्यापुढें उभें राहिलेल्या मुलाची वाघाची गर्जना होतांच जी स्थिति होत असते तशी त्याची स्थिति होई वगैरे खऱ्या गोष्टी आतां बाहेर येऊं लागल्या आहेत. मि० किंकेड यांनीं ही आपल्या लेखांत नेपोलियनची योग्य स्तुति केली आहे, आणि सगळें युरोपखंड ज्यानें हलवून सोडलें त्या नेपोलियनला इंग्रज सरकाराकडून मिळणाऱ्या नेमणुकीच्या मानानें बाजीराव पेशव्यांना मिळणारें ८ लक्ष रुपये पेनशन किती ज्यास्त होतें याविषयीं आश्चर्य दर्शविलें आहे. नेपोलियननें स्वाभिमान मरेपर्यंत सोडला नाहीं. बाजीरावाचो स्वाभिमानाशीं ओळखच नव्हती. असती तर बिठुर येथें नाचतमाशे व चैन करण्याचें, इंग्रज अधिकाऱ्यांना पार्ट्या देण्याचें एका युद्धाचे वेळीं स्वतःच्या खर्चानें दोन पलटणी ठेवून इंग्रजांना साह्य करण्याचें, व ईस्ट इंडिया कंपनीला एकदा मोठी कर्जाऊ रकम देण्याचें त्याच्या मनांतच कधीं आलें नसतें. बाजीराव पेशव्याचें हें वर्णन वाचलें ह्मणजे त्यांच्या कारकीर्दींत अर्थात १९ व्या शतकाचे प्रारंभीं मराठे लोकांची स्थिति नीतिदृष्ट्या किती निकृष्ट झाली होती त्याची बरीच कल्पना करतां येते, आणि पेशव्यांचें राज्य घालविण्यास बाजीराव हा निमित्त मात्र होता, पण तें राज्य नष्ट होण्याचें खरें कारण मराठे लोकांची नीतिभ्रष्टता ही होती असें वाटूं लागतें. येथें ही नेपोलियनाविषयींच्या इंग्रज लोकांनीं लिहिलेल्या असत्य वर्णनासारखा कांहीं प्रकार नसेलना? अशी शंका येणें स्वाभाविक आहे. पण तशी शंका घेणें व्यर्थ आहे हें इतिहासज्ञांस पूर्णपणें ठाऊक आहे.

---

## आधुनिक गुरु.

### अवस्था तिसरी

[गुरु शास्त्राधार धुंडतात.]

अंक २२ वरून पुढें चालूं

या प्रकारच्या अंतःकलहात बरांतील लठ्ठाकठ्ठी उर्फ झोंबाझोंबींत स्त्रियांजवळ गुरु सद्गुरु पद पटकावतात आणि पुरुष तरी त्यांस समर्थांच्या उक्तीतील आडक्याचे तीन गुरु किंवा तुकारामाच्या

घालूनियां मध्य वर्ती। दाटुनि उपदेश देती ॥
ऐसे पोट भरे संत। तयाकैंचा भगवंत ॥
रांडा पोरांत गोविती। वर्षासन ते लाविती ॥
जने बोलती निरोपणीं। तैसी न करिती करणी॥
तुका ह्मणे तयां। तमोगुणि यांची क्रिया ॥

या वर्गांत किंवा घंटा विशेष सधूंच्या अंधकार वनांत, किंवा सुमारें ४० वर्षांपूर्वी पुण्यग्रामांत त्यावेळच्या पुण्याच्या वर्णनांत प्रसिद्ध केलेल्या जिनगर स्वामी वर्गांत, किंवा मिथ्या प्रवास वर्णणानें [संत दर्शनानें] संत पद पटकावलेल्या सद्गुरु वर्गांत किंवा नृत्यसंगीतप्रिय गुरु वर्गांत ढकलून देतात व 'संगंत्यक्त्वा सुखी भवेत्' असें उमजून वर्तन करतात. वर आह्मी समायीक कुटुंब पद्धतीचे फायदे सांगितले आहेत, परंतु त्याच पद्धतींत एक व्यंग आहे. कुटुंबें विभक्त होण्यापूर्वीं संधि कालांत समायीक कुटुंबाचें गाडें बऱ्याच कष्टानें ओढलें जातें. अंतःकलह माजतो, सर्वांस भासतो, पण कोणी स्पष्टपणें बोलून विभक्त होत नाहीं. तद्वतच शिष्य साशंक होऊन वियुक्त मनानें सांप्रदायास चिकटून रहातात. गुरुजी ही शिष्याची ताराबळ ओळखतात. त्याचा धर्म भोळेपणा वाढवतात. निसर्ग देवतेनें निर्माण केलेले व श्रुतिस्मृतींत 'पुत्रोवै आत्मनामासीत्' 'पुत्रःपूर्वेषां ऋणनिर्मोक्ष साधनम्' इत्यादि वाक्यांनीं घटित जो पिता पुत्र संबंध तोही तुटतो. पति पत्नी संबंध तुटतो. दत्तक संबंध तुटतो पण एकदा का पाणी सोडवून घेऊन गुरुनें आपणास गुरु करून घेतलें कीं त्याचा संबंध मात्र जन्मजन्मांतरीचा!!! गुरु लक्षणें गुरूंत नसलीं तरी हरकत नाहीं. यासंबंधाची मुख्य बीजें, जीं सामर्थ्य (गुरुपक्षीं) व श्रद्धा [शिष्यपक्षीं] तीं नसलीं तरी हा संबंध दुर्ध्य आहे असेंच गुरु लोक शास्त्राधारानें प्रतिपादित रहातात. शिष्याची त्रेधा तिरपिट उडवतात. हल्लींचा काळ धर्मास प्रतिकूळ आहे असें ह्मणत मनगटें तोडतात. ज्या शास्त्राची पायमल्ली करून स्त्रियास उपदेश देतात त्याच शास्त्रातील आधार देऊन हा संबंध तुटू शकत नाहीं असें प्रलाप करीत रहातात. याच्या जवळ आणखी एक चाल असते तिचा आपलें समाधान करण्याकडे उपयोग करून घेतात. आपल्या हिंदु लोकांचे कांहीं ठळठळीत दोष कष्टानें कबूल करावे लागतात. त्या सर्वांत भाषणांत व्यर्थी शद्ब योजण्याचा एक भयंकर दोष आहे. व्यर्थी भाषा साक्षात अनृताची सख्खी बहीण आहे. संदिग्ध ऊर्फ दुटप्पी शद्बानें धर्मराजास देखील एक बोट गळून स्वर्गास जावें लागलें. एकवेळीं असत्य बोलल्यानें जर अशी विपत्ति ओढवते तर जो समाज व्यर्थी भाषेचा गौरव करतो त्या समाजाच्या नीतिमत्तेस काय ह्मणावें हें निदान आह्मांस तरी कळत नाहीं. हे गुरु नेहमीं मुखानें ह्मणत असतात "आमचे काय आह्मी मानवदेहरूपी आहोंत. गुरु ह्मणजे आत्मा. आत्मा हा प्रत्येकाचा गुरु आहे. आत्मा दिसूं शकत नाहीं. ह्मणून तो कोणाच्या तरी देहानें तुह्मांवर कृपा करतो. अशा देहधारी पुरुषास तुह्मांस वाटल्यास माना, वाटल्यास नका मानूं. येथें गुरु झाले दोन; एक आत्मा, आणि हे एक देहधारी पुरुष. गुरूंत आत्मा आहे तर तो शिष्यांत नाहीं काय? ही विगलीत अहंकार संवेदना नुसती बोलण्या पुरतीच. अहंकार विगलितांनां आह्मी गुरु ही भावना तरी कोठली तसेंच त्यक्तकर्मज्ञान्यांनां शिष्यास मोक्ष देण्याची कर्मवासना कोठली आणि कशासाठीं.

श्री एकनाथ महाराजांनीं भागवतांत गुरूचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यापैकीं कांहीं खालीं देतों:—

शिष्यां पासून सेवा घेणें।
हें स्वप्न ही न स्मरे मनें।
शिष्याची सेवा स्वयें करणें।
पूजलें पाहणें निज शिष्या ॥३००॥
शिष्य देखावा पुत्रा समान।
हें श्रुतिवाक्य नमानी प्रमाण।
दृष्टि देखों नेणें गौण।
शिष्या देखे पूर्ण ब्रह्मत्वें ॥३०१॥
आपुल्या योग क्षेमाचें सांकडें।
स्वप्नींही न घाली शिष्याकडे।
शिष्य संकट आणि गाढें।
निवारी रोकडें निजांगें जो ॥३०४॥
ऐशिया पूर्ण प्रतीती ।
आचरोनी दावी भक्ति ।
हरि भजावा सर्वांभूति ।
हेंच शिष्या प्रति उपदेशी ॥३१०॥
हीं सद्गुरूचीं निज लक्षणें ।
पंडिता न कळती ज्ञातेपणें।
पूर्णानुभवी जाणती खुणें।
इतरांचें जाणणें पांगुळें तेथें ॥३११॥
ए० भा० अ० ३
तुज पावलें माझें मन ।
उपदेशीं शिष्य जन ।
ते तुज देतील सन्मान।
तरी तूं ज्ञानाभिमानी धरूं नको॥८१०॥
सत् गुरूशीं सर्वांभूतो ।
सर्वदा ब्रह्म प्रचीती ।
तेथें शिष्याचिये भूत व्यक्ती।
काय ब्रह्म स्थिती पळाली ॥८३१॥
यालागीं शिष्यीं नीचपण।
सर्वथा न देखावें आपण।
शिष्य देखावा ब्रह्म पूर्ण।
हें मुख्य लक्षण गुरूचें ॥८३२॥
ए० भा० अध्याय २९

याप्रमाणें भगवंत उद्धवास गुरुलक्षण सांगून सावध करतात. या लक्षणांचे गुरु शिष्य मनावर वृत्ति रूपानें रहातात. त्यांस भयंकर शाप उच्चारून अगर शास्त्राधार काढून आपला संबंध स्थापावा लागत नाहीं व वल्गनाही कराव्या लागत नाहींत. हा वेडगळ धर्म समजुतीचा एक प्रकार कृत्रिम गुरूंस उर्फ कानफुक्या भगलंपट मंत्रगुरूंस प्रचलित करणें भाग पडतें.

अपूर्ण

---

## आशियांतील लोकांच्या बंदीचें बिल.

सदर्हू बिल सध्या युनायटेड स्टेट्सच्या कांग्रेस पुढें विचारा करितां आलें आहे. त्याचा मुख्य उद्देश आशियांतील मजुरांस अमेरिकेंत येण्याची बंदी करण्याची आहे. अमेरिकेंतील हिंदी गृहस्थास जेव्हां ही बातमी समजली तेव्हा तेथील हिंदुस्थान असोसिएशनच्या कालीफोर्नियांतील शाखेनें वरील विषयासंबंधीं चळवळ करण्याकरितां एक कमेटी नेमली. ता० १।१।१९१४ ला या कमेटीनें एक सभा भरविली व असें ठरविलें कीं वरील बाबतींतील तक्रारी अमेरिकन सरकार पुढें मांडण्याकरितां कांहीं मंडळींनीं वाशींगटनला जावे. स्टॉकटन [कालीफोर्नीया] येथील खालसा दिवान सोसायटीचे सेक्रेटरी सेंटडारासिंग यांनीं सोसायटी खर्च देण्यास तयार आहे असें सांगितलें. ता० ३।२।१९१४ रोजीं भरलेल्या सभेंत खालसा दिवान सोसायटीनें खालील मंडळीस वरील बाबींत बोलण्याची वगैरे पूर्ण मुभा देऊन आपले तर्फे मुखत्यार नेमलें.

१ प्रोफेसर सुरेंद्र बोस M. A. P. H. D.
२ डा. बिसनसींग ३ मि. हरदयाल.

वरील डेलीगेट ता० ९।२।१९१४ सोमवारला वाशिंगटनला पोंचले. मध्यंतरी वरील बिल, जपान सरकारशीं पत्रव्यवहार सुरू असल्यामुळें, पास होण्याचे दिरंगाईवर पडलें. तरी वर्तमान पत्रांचे संपादकांनीं वरील हिंदी गृहस्थाचे कार्याविषयीं उत्तेजनपर व स्तुतीपर लेख लिहिले व सभासदाचा सत्कार केला. प्रोफेसर बोस डॉ. बिसनसिंग यांनीं सेक्रेटरी ऑफ स्टेट ऑ. ब्रायन व ऑ. विल्सन याची भेट घेतली. त्यांनीं ब्रिटीश वकील सर आर्थर सेसिल स्प्रींगराईस यांचीही गाठ घेतली व त्याना विचारलें कीं ज्याअर्थीं वरील बिलामुळें ब्रिटिश प्रजाजनांपैकीं बऱ्याच मोठ्या भागाचे नुकसान होणार आहे त्या अर्थी त्यांनीं या बाबतींत कांहीं शिष्टाई केली किंवा काय. सर आर्थर साहेबांनीं जबाब दिला कीं ब्रिटिश सरकारपासून कांहीं एक सूचना नसल्याकारणानें त्यांनीं कांहीं केलें नाहीं. अमेरिकन सरकार पुढें ही गोष्ट मांडाल काय असा प्रश्न केला असतां त्यानीं सांगीतलें कीं इंग्रज सरकारशीं पत्रव्यवहार करीन व या पेक्षां जास्त या विषयावर बोलणें शक्य नाहीं असें सांगीतलें. दुसरें दिवशीं त्यांनीं वाशिंगटन पोस्ट वर्तमानपत्रांत सार्वजनीक उत्तर दिलें कीं वरील विषय फार मोठा आहे व त्याचें निराकरण ब्रिटिश वकिलातींतून होणें शक्य नाहीं. या उत्तरावरून ब्रिटिश वकीलातीचा रोख दिसून आला. पुढें आयोवा येथील टाउनराच्या मध्यस्तीनें इमायग्रेशन कमिटीचे अध्यक्ष ऑ. बरनेट यांची मुलाखत वरील हिंदी मुखत्यारांनीं घेतली. वरील बरनेट साहेबानीं ता० १३-२-१९१४ ला भरलेल्या कमेटीच्या सभेंत त्याचें ह्मणणें ऐकून घेतलें. प्रो. बोस व डॉ. बिसनसिंग यांनीं कमेटी पुढें हजर होऊन हिंदी रहिवाशांतर्फे एक मेमोरियल अर्पण केलें. प्रो. बोश हे एक तासभर बोलले. त्याना या अवधींत फार कठीण प्रश्न विचारले गेले. विशेषेकरून कालीफोर्नीयांतील एका कांग्रेस समासदानेंच त्याना फार प्रश्न विचारले व पुष्कळ अडचणी दाखविल्या पण त्यांनी त्या सर्व अडचणींतून प्रश्नाचीं उत्तरें फार चातुर्यानें दिलीं. हिंदी लोकांतर्फे बोलण्याकरितां एक अमेरीकन बाई ही तेथें आली होती. वरील सभा अंदाज चार तास चालली होती. वरील सभेची सर्व हकीकत कांग्रेसकडून छापली जाईल. ईव्हनिंग स्टॉर वर्तमानपत्रानें सभेची त्रोटक हकीकत खालीलप्रमाणें दिली आहे.

डॉ. बोश ह्मणाले कीं जर हिंदू लोकांना बंदी करावयाची आहे तर दोन्ही सरकारनीं (ब्रिटिश व अमेरिकन) एकमेकाशीं सम्मतीचा

करार मदार करावे. जपानच्या लोकांच्या बंदी विषयीं विशेष कायदा नाहीं तर हिंदू लोकां-विषयींच का असावा. त्यायोगानें हिंदू लोकांची किंमत फार कमी होईल. ब्रिटिशकॉलनी अशा तऱ्हेचे कायदे करीत आहेत ही गोष्ट खरी आहे पण इंग्रज सरकारपुढें या बाबतींत काय करावें हा मोठा प्रश्न आहे व त्याचा अजून निकाल झाला नाहीं. जर वरिष्ट सरकार कॉलनीच्या या कृत्यास अनुमोदन देईल तर फार भयंकर परिणाम होईल. हिंदू लोक आर्य आहेत ह्मणून त्यांना या देशाचे नागरीक होण्याचा हक्क आहे. इमायग्रेशन कमीशनर मि. क्यामिनेटी यांशीं बोलतांना असें सांगीतलें गेलें कीं निदान बिलाची शद्वरचना तरी बदलली जावी. हल्लींच्या बिलांत बंदी केलेल्यांची यादी दिली आहे ती अशी. सर्व हिंदू मजूर, मूर्ख, पागल, नादार वगैरे. या रचनेमुळें हिंदू लोकांचा अपमान होत आहे.

डेलीगेट लोकांची भेट घेण्या करितां प्रेसीडेंट वुडोविलसन साहेबांनीं ता. १६-२-१४ सोमवार १०-३५ ची वेळ ठरविली होती पण आजारी-पणामुळें भेट होऊं शकली नाहीं. त्यामुळें बोश वगैरे मंडळीची फार निराशा झाली.

हिंदू लोकांचा मज्जाव व्हावा असे प्रति-पादन करणाऱ्या लोकांचे हातांत ब्रिटिश कॉलनीतील कायदे हें एक मोठें शस्त्र होऊन बसलें आहे. जरी बिलाचें वाचन जपानशीं चाललेल्या पत्रव्यवहारामुळें लांबणीवर पडलें आहे तरी कांहीं कांग्रेस सभासद इतके उतावीळ झाले आहेत कीं त्यांचें ह्मणणें आहे कीं हिंदूंच्या बंदीचें बिल ताबडतोब पास करावें. व नंतर पुढ सर्व एशीयाच्या लोकांचें सार्वजनिक बिल पास करूं. वरील हिंदू-सभासद आपलें असामर्थ्य जाणून आहेत. कारण त्यांना शक्तिमान राष्ट्राचा पाठिंबा नाहीं. तरी पण ब्रिटिश वकीलातीच्या मदती-शिवाय त्यांनीं आपलें कर्तव्य केलें आहे.

## वऱ्हाडवृत्त

हवामानः— गेल्या आठवड्यांत एकदोन दिवस दुपारी साधारण पाऊस पडला. आकाश साभ्र असून पावसाचें नुसतें अव-डंबर माजतें. ८ ह्लीं दोनतीन दिवसांत सूर्य-दर्शन नसून हवा अगदीं सर्द झाली आहे. अंगाला झोंबणारा असा वारा वहात असतो. ऋतुमाना प्रमाणें साधारण हिंवताप पडसें खोकल्यां शिवाय रोगराई विशेष नाहीं. पेर-ण्याचें काम जारीनें सुरू आहे.

रा. रा. हकॉक, इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस, याची नेमणूक तूर्त काहीं दिवसां-करितां हिंदुस्थान सरकारकडे झाल्यामुळें त्यांचे बदलींत येथील डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस रा. रा. जी. डब्ल्यू गेयर यांची मध्य-प्रांताचे डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस या बढतीचे जागीं नेमणूक झाली आहे.

### नोटीस.

तमाम सावकार आणि इतर लोक व गुणापा सखाराम आपा तेली रा० फत्तेखेडा ता० मेहेकर

यांसः—

खालीं सह्या करणार यांजकडून कळ-विण्यांत येते कीं नामे चतुरी मर्द हान वता तुपकर ही आमची चुलती व भाव-जई असून तिचा नवरा मरण्यास तीन महिने झाले तिचे पोटीं पुत्रसंतान काहीं नसून नुकतीच ती वयात आली आहे. ती गंधर्व लाऊन जाण्याचे विचारांत आहे करिता जाहिर करण्यांत येते कीं, मौजे गुंज प्र० फत्तेखेडे ता० मेहेकर येथील

| सर्वे नंबर | एकर गुंठे | आकार रु० |
|---|---|---|
| ९ पै. ३ | ७॥१० | ३॥ |
| २१ | २७॥१० | १६ |

ह्या जमिनी व जागा अशी आमची सर्व जिंदगी एकत्र आहे ती वाटलेली नाहीं फक्त भाकरी वेगळ्या खात होतों. जमीनी सावकार लोकांच्या ताब्यांत असोन नं० ९ पैकीं ३ ची जमीन साल मनकुरीं सुटली आहे व ती आमचे ताब्यात आहे नंबर २१ ची दोन वर्षांनीं सुटणार आहे. चतुरी ही आमचे कुळांत राहील तोपावेतों अन्न-वस्त्राची मालकीण आहे. हानवता याचें कर्ज-योग्य असेल तें आह्मी देण्यास तयार आहों. करितां चतुरी पासून कोणी कोणत्याही प्रकारें आमची समाईक जिनगी कोणी लिहून घेऊं नये. कोणी कोणत्या रीतीनें घेतल्यास आह्मी जबाबदार नसोन ताबा मिळणार नाहीं. तिजला अन्न देण्यास तयार आहोंत. करितां आगाऊ सर्वत्रास कळविलें आहे. कळावें ता० १-७-१४

सही

नि० रामा वा॥ आपाजी तुपकर.
नि० राजाराम वा॥ कोंडु आ० पा०
आत्मा आनंदा वा॥ रावजी तुपकर
रा० सावगी व गुंज प्र० खेर्डे
नो. नं, १६ ता० मेहकर

### नोटीस

हसाजी वा राघो व २ सोनाजी वा॥ परसा व ३ नारायण वा॥ तुकाराम व ४ आपाजी वा॥ गंगाराम सेळकी रा० मौजे नायगांव प्र० व ता० मेहेकर जि० बुलडाणें

यांसः—

नो० दे० भीमाई मर्द जानजी सेळकी रा० नायगाव प्र० व ता० मेहेकर नो० देते कीं मी तुह्मास सुमारें २॥-३ वर्षें झाली कुलमुखत्यार पत्र दिलें आहे. तुह्मी माझे जिनगीची अफरातफर करून सर्व नुकसान केलें आहे व माझा नंबर वहीत करीत आहा. व माझा घेण्या देण्याचा हिशेब देत नाहीं. करितां नोटिशीनें कळ-विण्यांत येते कीं तुमचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. माझे तर्फे तुह्मी कोणतेंही काम करूं नये केल्यास तें मनला कबूल नाहीं व त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. माझा नंबर माझे ताब्यांत देऊन देण्या-घेण्याचा हिशेब आठ दिवसांत द्यावा. तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजविज करिन व खर्चासुद्धां रुपये भरून घेईन मग तक्रार चालणार नाहीं कळावें तारीख १।७।१४ इ०

सही

नि० भीमाई मर्द जानजी इची

नो० नं० १७


## सेंटचा राजा

वापरून तर पहा!!

# ओटो सुगंधीचा भांडार दिलचमन

( रजिस्टर्ड )

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे ओटो दिलचमन जास्त टीकाऊ मधुर आणि अधीक खुशबोदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी ओटो दील—चमन वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यांत स्पीरिट बिलकूल नाहीं, चमेली आणि बटमोगरांच्या ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुंगधाचा भांडार प्रस्तुत होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होइल.

किंमत -॥- ड्रामची टयुब ८ आणे
" -।॥- " " १२ आणे

किंमत -॥- औंसाची बाटली १ रुपये.
व्ही. पी. पो. खर्च वेगळा.

ओटो दीलचमनची सुगंधी कार्डें दर डझनास १२ आणे,
सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याची टिकीटें पाठवा.

सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें खरेदी करतेवेळीं ओटो दीलचमन हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्यावर लिहून माल मागवावा.

एकटे एजंटस् **एच्. आर. मोदी आणि कं.**

तारेचा पत्ता "नेकेरीन" मुंबई. — विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर मुंबई.



वार्षिक वर्गणी टपाल व्ही. पी. सह १०२
वर्षारंभ जुलै.

### बाल सन्मित्र पुस्तक माला.

या मालत सन्मित्रा प्रमाणें सदुपदेश करून चांगलें वळण लावणारीं, सोप्या पण चटकदार भाषेंत लिहिलेलीं १००।१०० पृष्ठांचीं मनो-रंजक व अत्यंत उपयुक्त पुस्तकें वर्षांत चार प्रसिद्ध होतात. डॉ. सर भालचंद्र; रा. ब. चि. वि. वैद्य एम्. ए. एल्. एल् बी. रा. ब वि. मो महाजनि एम्. ए. रा. सा. गो. वा. कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी; रा. सा. वि. कों. ओक; ह. ना. आपटे वा. गो. आ. बी. ए इ सुप्रसिद्ध विद्वान् गृहस्थांचे उत्कृष्ट अभिप्राय मालेंतील विक्रीचीं पुस्तकें १ अभ्यास ( अत्यंत उपयुक्त निबंध ) २ दिवाळीची देणगी ३ नीतिभूषण ४ सद्बोध रत्नहार, ( तिहींतही गोष्टी, कविता, निबंध, नाटकें, चरित्रें, पत्रें इ० उत्कृष्ट विविध विषय ) प्रत्येक पुस्तकास व्ही. पी. नें ०८ एकदम चारी घेतल्यास १०७ नवीन वर्गणीदारांस फक्त १०३ पडतील.

एजंट परचुरे पुराणिक मंडळी मुंबई नं० ४ — व्यवस्थापक बालसन्मित्र कार्यालय मुंबई नं० २ अगर मालवण जि० रत्नागिरी.

नो. नं. १९


### नोटीस

विद्यमान सबजज्य साहेब

कोर्ट मलकापुर

रामराव हिंमतराव देशमुख— रा. निमगांव ता० मलकापुर } अर्जदार

वारसाचे सर्टीफीकेट मिळण्याचा अर्ज या नोटीसीचे द्वारें सर्वत्रास कळविण्यांत येते कीं, मौजे निमगांव ता० मलकापूर जि० बुलडाणे येथील रहीवाशी हिंमतराव भगवंतराव देशमुख हा ता० २६-४-१९११ इ० रोजीं मयत झाला असून सदर्हु मयत हिंमतराव भगवंतराव यांस आपण वारस असल्याबद्दल वारसाचे सर्टीफीकेट स्वतःस—मिळण्या करितां सदर्हु अर्जदार यानें अर्ज केला आहे. व त्याची सुनावणीची ता० २९-७-१४ नेमिली आहे. तरी सदर्हु अर्जदारास वारसाचे सर्टीफीकेट देण्याविरुद्ध ज्या कोणास कारण दाखवीणे असेल त्यांनीं आमचे कोर्टांत सदर्हु ता० २९-७-१४ रोजीं स्वतः अगर वकीला मार्फत हजर रहावें.

हीं नोटीस आमचे सही निशी व कोर्टाचे शिक्यानिशीं ता० ७-७-१४ इ० रोजीं दिली आहे.

N. C. Tiwary
Sub Judge
Malkapur.

No. No. 20

**तांबूल नवरत्न** — न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखु** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

**मद्रासी नस** — अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे

**केस काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकान्त बाम** — मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार- आकोला.

नो. नं. ११



## Oriental Government security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4½ CRORES.

ESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 888 | ·8,668 | 2,63,38,000 |
| 893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80,05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32 356 |
| 1903 | 41,07,009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

MMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 2, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company e been calculated on an increasingly stringent basis. On this occasion e has been a further addition to the reserves and the financial position he Company has been further strengthened. The resources of the pany are now so ample that the security which they afford is undoubted Policyholders and Shareholders alike may confidently look forward to ontinuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The ntal is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy ers with a absolute security and poss ssing all the important factors essential first class office it commands the full confidence of the public.

LUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL Full particulars, prospectus and prosposal f rms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C.P. Berar & Khandesh,*
NAGPUR.

N. No. 12



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ·॥· औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १३



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

## राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

## राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १४



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापारिला.



हा सार्सापारिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव

नो० नं० १५ ५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख २० माहे जुलै सन १९१४ इ० [ अंक २८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¾ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } J. G. Ridland. एजंट

न० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ३

### हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं॰ रु. १०८॰

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

## 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते हिंगोली व्हाया वाशीम लौकरच रेलवे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ६ वऱ्हाड

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं. ७

## "खरें पौष्टिक औषध"

पाहिजे असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकुन गुण देते, असे वंगभस्म वापरा किं. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाल भस्म तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. ज्यांना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळयांत, उन्हाळी लघवींत आग, धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु. शिवाय पौष्टीकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपैण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमाची जरुरी नाहीं. किं. ८ आणे वि. खु. क्याटलाग मागवा. फुकट--व्ही. आर. मुळे, नांदुरा, जी. आय. पी.

नो. नं. ८

बंगाली कथानकाचे आधारें लिहीलेली

## मधुर-मीलन.

लेखक--श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर.

**वाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी अत्यंत चित्तवेधक नवी कादंबरी.**

कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण चटकदार. प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठ-आणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना–सिटी

नो. नं. ९

## *WANTED.*

Two Matrics having knowledge of Science and drawing on Rs. 25 and 30 per month respectively for the A. V. School Nandura. The successful candidates shall have to execute a bond to serve at least for one year. Apply shorp with certificates to the

1—7—14 } President—E. School Committee Nandura Berars

No. No. 10

श्रीराम, श्रीहरी, सच्चिदानंद, ॐ दत्त कृष्ण, विठ्ठल, संतदर्शन व मोनोग्राम ह्याकार्डसा ९ प्रुफांत दुर्मीळ साधुसंतांचे २९० फोटो ! किं. २। रु. चौऱ्याशी आसनें, लोकोत्तर चमत्कार, सृष्टींतील अद्भुत चमत्कार व मनोविकार ह्याका. सा. ४ प्रुफांत २०० फोटो ! किंमत १ रुपया.

श्री. वा. नगरकर नाशिक

नो. नं. ११

## जाहिर नोटीस

सर्वत्र साहू सावकार व इतर सभ्य गृहस्थ मु० नीरपूर ता० मलकापूर व इतरांसः—

या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामे दगडू बुरकले रा० नीरपूर ता. मलकापूर हा कांहीं वाईट लोकांच्या नादीं लागून माझी जिनगी गमावण्याच्या बेतांत आहे तरी सर्वत्रास विनंती कीं त्याजपासून कोणी जिनगी गहाण खरेदी अगर पठ्यानें घेऊं नये किंवा सदरहू गृहस्थास कोणी कर्ज देऊं नये. दिल्यास त्या बद्दलची जबाबदारी माझेवर अगर माझे जिनगीवर राहणार नाहीं. वरील गृहस्थाशीं व्यवहार करून कोणी बुडू नये ह्मणून आगाऊ कळविलें आहे. क. ता. १०-७-१४ इ.

सहीची निशानी आंगठा
दत्तु वा गोविंदा बुरकले रा. आळमपूर
यांचा खुद्द असे

नो. नं. १२

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ वद्य १२ शके १८३६

## लोककल्याण.

मिसेस बिझांट बाईच्या संबंधानें मध्यंतरी गैरसमज होऊन त्यांच्यावर अनेक घाणेरडे आरोप करण्यांत आले होते तथापि जगांतल्या सर्व राष्ट्रांत त्यांच्या संबंधानें लोकांत किती विश्वास व पूज्यबुद्धि आहे हें थिओसॉफिक सोसायटीच्या मुख्य अध्यक्षाचे जागीं त्यांची पुनः निवड झाली व ही निवड हिंदुस्थान, इंग्लंड, आस्ट्रेलिया, रशिया, अमेरिका वगैरे सर्व देशांतल्या लोकांकडून बहुमतानें झाली आहे यावरून चांगलें दिसून येत आहे. या बाईला मिळालेली मतांची संख्या आश्चर्य वाटण्यासारखी मोठी आहे- इतकी मोठी कीं कित्येक देशांतल्या लोकांकडून मतें येण्याची वाट न पाहतांच ही निवड झालेली आहे. या बाईचें कर्तृत्व नुसतें थिऑसॉफिकल सोसायटी पुरतेंच नाहीं तर तत्त्वज्ञान, राजकारण, आरोग्य, शिक्षण, वर्तमानपत्रांचें संपादकत्व या सगळ्याच बाबतींत तें कर्तृत्व दांडगें आहे. या बाईनें जें काम हातीं घेतात तें तें अगदीं अद्भुत व निर्दोष रीतीनें पार पाडण्याची हातोटी त्यांना पूर्णपणें साध्य झाली आहे. अलीकडे त्यांनीं मद्रास येथें कॉमनवील अथवा लोक कल्याण नांवाचें एक साप्ताहिक सुरू केलें आहे. वर्तमानपत्र कसें असावें याचा हा उत्तम आदर्श आहे. यातले लेख फार मार्मिक आणि खोचदार व माहितीनें परिपूर्ण असतात. लोक शिक्षणाचें काम या पत्राच्या द्वारें फार उत्तम प्रकारें चाललें आहे. या वर्तमानपत्राला जोडून दर दोन महिन्यांनीं प्रचलित महत्वाच्या विषयावर जंगी पुरवण्या यंदापासून निघूं लागल्या आहेत. अशा पुरवण्या काढण्यांत आजपर्यंत लंडन टाइम्स येवढेंच पत्र अग्रेसर होतें. कॉमनवीलनें ही टूम उचलून तें काम फार नेटानें चालविलें आहे. आतांपर्यंत सहकारी चळवळी संबंधानें एक व आरोग्य आणि वैद्यक यासंबंधानें एक अशा दोन पुरवण्या निघाल्या. पहिलीनें हिंदुस्थानांत मोठी चळवळ उडवून दिली होती. दुसरी पुरवणी ता. ३ जुलैला प्रसिद्ध झाली. हींत आरोग्य या विषयावर ना० रा. ब. रामचंद्रराव, सर भालचंद्र, डॉ० श्रॉफ, डा० ह्यात्रे, मि० पाटणकर, कॅ० पेटाव्हेल, मि. गिलेस्पी वगैरे, अनेक विद्वानांचे लेख आहेत. ते सगळे वाचनीय आणि मननीय आहेत. अशा उत्कृष्ट माहितीनें भरलेल्या व प्रचलित विषयावर मार्मिक टीका करून चालविलेल्या पत्राच्या हातून हिंदुस्थानांत लोक शिक्षणाचें काम उत्कृष्ट तऱ्हेनें झालेंच पाहिजे असे उद्गार सर्वांच्या तोंडून निघत आहेत. यांत आश्चर्य नाहीं. असें असून पत्राची वर्गणी फक्त वर्षाचे ६ रु. आहे. मिसेस बिझांट बाईनें या पत्राच्या चालकत्वाची जबाबदारी आपलेवर घेतली आहे, व त्यांच्याच मार्गदर्शकत्वाखालीं तें निघत आहे. यावरून सारें हिंदुस्थान या बाईचे किती ऋणी आहे याची कल्पना करावी.

---

## अर्वाचीन सुधारणेचें विष.

वर उल्लेख केलेल्या दुसऱ्या पुरवणींत डॉ० रवींद्रनाथ टागोर यांनीं मुद्दाम विलायतेहून आपल्या शाळेसाठीं आणिलेले कॅ० पेटाव्हेल यांचा 'अर्वाचीन सुधारणेचें विष' या विषयावर एक लेख आहे. तो अत्यंत विचारपूर्वक लिहिलेला व वाचनीय आहे. सध्या नगर रचनेचा प्रश्न सरकारपुढें व लोकनायकांपुढें विशेष रीतीनें आहे. अशा वेळीं मि० पेटाव्हेल यांनीं केलेली सूचना अत्यंत समयोचित आहे. ते ह्मणतात कीं अर्वाचीन सुधारणे बरोबर आरोग्याला विघातक असें एक जालीम विष आलेलें आहे. हल्लीं शहराची वस्ती झपाट्यानें वाढत चालली आहे व त्यामुळें घरांची ज्यास्त ज्यास्त दाटी होत आहे. लोकांच्या आरोग्याला हें फारच विघातक आहे. तेव्हां सडका, ट्राम, रेल्वे वगैरे दळणवळणाचीं साधनें वाढवून शहरांचा विस्तार वाढवीत न्यावा, व घरें दूरदूर बांधून प्रत्येक घराभोंवतीं लहानसा बगीचा, निदान खुली जागा तरी असली पाहिजे असा नियम करावा. शहराभोंवतीं येवढी जागा कोठून आणावी असा प्रश्न येईल. त्याचें उत्तर ते असें देतात कीं शहराभोंवतालची बरीच जागा खाजगी गृहस्थाच्या मालकीची असते व शहराची वस्ती वाढत चाललेली पाहून ते जमिनीची किंमत चढवितात, यामुळें लोकाना मोकळीं चाकळीं घरें बांधता येत नाहींत- यासाठीं ही सगळी जागा सार्वजनिक पैशानें खरेद करावी व घरें बांधणारास विकत द्यावी ह्मणजे पुढें त्या जमिनीच्या मालकांना जागेची किंमत चढविता येणार नाहीं व घरें बांधणारांना योग्य किमतीस चांगली खुलास जागा थोडक्या किंमतींत मिळेल. अशा रीतीनें जागा खरेद केली असतां व दळणावळणाच्या सोयी वाढविल्या असता लोकाची गैरसोय न होतां त्यांना राहण्यास आरोग्यपोषक अशीं घरें मिळतील. कॅ० पेटाव्हेल यांची ही सूचना प्रत्येक शहरच्या नगरपित्यांनीं विचार करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. आरोग्य वृद्धिसाठीं इस्पितळें काढण्यांत आणि सॅनिटरी खात्याच्या पायीं जो पैसा सध्या अतोनात खर्च होत आहे तो जरी गैरवाजवी नाहीं तरी आरोग्याच्या व व्यावहारिकत्वाच्या दृष्टीनें कॅ० पेटाव्हेल यांची ही सूचना अधिक ग्रहणीय आहे असें आह्मांस वाटतें. सर्वच शहरांतून दळणवळणाच्या ट्रामसारख्या सोयी करितां येतील असें नाहीं तथापि पुण्यासारख्या मोठ्या शहरांतून जेथें शक्य असेल तेथें तरी ही सूचना अमलांत आणतां येईल असें आह्मांस वाटतें.

---

## पनामा पासिफिक प्रदर्शन.

अमेरिकन लोकांनीं अत्यंत साहस कर्म करून जगांत पनामायेथील कालवा हा एक नवा चमत्कार निर्माण करून ठेविला आहे. या कालव्यानें साऱ्या जगाचें स्वरूप पालटण्याचा संभव आहे. या कालव्यांतून गेल्या मे महिन्यापासून बोटी जाण्यायेण्यास सुरुवात झाली आहे. हा कालवा सुमारें ४२ मैल लांब आहे येथें सन १९१५ मध्यें एक जंगी प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. त्याची तयारी १९११ पासूनच सुरू झाली आहे. या प्रदर्शनांत पृथ्वीच्या पाठीवरल्या सगळ्या देशांतून आश्चर्यकारक अद्भुत कारागिरीचे पदार्थ यावयाचे आहेत, त्याच्यासाठीं स्वतंत्र इमारती बांधिल्या जात आहेत. कानडा देशांतून येणाऱ्या वस्तु कानडा पॅलेस नांवाच्या इमारतींत ठेवण्यांत येतील. याचप्रमाणें चीन, जपान, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी या सर्व देशांतल्या वस्तु त्या त्या देशच्या इमारतींत ठेवण्यात येणार आहेत. या इमारती त्या त्या देशांतल्या इमारतींच्या नमुन्याच्या व्हावयाच्या आहेत. या प्रदर्शनाचें मुख्य फाटक सोनेरी दरवाजा या नांवाचें व्हावयाचें आहे. प्रदर्शनाचें जागीं जी रोषनाई व्हावयाची आहे ती डोळ्यांला अपाय होणार नाहीं अशा प्रकारची व्हावयाची आहे अशा प्रकारची रोषनाई जगात पूर्वी कधीं पाहण्यास मिळाली नसेल इतकी ती उत्तम होईल. इंग्लंडांतून या प्रदर्शनासाठीं सुंदर चित्रें पाठविण्यात येणार आहेत. या प्रदर्शनात विमानें उडवून दाखविण्यांत येतील. यासाठीं विमानविद्येंत कुशल असलेले मि. आर्नोल्ड क्रुकसन यांची त्या कामावर अध्यक्षाचे जागीं योजना झालेली आहे. हे विमानानें साऱ्या जगाचा प्रवास करून दाखविणार आहेत, व त्याबद्दल त्यांना १० लक्ष रुपये इनाम देण्यांत येणार आहे. या प्रदर्शनाप्रीत्यर्थ ६१॥ कोट रुपये खर्चाचा अंदाज केला आहे. हें प्रदर्शन ह्मणजे जगातला एक अद्भुत चमत्कारच व्हावयाचें आहे.

---

## सत्तर वर्षांपूर्वीची स्थिति.

बरोबर सत्तर वर्षांपूर्वी वऱ्हाडची स्थिति कशी होती तें १८४४ सालच्या मुंबई टाइम्स मधल्या पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. इलिचपुराहून एका बातमी दारानें त्या पत्रास येणें प्रमाणें लिहिलें होतें—सध्या वऱ्हाडांत अस्वस्थता आहे. मोगल सरकारच्या जुलमाला मराठे कंटाळले आहेत, आणि योग्य संधीची वाट ते पाहत आहेत. इलिचपूरच्या पाश्चिमेस काहीं अंतरावर रजपुतांनीं एक मजबूत गाढी पकडून आणिली. एक देशमुख कोल्हापुराहून बरीचशी लूट घेऊन ग्वालेर इंदूर मार्गे येत होता. त्याला ब्रिगेडियरच्या हुकुमानें पकडण्यात आलें. कारण त्यानें गळ्यांत कांहीं मराठी दस्त ऐवज बांधले होते. या दस्तऐवजांत काय मजकूर होता तें बाहेर आलें नाहीं. या देशमुखाचें नाव रामचंद्राव असून तो सध्या पाहऱ्यात आहे. सिव्हिल सर्व्हंटांनीं मराठी भाषा लवकर शिकून घ्यावी ह्मणून सरकारनें सक्त हुकुम सोडले आहेत. कारण हे मराठी पंडित कागदांत मजकूर असेल एक, आणि साहेबाला वाचून दाखवितील निराळाच. काय करतील त्याचा नेम सांगवत नाहीं. एकाद्या लुटारूच्या पकडण्या बद्दलचा मजकूर असतां त्याला मदत करा असें हे खुशाल साहेबाला समजावतील. येवढा उतारा त्या वेळची स्थिति दर्शविण्यास पुरे आहे. कोल्हापुराहून येतांना वाटेंत ग्वालेर, इंदूर इ० शहरें लागणें हें त्यावेळचें बातमीदाराचें भूगोलाचें ज्ञान! गळ्यांत दस्त ऐवज बांधण्याची चाल ही तशीच अपूर्व! आणि मराठी पंडितांच्या प्रामाणिकपणाला दिलेल्या सर्टिफिकिटाविषयीं तर बोलावयासच नको. हा अविश्वास पंडिताविषयीं साहेब लोकांचा होता, तसाच तो साहेबांविषयीं ही पंडितांमध्यें होता कीं काय, आणि असल्यास त्याला योग्य कारणें होतीं कीं काय याविषयीं बातमीदारानें शहाणपणानें मौन धरलेलें दिसतें.

---

## इतिहाससंशोधक मंडळ, पुणें.

पुण्यास हें मंडळ इतिहास विषयक कागद पत्राचा शोधकरून तत्संबंधीं निबंध वाचनाचें काम प्रत्येक आठवड्यास करीत असतें. यामंडळाचे सभासद काहीं चांगली विद्वान् मंडळी आहे व निबंध वाचणारे ही चांगले विद्वान् असतात. अर्थात् त्याचे निबंध वाचनीय असतील ह्मणून बाहेरगावची मंडळी ते प्रसिद्ध होण्याची वाट पाहत असते. पण पुण्यास एक दैनिक व पांच चार साप्ताहिक पत्रें असतां एका ही पत्रांतून त्याचा गोषवारा सुद्धां प्रसिद्ध होत नाहीं हें आश्चर्य आहे. केसरी पत्रांत विषयांचीं नुसतीं नावें दिलीं असतात. निबंधाचा साराश गुप्त ठेवण्याची येवढी खबरदारी का घेण्यांत येते तें कळत नाहीं. वार्षिक रिपोर्टांत ते प्रसिद्ध व्हावे व ते शंभर दीडशे पानाचे पुस्तक लोकांनीं पांच पांच रुपयांस घेऊन मंडळाची गंगाजळी भरावी अशी जर सेक्रेटरीची अपेक्षा असेल तर ती निष्फल आहे. त्याना आमच्या समाजाची पूर्ण ओळख झालेली नाहीं असें दिसतें. केसरी पत्र घेत नाहीं असें ह्मणावें तर वसंतव्याख्यानमालेंतलीं निकार व्याख्यानें सुद्धां त्यात सविस्तर येतात, मग इ० सं० मंडळाच्या सारपूर्ण निबंधानाच मज्जाव कां तें कळत नाहीं. सेक्रेटरी याचा खुलासा करतील काय?

---

## संत्रे उर्फ नारिंग.

याविषयावर नागपूरच्या गव्हर्नमेंट गार्डन्सचे सुपरिंटेंडेंट मि. जे. ई. लेस्ली यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. तो माहितीच्या दृष्टीनें फार उपयुक्त वाटल्यावरून त्यालेखाचा सारांश येथें देतों.

साधारणपणें चांगली सुकी हवा, पाण्याचा चांगला निकास होत आहे अशी जमीन व समुद्रसपाटीपासून ९०० पासून ३०००

फूट पर्यंत उंची इतक्या गोष्टी संत्र्याच्या लागवडीला फार अवश्यक आहेत हवापाणी चांगलें असल्यावर संत्रीं अगदीं काळ्या किंवा रेताड व भुसभुशीत जमिनींत सुद्धां होतात. फक्त पाणथळ जमीन चालत नाहीं.

नागपुर प्रांतांत संत्र्यांचीं झाडें त्याचे डोळे लावून करतात. यासाठीं पाखरालिंबू कागदी लिंबू वगैरे झाडें उपयोगीं पडतात. नागपुरच्या आसपास व कळमेश्वरकडे राहणारे लोक यांना हे डोळे लावण्याची विद्या चांगली येते. चांगल्या उंची संत्र्याची रोपें आठ आण्यापासून दोनरुपयापर्यंत विकतात. हीं रोपें नागपुरच्या सरकारी बागेच्यांतही मिळतात तीनचार फूट उंचीचें रोप लावण्यास चांगलें असतें. हीं रोपें लावण्यास पावसाळ्याची वेळ चांगली, पण जेथें पाणी देण्याची सोय चांगली असेल तेथें हिवाळ्यांत सुद्धां तीं लावतां येतात. प्रथम जमीन चांगली नांगरावी किंवा वखरावी, आणी तिच्यांतला कचरा व गवत काढून टाकावें. रोपें वीसपंचवीस फुटांचे अंतरावर लावावीं. यासाठीं केलेले खड्डे ३ फूट चौरस व ३ फूट खोल असावें. प्रत्येक खड्डयाला चांगलें सुकें खत सुमारें पांच घमेलीभर लागतें. जोंपर्यंत झाड लहान आहे व त्याला फांद्या फुटल्या नाहींत तोंपर्यंत ह्मणजे जमिनीपासून ४ फूट उंचीचें रोप झालें नाहीं तोंपर्यंत त्याची छाट मोठ्या खुबीनें करावी लागेत. हीं रोपें लावतांना हें लक्षांत ठेववें कीं खड्डयांतली माती रोप लावतांना दोनतीन फूट दबते. एक एकर जमिनींत २० फुटांच्या अंतरावर सुमारें १०८ रोपें लावतां येतात.

रोपें लावल्यानंतर महत्त्वाची गोष्ट त्यांना पाणी देणें ही आहे हें पाणी कसें द्यावें हें माळी लोकांना ठाउक नसतें. रोपाच्या मुळाशीं खूप पाणी असावें येवढेंच त्यांना ठाउक असतें पण ही त्यांची चूक आहे. हें ध्यानांत ठेवावें कीं या झाडाचीं मुळें मूळ खोडापासून दूरपर्यंत गेलेलीं असतात. बहुधा फेब्रुवारी महिन्यांत संत्र्याच्या झाडाला फुलें येतात. पावसाळा लागण्याच्या अगोदर पांच सहा आठवडे या झाडांना पाणी देण्याचें काम बंद केलें पाहिजे. तसें केल्यास जून महिन्यांत सुद्धां त्यांना फुलें येतात. झाड लावल्यापासून चौथ्या वर्षीं त्यांना फळें येऊं लागतात, व ३० वर्षेंपर्यंत फळें येत राहतात. चांगलें खत मिळत गेल्यास ४० वर्षें सुद्धा येतात. फेब्रुवारींत जीं फुलें येतात तीं आक्टोबर नोव्हेंबर किंवा डिसेंबर पर्यंत पिकतात या पिकाला अंबियाबारी ह्मणतात. जूनमध्यें येणारीं फुलें एप्रिलमध्यें पिकतात. त्यांना मेरगबारी ह्मणतात.

झाड लाविल्यापासून ८-१० वर्षांनीं दरसाल ४०० पासून ६०० फळें दर झाडाला येतात. शेकडा ३ रु. या फळांना भाव येतो. एक एकर जमिनींत १६०० फळें निघतात. संत्र्याच्या लागवडींत पाणी देण्याचा खर्च मुख्य असतो. संत्र्याच्या बागेच्याला बहुधा विहिरीचें पाणी देण्यात येतें. मोटेनें तळावाचें पाणी आणतां आलें तर हा खर्च कमी येतो, अशा जमिनींत संत्र्याची लागवड फायदेशीर होते.

## पुराणें रचा.

हिंदुधर्मग्रंथांत पुराणांना विशेष महत्व आहे तें त्यांच्या धार्मिक व नैतिक शिक्षणामुळें आहे यांत शंका नाहीं. ज्याकाळीं हीं पुराणें रचिलीं गेलीं त्यावेळच्या परिस्थितीच्या मानानें लोकांना जें शिक्षण पाहिजे होतें तें देण्याच्या उद्देशानें त्यांची रचना झाली. पण आतां ती परिस्थिति नाहीं. व लोकशिक्षणाचें तें ध्येय ही नाहीं. सध्यांची मोठी अडचण ह्मणजे लोकांतलें आरोग्य विषयक अज्ञान आहे. तें घालविण्यासाठीं आणि लोकांना आरोग्यशास्त्राचीं तत्वें समजून देण्यासाठीं काय उपाय योजावा हा सध्यां सुशिक्षिताच्या चिंतनाचा विषय आहे. त्यांना तुह्मी आरोग्यशास्त्र शिकवूं लागला तर तो प्रयत्न विशेषसा सफळ होत नाहीं हें आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसून आलें आहे. पण लोकांत शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांना आरोग्याचें महत्व कळूं लागेपर्यंत स्वस्थ बसणार काय? नाहींतर येथें थोडें युक्तीनें वागलें पाहिजे. लोकांची श्रद्धा पुराणावर आहे. या श्रद्धेचा आपल्या कार्याला उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. ज्यांत आरोग्याचीं तत्वें अंतर्भूत आहेत अशा कथा महाभारतादि ग्रंथांतून निवडून काढून त्या कथांचीं पुराणें रचा आणि त्याचा अशिक्षित समाजांत प्रसार करा असें मि. जोहान मॅनेन यांची सूचना आहे. आह्मी याच्याही पलीकडे एक पाऊल जाऊन असें ह्मणतों कीं महाभारतादि ग्रंथांतून अशा वेंचक कथा मिळण्यास जड जाईल. निदान पाहिजेत तितक्या पुष्कळ कथा मिळणार नाहींत. यासाठीं जुन्या पुराणांच्या धर्तीवर नवीनच कथा रचा, किंवा जुन्या पौराणिक कथांना नवें स्वरूप द्या. पौराणीक कथांना पूर्वींच्या काळीं नवें अलंकार चढवून त्यांचें स्वरूप पालटल्याचीं उदाहरणें अनेक देतां येतील. रामायणांतल्या कथेला अध्यात्मिक स्वरूप देऊन अध्यात्मरामायण व योगवाशिष्ट हे ग्रंथ निर्माण झाले, त्याप्रमाणें सुर व असुर यांच्या कथांना आरोग्य विषयक स्वरूप देणें फारसें कठीण नाहीं. सुर ह्मणजे आरोग्याला पोषक अशीं तत्वें, असुर ह्मणजे मलेरिया, क्षयरोग वगैरे अपायकारक जंतु, सुरांना मदत करणाऱ्या देवता ह्मणजे आरोग्यविषयाला पोषक अशा स्वच्छ हवापाणी, निर्भेळ दुधाचा पुरवठा, क्विनीन, वगैरे, अशा रीतीनें रूपकें बसवून जुन्या पौराणीक कथांचीं नवीं पुराणें रचिलीं आणि त्यांचा प्रसार केला तर अशिक्षित आणि भाविक श्रोत्यांना त्या गोष्टी पटणार नाहींत असें आह्माला वाटत नाहीं. रूपकें बसविणारें आणि पुराणांची रचना करणारे मात्र कुशल पाहिजेत. अशा कुशल लेखकांचें अगदींच दुर्भिक्ष आहे असेंही नाहीं. आरोग्य खात्याकडून उत्तेजन मिळाल्यास असे सूत शौनक खात्रीनें पुढें येतील, आणि त्यांच्या हातून देशाचें अक्षय्य कल्याण करणारें असें पौराणिक वाङ्मय ही चांगलें तयार होईल असें आह्मांस वाटतें. निदान हा प्रयोग करून पाहण्यासारखा तरी खास आहे.

## इंडिया कौंसिल बिल.

स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या कौंसिलाच्या सुधारणेचें बिल लॉर्ड क्रू यांनीं हाउस ऑफ लॉर्डस मध्यें आणिलें होतें तें सिलेक्ट कमिटीकडे न पाठवितां लॉर्डस सभेनें नामंजूर केलें ही एका अर्थानें अत्यंत वाईट गोष्ट झाली. एका अर्थानें ह्मणण्याचें कारण कीं हें बिल सर्वस्वी हिंदुस्थानाला हितावह नव्हतें किंबहुना एक गोष्ट खेरीज करून तें सगळेंच अनिष्ट स्वरूपाचें होतें ह्मटलें तरी चालेल. ही एक गोष्ट ह्मणजे त्या कौंसिलांत हिंदी लोकांना घेणें ही होय हल्लीं ही हिंदुस्थानचे दोन सभासद त्या कौंसिलांत आहेत, पण ते घेतलेच पाहिजेत असा पार्लमेंटचा कायदा नाहीं. स्टेटसेक्रेटरी साहेबांच्या मर्जीतली ती गोष्ट आहे. तिला कायद्याचें स्वरूप देण्याची तजवीज या बिलांत केलेली होती. शिवाय हे दोन सभासद हल्ली सरकार नेमून देतें, त्या ऐवजीं हिंदुस्थानांत त्या वरिष्ठ कायदे कौंसिलाच्या बिनसरकारी सभासदांनीं ते निवडून द्यावे अशी ही सूचना त्या बिलांत होती. बिनसरकारी ह्मणजे लोकनियुक्त नव्हेत, तर लोकनियुक्त व सरकारी नोकर नव्हेत असे सरकारनियुक्त सभासद असा अर्थ आहे. अशा सभासदांच्या हातून ही निवड लोकांना समाधानकारक झाली असती असा नेम नाहीं. कारणकीं या बिनसरकारी सभासदांत सरकारनियुक्त पण लोकमताला विरुद्ध जाणाऱ्या सभासदांची संख्या कांहीं लहान नाहीं. तथापि भुकेलें भूत कोंहळ्याला राजी या ह्मणीप्रमाणें अंशतः कां होईना, पण इंडिया कौंसिलाच्या रचनेंत निवडणुकीच्या तत्वाचा प्रवेश झाला, येवढी तरी समाधानाला जागा होती, पण हें बिल फेटाळून लाविलें गेल्यामुळें समाधानाला तेवढी ही जागा आतां राहिली नाहीं. येवढें एक तेजस्वी अंग वजा केलें तर बाकीचा या बिलाचा भाग हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची पीछेहाट करणारा होता. हल्लींचें कौंसिल सल्लागारमंडळ आहे व तें तसें असावें असा पार्लमेंटाचा हेतु आहे. पण या नव्या बिलाचा सगळा रोख हें त्यांचें स्वरूप नष्ट करून प्रत्येक सभासदाकडे एकेका खात्याची व्यवस्था पूर्णपणें सोपाविण्याकडे होता. लॉर्ड क्रू व लॉर्ड मॉर्ले यांनीं किती ही जीव तोडून हा गैरसमज आहे असें सांगितलें तरी बिलाचें स्वरूप तशा प्रकारचें होतें याविषयीं शहाण्या माणसाची खात्री पटण्यासारखी नव्हती. अशी पीछेहाट करून एका माणसाच्या हातीं एकेका खात्याचा पूर्ण अखत्यार देणें धोक्याचें होतें यांत शंका नाहीं. हा येवढा भाग गाळून नुसतें वर सांगितलेलें तेजस्वी अंग पार्लमेंट पुढें आलें असतें तरी सुद्धां तें पार्लमेंटाकडून मंजूर झालें नसतेंच. तथापि निवडणुकीचें तत्व बुसड ल्याच्या संबंधांत विलायतेंतल्या मुत्सद्यांचें काय मत आहे तें तरी बाहेर आलें असतें. पण बिलाला विरोध करणारांनीं पहिल्यापेक्षां दुसऱ्या मुद्यावरच जोर देऊन तें फेटाळून लाविलें आणि अशा रीतीनें या कामासाठीं मुद्दाम विलायतेस गेलेल्या कांग्रेस डेप्युटेशनला आतां हात हलवीत यावें लागणार हें पाहून फार खेद होतो. या बिलाची उभारणी मि० मांटेग्यु यांनीं केली होती व कांग्रेस डेप्युटेशनची स्टेट सेक्रेटरीशी मुलाखत व पार्लमेंटमध्यें एका वजनदार मेंबराकडून त्याचा उल्लेख वगैरे कार्यें घडवून आणण्याची खटपट सर विल्यम वेडरबर्न यांनीं केली होती. ती निष्फळ झाल्याबद्दल हिंदुस्थानच्या लोकांना वाईट वाटणें स्वाभाविक आहे. तथापि हें बिल आतां नामंजूर झालें तरी कांहीं फेरफार करून सध्याची प्रधानमंडळी योग्य प्रसंगीं पुनः आणील अशी आशा बाळगण्यास अद्याप जागा आहे.

## लॉर्ड हार्डिंज साहेबांचा प्रभाव.

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांसंबंधाच्या प्रश्नाचा निकाल समाधानकारक रीतीनें लागला, व त्या संबंधाचें बिल ही तेथील पार्लमेंटांत पास झालें या साऱ्या गोष्टी सर्वांना विश्रुत आहेत व त्याबद्दल सर्वांना अत्यंत समाधान ही वाटत आहे. पण हा समाधानकारक निकाल घडवून आणण्यांत लॉर्ड हार्डिंज साहेबांनीं आपल्या शीलाचा प्रभाव कसा दाखविला व तोच या निकालाच्या मुळाशीं कसा होता हें कालांतरानेंच बाहेर येणार. आमची तर खात्री आहे कीं आमच्या परम प्रिय व्हाइसराय साहेबांनीं या वेळीं नेट दिला नसता तर कांहीं एक झालें नसतें. कारण आफ्रिकेंतल्या युनिअन गव्हर्मेंटमध्यें ही कांहीं उदार व न्यायप्रिय लोक आहेत, पण जनरल हरगोत्झ यांचा पक्ष इतका अविचारी आणि उच्छृंखल आहे कीं त्या पक्षाला भिऊनच तेथील सरकारला नेहमीं वागावें लागतें. जनरल बोथा यांचीं हिंदी लोकांच्या पक्षाला अनुकूलता नाहीं, त्याचप्रमाणें कित्येक स्वार्थपरायण वसाहतवाले इंग्रज ही हिंदी लोकांच्या सर्वस्वी विरुद्ध आहेत. अशा स्थितींत थोड्याशा उदार मतांच्या मुत्सद्यांचें काय चालणार ! पण मि. गांधी व त्यांची सहकारी मंडळी यांचा उच्च प्रतीचा स्वाभिमान पाहून आणि हिंदी लोकांचा पक्ष न्यायाचा आहे अशी खात्री होऊन लॉर्ड हार्डिंज यांनीं मद्रास येथें जे निर्भीडपणाचे उद्गार या प्रश्नाविषयीं काढले त्यांचा प्रभाव पूर्णपणें दिसून आला. या त्यांच्या भाषणाला लंडन टाइम्ससारख्या पत्रांनीं घसरलेल्या मुत्सद्याचे उद्गार असें जरी तुच्छता दर्शक विशेषण दिलें तरी त्याची पर्वा न करतां त्यांनीं आमच्या प्रांताचे चीफ-कमिशनर ना. सर बेंजामिन राबर्टसन यांना प्रतिनिधि नेमून पाठविलें व त्याचा परिणाम अनपेक्षित असा उत्तम झाला. लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दींत दुसरी कोणती ही गोष्ट चांगली झाली नाहीं अशी जरी घटकाभर कल्पना केली तरी या प्रश्नासंबंधांत त्यांची कामगिरी हिंदुस्थानाला कायमचा ऋणी

रून ठेवण्यासारखी झाली हें आमच्यांतल्या हाल पक्षाला सुद्धां कबूल करावें लागेल. रकारी रिपोर्टांत जरी लॉर्ड हार्डिंज साहेचा हा प्रभाव वर्णिला गेला नाहीं री भविष्यकालीन इतिहासकार लॉर्ड र्डिंज साहेबांना त्यांच्या या असामान्य ामगिरीबद्दल योग्य प्रशंसेचें पारितोषिक त्यावांचून राहणार नाहींत अशी आमची ात्री आहे.

## शोध करण्यासारखी गोष्ट.

कानडा व युनैटेड स्टेट्स् यांच्यामध्यें कितीसें अंतर आहे! दोन्ही देशांच्या हद्दी कमेकीला भिडलेल्या आहेत. दोन्ही देश ळचे ब्रिटिश लोकांचेच. पण एक देश मारें दीडशें वर्षीपूर्वी स्वतंत्र झाला ाणि दुसरा ह्मणजे कानडा ब्रिटिश वसाहत णविला जात आहे. पण अमेरिकेंतल्या वतंत्र वातावरणांत आणि कानडाच्या दूषित ातावरणांत केवढा फरक! युनैटेड स्टेटस् ध्यें तीन वर्षे जाऊन राहिलेला एक हिंदु ो. पंडित यांना त्या देशचे नागरिकत्वाचा क देतात आणि ब्रिटिश साम्राज्याचा एक ाग ह्मणविणाऱ्या कानडाला प्रो. पंडिताच्या ाऊबंदांचा [ काळ्या रंगाच्या ब्रिटिश ागरिकांचा ] विटाळ सुद्धां सहन होत नाहीं! हवेंत शरिराच्या प्रकृतीचें मान बदलण्याची शक्ति आहे; पण मानसीक प्रकृतीचे मान बदलण्याची शक्ति तींत आहे असें दिसतें. तसें नसतें तर कांहीं गोरे लोक भूमध्य-समुद्राच्या अलीकडे आल्याबरोबर हिंदुस्थानच्या काळ्या लोकांशीं अत्यंत अनुदारपणानें वागूं लागतात, आणि तेच पुनः परत भूमध्य-समुद्रांत शिरले ह्मणजे त्याच काळ्या माणसाला बरोबरीच्या नात्यानें वागविण्यास तयार होतात' असा चमत्कार कां दिसावा? भौतिक शास्त्रज्ञांनीं शोध करण्यासारखी ही गोष्ट आहे.

## अत्यंत शोचनीय मृत्यु

आमचे लोकप्रिय व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज यांच्या पत्नी लेडी हार्डिंज यांच्या आकस्मिक मृत्युची खबर ऐकून ज्याला हळहळ वाटणार नाहीं असा निष्ठुर प्राणी हिंदुस्थानांत क्वचितच सापडेल. लॉर्ड हार्डिंज यांच्यावर दिल्लीस अत्याचार घडला त्याप्रसंगीं या बाईच्या अंगच्या गुणांची खरी परीक्षा झाली, आणि तेव्हांपासून लोकांना त्यांच्या विषयीं पूज्यबुद्धि वाटूं लागली. त्यावेळीं त्यांच्या मनाला बसलेला धक्का त्यांनीं धीरानें सहन केला. पण त्यांचें मन जितकें खंबीर होतें तितकें शरीर सुदृढ नसल्यामुळें त्या कोमल शरीरावर त्या गोष्टीचा परिणाम अनिष्ट रीतीनें होऊन लवकरच त्यांना प्रकृति सुधारण्यासाठीं विलायतेला जावें लागलें. तथापि तिकडे जाण्यापूर्वी दिल्लीस स्थापिल्या जाणाऱ्या स्त्रीवैद्यकाच्या कॉलेजाची योजना परिपक्व करण्यांत त्यांचें लक्ष इतकें गढलें होतें आणि हिंदुस्थानच्या कल्याणाच्या गोष्टींत आपल्या सुशील व प्रेमळ पतीला साह्य करण्यांत त्यांना इतकी गोडी वाटत असे कीं स्वतःच्या प्रकृती सुधारणेसाठीं सुद्धां त्यांचा पाय हिंदुस्थानांतून लवकर निघेना. त्या गेल्या तरी शरीरानें तिकडे गेल्य', मन सारें इकडेच होतें. गेल्या अठवड्यांत त्यांच्या शरीरावर हुषार डाक्तरा कडून शस्त्रक्रिया करण्यांत आली होती व ती केल्यावर ता० १० पर्यंत त्यांच्या प्रकृती संबंधानें अत्यंत समाधानकारक तारा आल्या. त्यावरून आणखी दोन दिवसांनीं अत्यंत शोककारक प्रसंग गुदरणार आहे या गोष्टीची कोणाला शंका सुद्धा आली नाहीं. ता० १२ रोजीं आकस्मिक रीतीनें त्यांचा देहांत झाल्याची खबर येऊन पोंचली! ईश्वर लॉर्ड हार्डिंज यांच्यावर आणखी एक बिकट प्रसंग त्यांच्या सहनशीलतेची, मनाच्या दृढतेची आणि अढळ निष्ठेची परीक्षाच पहात आहे हाच एक विचार यावेळीं हिंदुस्थानांत सर्वतोमुखीं आहे. लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानांत व्हाइसराय असतांना विलायतेंत लेडी कर्झन ख्रिस्तलोकवासी झाल्या. व्हाइसरीन साहेबाच्या मृत्यूचा शोकभार वाहण्याचा कष्टदायक प्रसंग गेल्या दहाबारा वर्षांत हिंदुस्थानावर दुसऱ्यांदा आला आहे! त्यावेळीं एका मोठ्या अधिकाऱ्याची सुशीलपत्नी ह्मणून हिंदुस्थाननें शोक प्रदर्शित केला; आज तोच केवळ संबंध नव्हे, तर अत्यंत दयाळू अंतःकरणाची आणि प्रेमळ, सहानुभूतिप्रेरित, आणि परोपकारवृत्याला वाहिलेली हिंदुस्थानची भगिनी हरपल्याबद्दल त्याचा कंठ शोकानें दाटून येत आहे, आणि लॉर्ड हार्डिंज यांच्या मनाची आज काय स्थिति असेल याची तर कल्पनाच करवत नाहीं. सर्व हिंदुस्थान काय, पण सारी पृथ्वी त्यांच्या शोकाची भागीदार होत आहे ह्मटलें तरी त्या शोकाचा भार हलका होणें संभवनीय नाहीं. देवा! हा शोकभार सहनकरण्यास तूंच आमच्या लोकप्रिय व्हाइसराय साहेबांस सामर्थ्य दे इतकी प्रार्थना करण्यापलीकडे तूर्त कांहीं करतां येत नाहीं. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो!

## घरीं अभ्यास देऊं नका

मिसेस आनी बिझांट बाई आपल्या 'कॉमनवील' पत्रांत लिहितात—'हिंदुस्थानांतल्या शिक्षण विषयक सुधारणा करूं इच्छिणारांनीं सर जेम्स क्रायटन ब्राऊन साहेब घरीं करण्यासाठीं अभ्यास नेमून देण्याच्या पद्धती विरुद्ध काय ह्मणतात तें अवश्य पहावें. ते ह्मणतात कीं शाळेच्या वेळे बाहेर—घरून आणण्यासाठीं अभ्यास नेमून देणें—हा मुलांच्या शरीर प्रकृतीवर अत्यंत क्रूरपणाचा अत्याचार आहे. थिओसोफिक सोसायटीच्या देखरेखीखालीं चालविलेल्या शाळांतून ही चाल बंद करण्यांत आली आहे.' शिक्षक आपल्या कामांत कुशल असला तर मुला कडून शाळेंतल्या शाळेंत त्याला सगळे अभ्यास उत्तम प्रकारें करवून घेतां येतात हें आह्मासही कबूल आहे. असे कुशल शिक्षक आमच्या पाहण्यांतही आहेत. पण शाळेंतले सगळेच शिक्षक असे असतात काय? व असे चांगले शिक्षक उपासमारीच्या हलक्या पगारावर कसे मिळतील? तेव्हां शाळेसारखेंच घरीं पुष्कळ अभ्यास देऊन मुलांच्या शरीर प्रकृतीवर ताण घालणें हें जितकें वाईट आहे तितकेंच मुलांना घरीं कांहीं एक अभ्यास न देतां मोकळे चकाट्या पिटीत राहूं देणें, व आळशी किंवा उनाड बनविणें हें हानिकारक आहे. त्यांचा घरचा वेळ सत्कार्यीं लावण्याची कांहीं तजवीज होईल तरच घरीं अभ्यास करण्यासाठीं न दिल्याचा उपयोग; आणि तेंही शाळेंत चांगले हुषार शिक्षक शिकविण्यास मिळतील तर. नाहींपेक्षां शाळेंत होत नाहीं, आणि घरीं करावयाचा नाहीं मिळून मुलांच्या अभ्यासाचे नांवानें वाटोळें गरगरींत पूज्य बसावयाचें; याचाही विचार वरील सुधारणेच्या विचारा बरोबर झाला पाहिजे.

## प्रांतिक कायदे कौंसिल

जी गोष्ट कल्पना सृष्टींत घाटत होती तिला आतां सुंदर मूर्तस्वरूप येत आहे हें पाहून विशेष आनंद होतो. या नव्या कौंसिलासाठीं कौंसिलदार मंडळी निवडण्याची धामधूम आज उद्यां व परवा सर्व प्रान्तभर चालेल. आमच्या वऱ्हाड प्रान्तातर्फे तीन दिवस मिळून तीन सभासद निवडण्यांत येणार आहेत. या बहुमानाच्या व अत्यंत जबाबदारीच्या मंगल कार्यानिमित्त अनुभवलेली कर्ती सवर्ती विद्वान मंडळी पाहिजे आणि त्या दृष्टीनें मतदार मंडळी आपल्या पवित्र अधिकाराचा उपयोग करताना लोक कल्याणाशिवाय कोणतीहि बाब पुढें येऊ देणार नाहींत असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

**आकाशवाणीः**—प्रांतिक कौंसिलाच्या जन्माचा मुहूर्त पाहून कांहीं ज्योतिर्विदांनीं जें भविष्य वर्तविलें आहे त्याच्या अनुरोधानें आह्मी असें ह्मणतों कीं आम म्युनिसिपालिट्यातर्फे तीन उमेदवारांपैकीं एक सभासद जो निवडून देण्यांत येणार आहे ते रावबहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर सी. आय. इ. हेंच होत. हें भविष्य किती तरि गोड आहे! रावबहादुर मुधोळकरांनीं इतर उमेदवारांचा खोडसाळपणा दाखविण्याचा जो खरमरीत प्रयत्न केला आहे त्याचें हें त्यांस उत्तम फळ वाटेल. पण त्यांनीं दुसऱ्याच्या दोषांकडे दृष्टी दिली नसती तर त्यांचे स्वयंप्रकाशित सद्गुण मतदारांच्या चाणाक्ष नजरे पुढून गळले असते ही त्यांची कल्पना मतदारांच्या डोळस पणाविषयीं थोडीशी अनुदारच होय. यांच्या निवडणुकीनें रा० तांबे यांस आपली पात्रता अधिक वाढविण्यास व फलद्रुप करण्यास चांगली संधी मिळेल. आणि तसेंच रा० श्रीराम यांसही हा मनोराज्याचा गड जिंकण्याचा नव्या नव्या युक्तचा कालक्रम आपोआप शिकवील. जिल्हा बोर्डाच्या निवडणुकींत रावबहादूर केशव गोविंद दामले हेच या भविष्याप्रमाणें निवडून येतील तेव्हां रा. रा. जानराव बाजीराव यांसही एका प्रकारची सुटका झाल्यासारखें वाटेल. व कौंसिलदारीची पूर्वतयारी करण्यास चांगल्या नेटानें सार्वजनिक कामांत लक्ष घालण्यासाठीं सुसंधी मिळेल. जमेदारांच्यातर्फे रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी हे येत्या बुधवारीं निवडून येतील असें आह्मी ध्वनित करित आहों, आणि या संबंधाचा प्रत्यक्ष अनुभव येईल तेव्हा रा. रा. यशवत गोविंद देशपांडे यांच्या लक्षांत येईल कीं मुकी विद्वत्ता बोलकी होण्यापूर्वीं सार्वजनिक पुण्यकार्यें किती तरी आपल्या हातून घडावीं लागतात. या आकाश वाणीच्या अनुरोधानें दुसऱ्या एका गोष्टीची आठवण होते. "पांचामुखीं परमेश्वर" असें ह्मणतात पण आमच्या प्रान्तातील ठळक ठळक सोळा मुखांनीं वरील वाणीचा लेखी अनुवाद केला आहे. पण त्या अनुवादाचे शेवटीं त्यांनी इतर मतदारांच्या तारतम्यदृष्टींत अंधत्वाचें व्यंग जें ध्वनित केलें आहे तें त्यांच्या मोठेपणाला विशेष शोभेसें नाहीं.

# वऱ्हाडवृत्त

हवामानः— गेल्या आठवड्यांत मधून मधून पाऊस पडला. तीनचार दिवस तर सूर्य दर्शन ही झालें नाहीं इतकें आकाश आभ्राच्छादित होतें. शिवाय हवेंत गारठा बराच होता व अंगाला झोंबणारा असा वारा सोसाट्यानें वहात होता. वारा जोराचा चालू आहे. आतां पिकांनीं डोकें चांगलें वर काढिलें असून जिकडे तिकडे हिरवें गार झालें आहे. क्वचित्च पेरण्या होत आहेत तर क्वचितच निंदणाचें ही काम सुरू झालें आहे. पिकांची स्थिती समाधान—कारक आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं.

रा. रा. हस्नमजी फर्दुनजी वाच्छा डेप्युटी कमिशनर यांस गेल्या ११ तारखे पासून दोन महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

रा. ग. डी. जी. क्षीरसागर ॲक्टिंग, नायब तहाशिलदार, खामगांव यांस तिसऱ्या वर्गाच्या माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले आहेत.

रा. रा. शहामहमद इशक, तहशिलदार, वणी, यांस पुढील महिन्यापासून तीन महिन्यांची रजा देण्यांत आली असून रा. रा. केशव बाळकृष्ण चिटणीस, नायबतहशीलदार, यवतमाळ, यांस वणी येथें तहशीलदार नेमण्यांत आलें.

**दुःखवट्याची सभाः**—लार्ड हार्डिंज यांच्या दुःखाचे वाटेकरी सर्व राष्ट्र आहे हें कळवितांना त्यांचें दुःख हलकें करावें या हेतूनें आकोल्यास गेल्या बुधवारीं टाऊनहॉलमध्यें एक जाहिर सभा भरली होती.

या अंकासोबत बेळगाव येथील श्रीरामलक्ष्म प्रकाश छापखाना यांच्या पुस्तकाची जाहिरात वाटली जात आहे तिकडे वाचकानीं लक्ष द्यावें.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००। |
| मुंबई ब्यांकेचें सोनें | २४=। |
| चांदी | ७८॥ |
| ज्वारी नवी | १८७ |
| गहुं काठे | १०३ ते १६० |
| गहुं बनशी | १२० ते १४० |
| ज्वस | १३६ ते १३९ |
| तीळ | ८।= ८॥= |
| तेल | ७॥ ते ८ |
| सरकी | १२ |
| कापूस | ९३ |
| रुई आकोला जीन | ७० |

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥१२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,
खत्तारसीचकला, मुंबई.

नो. नं. १७

## घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठलियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची घेणारास टाइमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळा वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणादार माणसाचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.
२ रास्कोप सीस्टिम [ खिशांतील घड्याळ ३ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी मुंबई–४ ( व्ही. एस. )

नो. नं. १८

सातारचे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

## कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायु ज्यांस बालग्रह फीट्स [ हिस्टेरिया ] फेंपरे मिरगी, वतारणें, आंकडी घुरे ह्मणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायू बरे होतात. ४ आणे पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. 'रोखीनें' अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुतेक प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आंसवे, वातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,
ठाकुरद्वार रोड हरकुंवरबाई नवी चाळ, मुंबई नं. २

नो. नं. १९

## सेंटचा राजा

वापरून तर पहा ! !

# ओटो सुगंधीचा भांडार दिलचमन

( रजिस्टर्ड )

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे ओटो दिलचमन जास्त टीकाऊ मधुर आणि अधीक खुशबोदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी ओटो दील–चमन वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यांत स्पीरीट बिलकूल नाहीं, चमेली आणि बटमोगरांच्या ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुगंधाचा भांडार प्रस्तृत होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

| | |
|---|---|
| किंमत -॥- ड्रामची टयूब ८ आणे | किंमत -॥- औंसाची बाटली २ रुपये. |
| " १ " " १२ आणे | व्ही. पी. पो. खर्च वेगळा, |

ओटो दीलचमनची सुगंधी कार्डे दर डझनास १२ आणे,
सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याची टिकीटें पाठवा.

सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें खरेदी करतेवेळीं ओटो दीलचमन हें नांव बरोबर वाचून पहांवें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावा.

एकटे एजंटस्
### एच. आर. मोदी आणि कं.

तारेचा पत्ता "सेकेरीन" मुंबई.
विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी
नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्किटसमोर मुंबई.

वार्षिक वर्गणी टपाल व्ही. पी. सह १॥२
वर्षारंभ जुलै.

### बाल सन्मित्र पुस्तक माला.

या मालेंत सन्मित्रा प्रमाणें सदुपदेश करून चांगलें वळण लावणारीं, सोप्या पण चटकदार भाषेंत लिहिलेलीं १००।१०० पृष्ठांचीं मनोरंजक व अत्यंत उपयुक्त पुस्तकें वर्षांत चार प्रसिद्ध होतात. डॉ. सर भालचंद्र; रा. ब. चि. वि. वैद्य एम्. ए. एल्. एल् बी. रा. ब वि. मो महाजनि एम्. ए. रा. सा. मो. वा. कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी; रा. सा. वि. कों. ओक; ह. ना. आपटे वा. गो. आ. बी. ए इ. सुप्रसिद्ध विद्वान् गृहस्थांचे उत्कृष्ट अभिप्राय मालेंतील विक्रीचीं पुस्तकें १ अभ्यास ( अत्यंत उपयुक्त निबंध ) २ दिवाळीची देणगी ३ नीतिभूषण ४ सद्बोध रत्नहार, ( तिहींतही गोष्टी, कविता, निबंध, नाटकें, चरित्रें, पत्रें इ० उत्कृष्ट विविध विषय ) प्रत्येक पुस्तकास व्ही. पी. नें ॥८ एकदम चारी घेतल्यास १॥७ नवीन वर्गणीदारांस फक्त १॥२ पडतील.

एजंट परचुरे पुराणिक मंडळी मुंबई नं० ४
व्यवस्थापक बालसन्मित्र कार्यालय मुंबई नं० २ अंमेर मालवण जि० रत्नागिरी.

नो. नं. २१

### जाहिर नोटीस.

१ रा. रा. धनजी शिवलाल मारवाडी
२ रामप्रताप गंगाबक्ष मारवाडी १ हाजी शेख इब्राहिम वल्लद महमद अमीर त्रिवर्ग राहणार आकोला.

यांसः–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आपसा आपसांतच माझा लहान अज्ञान भाऊ नामें अबदूल रऊफ ऊर्फ लुकमानशा याच्या कडून खरेदीखतें घेतलीं आहेत आणि त्याला भुलथापी देऊन तुह्मी फसवीत आहांत आणि आमच्या जागेवर या रीतीनें लटकीच मालकी दाखवूं पहात आहा. अबदूल रऊफ याचा मी पालनकर्ता आहे आणि त्याच्या मिलगी संबंधानें मी सर्वांतर्फे वहिवाटदार आहे ही गोष्ट तुह्माला पूर्णपणें माहित असून तुह्मी केलेले सर्व व्यवहार रद्द बेकायदेशीर व लबाडीचे आहेत. त्या संबंधानें माझी नुकसानी होईल ती वा नोटिशीच्या खर्चासुद्धां तुह्माकडून कोर्टमार्फत वसूल केली जाईल. कळावें ता. १४।७।१४

सही
करीमशा रहीमशा द० खु०

नो. नं. २२

**तांबूल नवरत्न** — न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखु** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

**मद्रासी नस** — अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

**केश काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकान्त बाम** — मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट– चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार– आकोला.

नो. नं. १२

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs, 4½ CRORES.

ESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. | Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|---|---|---|
| | | Rs. | | Rs. | Rs. |
| 888 | 8,668 | 2,63,38,000 | 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 893 | 17,657 | 4,68,36,090 | 1893 | 21,16,5[illegible] | 80,05,818 |
| 898 | 28,516 | 6,81,27,774 | 1898 | 31,36,422 | 1,41,32 3 |
| 903 | 40,390 | 8,47,06,108 | 1903 | 41,07,00[illegible] | 2,19,95,9 |
| 908 | 52,168 | 10,12,93,883 | 1908 | 53,55,639 | 3,22,79,9 |
| 913 | 64,097 | 12,36,79,510 | 1913 | 69,44,548 | 4,41,61,8 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 12, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" As each of the last three Valuations the Reserves of the Company ve been calculated on an increasingly stringent basis. On this occasion ere has been a further addition to the reserves and the financial position the Company has been further strengthened. The resources of the mpany are now so ample that the security which they afford is undoubted d Policyholders and Shareholders alike may confidently look forward to continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The iental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy lders with a absolute security and possessing all the important factors essential a first class office it commands the full confidence of the public.

NFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
C. P. Berar & Khandesh,
NAGPUR.

N. No. 18

अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरेदी करून अनुभव पहावा व बक्षिसास तयार व्हावें. ·॥· औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १४

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी साठ्याचें तेल,**

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १५

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

**आयोडाईज्ड सार्सापरिला.**



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव

५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १६

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## नोटीस

नोटीस बेशमी सोनाजी वा॥ नारायण बेलोकार रा० वडगांवगड तालुके जळगाव जिल्हा बुलढाणे पो. पिंपळगांव काळे यांसः–

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून आपले दोघाचेही वयोमानानें अर्धे आयुष्य होत आलें आहे व तुह्मी आतां मला अजमास एक वर्षापासून घरातून हाकून दिलें व आपण पूर्वी मौजे येरळी येथें माझे आईबापाची असलेली स्थावर-जंगम इस्टेट होती त्यामुळें आपण दोघे उभयता तेथें रहत होतो. कारण माझे आईबापाला माझे शिवाय दुसरा कोणी वारस नसल्यामुळें सर्व इस्टेट माझे ताब्यांत लागली व मग आपण त्या इस्टेटीचा अजमास दहा वर्षे उपभोग घेऊन मग तुह्मी मजला मोहीत करून सर्व इस्टेट ह्मणजे माझे आईबापाचें मौजे येरळी येथें असलेलें शेत अजमास सहा वर्षे झालीं. सुगदेव वा॥ संपत पाटील मौजे येरळी याजला ९१० नवशे दहा रुपयास विकण्यास लाविलें. व येथील जागा रामु वा॥ लक्षुमन बेद यास १२५ एकशे पंचवीस रुपयास विकण्यास लावून सर्व रक्कम १०३५ एक हजार पसतीस रुपये व वरील सर्व जवारी बाजरी तांब्या पितळेचीं भांडी व माझे आईबापाचे घरचा माझे आंगावर असलेला डागिण्यासुद्धां आपण मौजे वडगांव येथें गेलों. पुर्वीची आपली वडगांव येथें जमीन वगैरे कांहीं नसून मग येथून नेलेल्या रकमेवर जमीन वगैरे विकत घेतली व मग आपण अजमास दोनतीन वर्षे मला चांगले वर्तनानें वागविलें व पुढें आपण दुसरी गंधर्वाची बायको केली, त्यामुळें आपण तिचे नादीं लागून मजला घरातून हाकून दिलें. मग मी पुढे मौजे येरळी येथें येऊन राहिले. व मग तेथें मला दोन वेळां मोठ्या कठीण मानग्या झाल्या त्याकरितां व इतर खाण्याच्या खर्चा करितां मीं मौजे येरळी येथील किसन वा॥ बाबु सुतार याज जवळून २०० दोनशे रुपये कर्ज काढून खाल्लें. व आतांही पुढें आपण मजला न कांहीं दिवस नेल्यास मीं आणखी कर्ज काढून खाण्यास रक्कम घेणार. नाहींतर नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत ही वरील रक्कम व्याजासुद्धां आणून देऊन मजला घेऊन जावें. मी नांदण्यास तयार आहे. नाहींतर माझे इस्टेटीचे रुपये घेऊन गेला त्या रुपयासुद्धां व वरील लोकांचे कर्जासुद्धां व या नोटीसीचे खर्चसुद्धां तुमचेवर कोर्टांत दावा आणणार आहे कळावें तारीख १२-७-१४

सही

१ झीपरी मर्द सोनाजी बेलोकार नि. वांगडी
दस्तुर-कासीराव वा॥ माहादु जळकेकर
नो. नं. २३

## नोटीस

नोटीस बेशमी हाजी शेख इब्राहीम वा॥ महमद अमीर रा० आकोला यासः–

खालीं सही करणार रा० आकोला ताजनापेठ याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी वनजदार छापखान्यांतून नों. नं. ७६२ ची रामप्रताप व धनजी मारवाडी रा. आकोला यास दवविली ती नोटीस खोटी असून मी निर्शेत असतां त्या कागदावर तुह्मी माझी सही करवून घेतली आहे. कागदावर काय मजकूर लिहिला होता हें मला माहीत नाहीं मी तुह्मास खोलेश्वरा जवळील जागा विकली नाहीं. सद्रहु जागा माझे हिश्याची ६३ आण्याची मी रामप्रताप व धनजी मारवाडी यास विकून खरेदीखत लिहून देऊन नोंदून देऊन ताब्यातही दिली आहे त्या जागेवर माझी मुळींच मालकी नाहीं. तुह्मी माझेशीं विश्वासघात केला त्याबद्दल मी रीती प्रमाणें काम चालवीन. पुढें तुमची कोणतेही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. करितां नोटीशीनें कळविलें आहे क. ता. ८ माहे जुलई सन १९१४ इ.

दस्तूर लक्ष्मण भिकाजी पि. रा. आकोला

सही

अबदुल रऊफ उर्फ लुकमन वा॥ रहीमशा
दस्तुर खुद
नो० नं० २४

## नोटीस

रा. रा. बनसीलाल जोहारमल्ल मारवाडी राहणार आकोला.

यांसः–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं ४।१।१९१२ च्या भाडेचिठ्ठी अन्वयें तुह्माकडे जी जागा भाड्यानें गहण्यास दिली आहे ती मी रा. रा०
१ धनजी शिवलाल मारवाडी } या उभयतांस
२ रामप्रसाप गंगाबक्ष मारवाडी } विकून टाकली आहे तर

तुमच्या भाडेचिठ्ठीची मुदत होईपर्यंत तुह्मी चालूं महिन्यापासून भाडे दरमहाचे दरमहा १९१४ साल अखेरीपर्यंतचे ५० रुपये मला पोचते केल्यानंतर त्यास परभारे सन १९१५ सालापासून दरमहाचे दरमहा भाडें देत जावें आणि भाडेचिठ्ठीची मुदत संपताच जागा त्या उभयताच्या ताब्यात बिनतक्रार देऊन टाकावी. या प्रमाणें करण्यास चुकाल तर त्या संबंधाची नुकसानी तुह्मावर सर्व प्रकारें या नोटिशीच्या खर्चासुद्धां पडेल कळावें ता० १४ जुलै सन १९१४ इ.

सही

करीमशा रहीमशा द० खु०

ताजा कलम–सदर्हू धनजी व रामप्रताप यांच्याकडे खरेदीचे रकमेपैकीं ५० रुपये येणें आहेत ते भाड्याच्या रूपानें तुह्माकडून वसूल आल्यानंतर त्यांची मालकी सन १९१५ पासून सुरू व्हावयाची आहे. ह्मणून तुह्माला आगाऊ ही पूर्ण तपशीलाची जाहिर नोटीस दिली आहे. कळावें ता० १४।७।१४ इ.

सही

करीमशा रहीमशा द० खु०
नो. नं. २५



## नोटीस

नोटीस बेशमी दगडू वा॥ दत्तु बुरकले रा० नीरपूर ता मलकापूर

यांसः--

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तुह्मी माझे चिरंजीव [ मुलगा ] असून तुह्मी सध्या माझ्यातच आहात तुह्मी अलीकडे लोकाचे नादीं लागून माझी स्थावर जिनगी कोणास देणार आहांतसे कळते. तरी या नोटीशीनें कळवितो कीं तुह्मास तसे करण्याचा कांहींच अधिकार नाहीं. इस्टेट कांहीं स्वसंपादित व कांहीं वाडीलोपार्जित आहे. परंतु मी जिवंत असे पर्यंत तिचा दुरूपयोग अगर सदुपयोग करण्यास तुह्मास अधिकार नाहीं. खाणें पिणें अन्नवस्त्र मी आजपर्यंत देतच आलों आहे. तुह्मी कांहीं जनावरें व डागीनें ही मोडले आहे असें कळते तरी या पुढें असें होऊं नये या करितां कळविले आहे तसेच माझी जिनगी कोणास गहाण खरेदी पत्र्यानें दिल्यास त्याचा बोजा तुमचेस्वतःवर राहील मालेवरें अगर माझे जिनगीवर राहणार नाहीं क. ता. १०।७।१४

सहीची निशानी आंगठा
दत्तु वा॥ गोविंदा बुरकले रा०
नीरपूर ( आलमपूर ) याचा
नो० नं० २६

## जाहिर नोटीस

या नोटीसीच्या द्वारें सर्वत्रांस कळविण्यांत येते कीं मौजे शिरल व मौजे आंबे टाकळी तालुके बाळापूर जिल्हा आकोला येथील रतनलाल आसाराम राहणार आंबे टाकळी तालुके बाळापूर जिल्हा आकोला याची मालकीची शेती तारीख १९ माहे आगष्ट सन १९१४ इसवी रोजीं विद्यमान तहसिलदार साहेब तालुका बाळापूर याचे कडून जाहिर लिलावानें विकण्यांत येणार आहे, तरी ज्याची इच्छा वर लिहिलेल्या ठिकाणची जमीन घेण्याचे असेल त्यानीं सदरील तारखेस त्या त्या ठिकाणीं दिवसाचें १०वाजता पासुन हजर राहण्याचें करावें कळावें तारिख ३१माहे मे सन १९१४ इ०

सही

हिरालाल माणीकराम शर्मा
नो. नं. २७ मुखत्यार

गवत ! गवत !! गवत !!!

## जाहिरात.

जी. आय. पी. रेल्वे लाईन वारे वरोरा ष्टेशन येथें वक्त मोहसमी कटाई केलेल्या चांगल्या प्रकारच्या चराई गवताचे गठ्ठे बांधण्याचें काम पावसाळा संपतांच शुरु केलें जाईल. ज्या लोकांना गवत खरिदी करावयाचे असेल त्यांना विनंती करण्यांत येतेकीं त्यांनीं खाली स[ही] करणाराकडे ३१ आगष्ट १९१४ अगोदर आपले मागणी अर्ज पाठवा[वे]

दस्तखत
सही. सी. एफ. बेल.
डिव्हीजनल फारेस्ट आफि[सर]
नार्थ चांदा डि. चांदा.
नो० नं०२८

## नोटीस

रा. सदासींग रामसींग शिव रा. उमर[खेड]
अगर रेल्वे चांदूर यांसः–

खाली सही करणार यांजकडून नो[टीस] देण्यांत येते कीं माझा नातू नथुसींग टटोल[े] हा अज्ञान आहे. त्याचा जंगम माल तु[ह्मी] माझे जवळून मुलाचें लग्न करीन अ[सी] थाप देऊन खालीं लिहिल्या प्रमाणें घे[ऊन] गेलेत. व पिंपरीखोद्री ता० जळगांव जि[ल्हा] बुलडाणा येथील शेताचा दर वर्षाचा [...] खर्च वजाजातां याचा नक्की हिशोब आ[...] मुलगा सज्ञान होईपर्यंत हीफाजतींत ठेवावा

जंगम माल.

१ सोन्याचें कडे एक वजन तोळे ६
२ कोपऱ्याचा जोड एक चांदीचा वजन तोळे ३०
३ चांदीचा तोड्याचा जोड एक वजन तोळे १००
४ चांदीची सरी एक वजन तोळे २०
५ नथा दोन सोन्याच्या वजन तोळे २
६ कडे चांदीचें हातांतील २ वजन तोळे
७ चांदीच्या पाटल्या २ वजन तोळे
८ चांदीचे बिछवे वजन तोळे
९ सोन्याची चौकडी १ वजन मा[...]
१० पवळ्याची कंठी चांदीत गाठ वजन तोळे १०

या शिवाय तांब्या पितळेचें भांडे मौजे अजी येथीलं दस्ताऐवज. शे[त] खरेदीखत.

गाय वासरासह असा माल [...] त्याची आई हीराबाई ईजला ही दुसरे काणी गंधर्वानें दिले आहे. तिचा या[...] कोणत्याच प्रकारचा हक्क संबंध रा[...] नाहीं.

जबाबदार तुह्मी आहा. करिता नोटीसीनें तुह्मास कळविलें आहे. ही नो[टीस] दिली. सही ता० २।७।१९१४
द० खुशालसींग किसनसींग.

सही

सायबोबाई जवने प्रेमसींग
शिक राहणार पुसद हल्ली
मेहेकर नि० खुद हा० बां
नो. नं. २९

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख २७ माहे जुलै सन १९१४ इ० [ अंक २९


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच रुपयांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ J. G. Ridleand. एजंट

नो. नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेत तपास करावा.

एका चिपचें वजन २१¦ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० J. G. Ridland. एजंट

नं० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं मुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें ज्ञानतंतु, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १।८०.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN 301, *Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 5

## ' विकावयाचा आहे. '

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला की॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लोकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ६ वऱ्हाड

### अनायासें देवदर्शन.

नेटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८० व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. ७

### "खरें पौष्टिक औषध"

पाहिजे असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यथासांग पद्धतीनें, निर्विकारी, व ज्यांत [ कारखान्याचे औ० प्रमाणें ] उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकुन गुण देते, असे वंगभस्म वापरा कि. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार, यानें दुरुस्त होतात. तसेंच वरील पद्धतीनें, प्रवाल भस्म तयार असून ११ विकार घालविते. खरडा सोबत असतो. ज्यांना, परमा, उपदंश, व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळ्यांत, उन्हाळी लवकींत आग, धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, यांना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु. शिवाय पौष्टिकही आहे. त्वचारोगांतक— १ मलम, खरुज, गजकर्ण, खवडा, आगपैण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमाची जरूरी नाहीं. किं. ८ आणे वि. खु. क्याटलाग मागवा. फुकट--व्ही. आर. मुळे, नांदुरा, जी. आय. पी.

नो. नं. ८

बंगाली कथानकाचे आधारें लिहीलेली

## मधुर-मीलन.

लेखक--श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर.

**बाचकांचें मन आनंदानें प्रफुल्लित करणारी असंत चित्तवेधक नवी कादंबरी.** कथानक रम्य व उदात्त, भाषा सोपी पण चटकदार. प्रकरणे २४. किं. व्ही. पी. सह आठआणे. प्रो० हरिहर प्रेस, पुना-सिटी

नो. नं. ९


### नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

कि० दि० मुकद्दमा नंबर ४८ सन १९१४ ई. विद्यमान डि. जज्ज साहेब यांचें कोर्ट मुकाम आकोला

नांव पूर्णाबाई
मर्द नथु
जात कुणबी राहणार कटार
तहसील आकोला जिल्हे आकोला

ज्या अल्पवयी नारायण वा नथु उमर वर्ष ७

राहणार कटार आकोला तहसीलीचे (२) ईस्टेट व शरीर संरक्षणासाठीं पालक कर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं

( ३ )

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, सदहू अर्जदारानें सदहू अल्पवयीचें (२) इस्टेट व शरीर संरक्षणासाठीं पालक कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदहू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २९ माहे आगष्ट सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख १४ माहे जुलै सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का. G. W. Bapat
A. D. J.
for
डि. जज. आकोला

नो० नं० १०

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ९ शके १८३६

## भारतीय पर्जन्यानुमान विद्या.

हिंदुस्थान देश आज कित्येक युगांपासून कृषिप्रधान देश ह्मणून प्रसिद्ध आहे. अर्थात् अशा देशांत कृषिकर्माचा मूळाधार असें जें पर्जन्यानुमानशास्त्र त्याची माहिती नसणें संभवनीय नाहीं. ज्या आमच्या देशांत ज्योतिष, गणीत, वेदांत मानसशास्त्र इ० विषयांवर सुधारलेल्या राष्ट्रांना आश्चर्यानें थक्क करून सोडणारीं शास्त्रें निर्माण झालीं त्या या हिंदुस्थानांत पर्जन्यानुमानशास्त्र अगदीं अपरिचित राहणें संभवनीय नव्हतें. आमच्या देशांत हें शास्त्र बरेंच पक्कावस्थेला आलेलें होतें, पण मध्यंतरींच्या धामधुमीच्या काळांत तत्संबंधीं ग्रंथ नष्ट झाले असें ह्मटलें पाहिजे. या शास्त्राचा कांहीं अवशेष लोकांच्या ह्मणीच्या रूपानें राहिला होता. पण सुदैवानें आतां मूळचें शास्त्रच अंशतः उपलब्ध होऊं लागलें आहे ही अत्यंत आनंददायक गोष्ट आहे. या उपलब्ध होऊं लागलेल्या शास्त्रग्रंथांच्या प्रमाणांवरून प्राचीन आर्यऋषींचें पर्जन्यानुमान कशा प्रकारचें होतें याची कांहीं अटकळ करतां येईल. येथें हेंही सांगितलें पाहिजे कीं हल्ली जसें शोधकांना दुर्बिणी, वायुभारमापक यंत्र, उष्णतामापक यंत्र, ठिकठिकाणची माहिती क्षणार्धांत आणून देणाऱ्या तारा वगैरे साधनें अनुकूल आहेत तशीं तेव्हांची स्थिति नसतांही प्राचीन ऋषींचीं पर्जन्या विषयींचीं अनुमानें अद्यापही अनुभवाला तंतोतंत उतरत आहेत

उन्हाळ्यांत पाऊस पडावयाचा असला तर त्याचीं पूर्व चिन्हें प्राचीन ऋषींनीं ठरविलीं होतीं तीं येणें प्रमाणें—

> " विरसमुदकं गोनेत्राभं
> वियदविमला दिशा ।
> लवणं विकृतिः काकाण्डाभं
> यदाच भवेन्नभः ॥
> रसनमनसकृन्मंडूकानां
> जलागमहेतवम् "

यांतलें एकेक लक्षण घेऊं. पहिलें 'विरसमुदकं' ह्मणजे पाणी विरस होणें. आमच्या ऋषिवर्यांनीं बाह्य यंत्रांवर भिस्त न ठेवतां मनुष्यदेहरूपी यंत्रांत होणाऱ्या फेरफारांचें सूक्ष्म निरीक्षण करून सिद्धान्त ठरविले. त्यांतला पहिला हा कीं चैत्र वैशाखांत दारुण तृष्णा लागूं लागली, कितीही पाणी प्यालें तरी समाधान नाहीं असें झालें, पाण्याची रुचि गेली, ह्मणजे पाऊस येणार समजावें. दुसरें लक्षण 'गोनेत्राभं वियद्' ह्मणजे आकाश गाईच्या नेत्राप्रमाणें स्थिर, त्यांत वायूचें परिवर्तन बिलकुल होत नाहीं असें स्तब्ध असणें. जलावर वायूच्या लहरी यत्किंचित् ही उठत नसणें. ह्यांत ऋषींनीं जलाला मापलें यंत्र बनविलें आहे. तिसरें लक्षण 'विमला दिशा' ह्मणजे सर्व दिशा स्वच्छ असणें. येथें दिशा ह्मणजे आकाशतल असें समजावें. आकाश अगदीं शुद्ध नीलवर्ण असावें, ह्मणजे त्यांत शुभ्रवर्णाची भेसळ नांवाला सुद्धां असूं नये. अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं पृथ्वी भोंवतालचें वातावरण २९ मैल पर्यंत आहे व त्या पैकीं खालच्या दहा मैलांत शुद्ध हवा नसून तींत पाण्याची वाफ मिसळली असते असें ठरविलें आहे. आकाशाला नीलवर्ण जो प्राप्त झाला आहे तो या वाफेमुळें. दहा मैलांच्या वरचें आकाश नीलवर्ण नसून शुद्ध काळ्या रंगाचें आहे असें वैमानिक लोक सांगतात. तेव्हां शुद्ध नीलवर्ण आकाशाचा असणें हें त्या आकाशांत असलेल्या वाफेच्या अस्तित्वाचें सूचक आहे ही गोष्ट यावरून आमच्या पूर्वजांना ठाऊक होती असें दिसतें. तिसरें लक्षण लवण विकृति. हवेंत वाफ ज्यास्त झाली ह्मणजे मिठाला पाणी सुटतें. पावसाळ्यांत मिठाला पाणी सुटतें याचें हेंच कारण आहे. पण मिठाला पाणी सुटूं लागलें आहे यावरून हवेंत वाफ ज्यास्त झाली आहे व त्यावरून लवकरच पाऊस येईल असें अनुमान करण्यास मनुष्याचे ठायीं अवलोकनशक्ति पाहिजे. चवथें लक्षण काकाण्डाभं नभः ह्मणजे कावळ्याच्या अंड्यासारखा आकाशाचा रंग होणें. कावळ्याचें अंडें शुद्ध नीलवर्णाचें असून त्यावर पांढरे पांढरे ठिपके असतात. शुद्ध नीलवर्ण आकाशावर पांढऱ्या मेघांचे ठिपके ठिपके दिसणें हें पावसाचें लक्षण समजावें असें प्राचीन ऋषींचें ह्मणणें आहे. पांचवें लक्षण बेडकांचें गायन हें होय. याला इंग्रजींत फ्रॉग कॉन्सर्ट ह्मणतात.

अशा ठोकताळ्यांवरच आमच्या ऋषींचीं पर्जन्याविषयींचीं अनुमानें बसविलेलीं असतीं तर त्यांना मोठीशी किंमत नव्हती. पण आमच्या ऋषींनीं पर्जन्यानुमानाचा ज्योतिष शास्त्रांशीं संबंध जोडून दिला आहे. त्यांनीं अनेक दिवसांच्या सूक्ष्म अवलोकनावरून असें ठरविलें आहे कीं मार्गशीर्ष महिन्याच्या शुक्लपक्षाच्या शेवटीं चंद्र जेव्हां पूर्वाषाढा नक्षत्रांत प्रवेश करतो तेव्हांपासून वैशाख महिन्यापर्यंत मेघांची गर्भधारणा होत असते. मार्गशीर्षांत विशेष थंडी पडणें हें त्या गर्भधारणेचें एक लक्षण आहे. पौषांत फार बर्फ पडणें, माघांत जोराचा वारा सुटणें, व सूर्याच्या उदयास्तांच्यावेळीं तो मेघांनीं आच्छादित असणें हीं ही अशींच मेघांच्या गर्भधारणेचीं चिन्हें आहेत. फाल्गुन महिन्यांत रुक्ष व प्रचंड पवन, आकाशांत मेघांचा संचार, चंद्रसूर्यांचा परिवेश ह्मणजे खळें आणि सूर्याचा ताम्रवर्ण, चैत्रांत मेघ पवन, व चंद्रसूर्यांचीं मेघयुक्त खळीं, आणि वैशाखांत मेघ, पवन, जल, विद्युत, व मेघगर्जना अशीं मेघांच्या गर्भधारणाचीं लक्षणें सांगीतलीं आहेत. मेघांचें गर्भधारण झाल्यादिवसापासून बरोबर एकशेंपंचाण्णव दिवसांनीं त्याची प्रसूति होते ह्मणजे त्यांतून पाऊस पडतो. गर्भधारणा शुक्लपक्षांत झाली असली तर वृष्टि कृष्णपक्षांत होते. दिवसां गर्भधारणा झाली असेल तर वृष्टि रात्रीं होतें. सकाळीं झाली असेल तर सध्याकाळीं होते.

याप्रमाणें मेघांचा गर्भधारणाचा काळ नक्की पाहून ठेविला असेल तर त्यावरून नक्की पाऊस पडण्याचा काळ सांगतां येतो. या निवळ गप्पा नाहींत. याप्रमाणें अवलोकन करीत बसणें फार कष्टाचें काम आहे ह्मणून त्या उद्योगांत कोणी मन घालीत नाहींत, पण ज्यांनीं असें अवलोकन केलें आहे त्यांनीं ही विद्या साध्य करून घेतली आहे. असे एकदोघे पर्जन्यानुमानविद्या जाणणारे ज्योतिषी आज कलकत्त्यास आहेत. श्रीयुत हरदत्तराय चामरिया हे त्यांतले एक आहेत. हे रात्रींच्या रात्रीं चादर व कांबळी पांघरून घराच्या गच्चीवर मेघाकडे दृष्टि लावून सारखे बसलेले असतात, व आपल्या अवलोकनाची टिपणें करून ठेवतात. त्या टिपणांवरून पर्जन्या विषयीं त्यांनीं केलेलें अनुमान कधीं चुकत नाहीं असा कलकत्त्यास त्यांचा लौकिक सांगतात. सरकारनें पर्जन्यानुमान विद्या साध्य व्हावी ह्मणून जागजागीं शास्त्रज्ञ मोठाले पगार देऊन ठेविले आहेत. त्यांच्या मदतीसाठीं दुर्बिणी व हजारो रुपये किमतीचीं दुसरीं यंत्रें दिलीं आहेत. रोज हिंदुस्थानांतून प्रत्येक ठिकाणाहून हवेच्या स्थितीसंबंधाच्या तारा सरकाराकडे जात असतात, आणि येवढा खटाटोप करून हे शास्त्रज्ञ पर्जन्याविषयीं जीं अनुमानें काढतात तीं बहुधा चुकीचीं ठरून उपहासास पात्र होतात. यापेक्षां सरकारानें श्रीहरदत्तराय सारखीं कांही प्राच्यविद्याविशारद माणसें नोकरीस ठेवून त्यांच्याकडून या आमच्या जुन्या पुराण्या विद्येचें पुनरुज्जीवन करण्याचें श्रेय घेतलें व पाश्चात्य शास्त्राला प्राच्य विद्येची जोड दिली तर केवढें हित होईल.

## इंग्लंडांतले हिंदी विद्यार्थी.

विलायतेस विद्या शिकण्यासाठीं गेलेल्या तरुणांची संख्या शेंकडयांनीं मोजण्यास सुद्धां कठीण जाईल इतकी मोठी आहे. इतक्यांना आपल्या मुठींत ठेवण्यासाठीं सरकारानें एक स्वतंत्र अधिकारी नेमून कांहीं ठराविक व्यवस्था आखून दिली. पण तिच्यामुळें या विद्यार्थी वर्गांत असंतोष माजून त्यांनीं इंडीया कौन्सिलाकडे तक्रारी केल्या वगैरे मागें घडलेली हकीकत सर्वांना श्रुत आहेच या तक्रारींना उत्तर विद्यार्थ्यांचे सरकारी सल्लागार अधिकारी मि. आर्नोल्ड यांनीं आतां प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते ह्मणतात कीं विद्यार्थ्यांचा निष्कारण गैरसमज झालेला आहे. त्यांच्या असंतोषाला जर कांहीं कारणें असलीं तर तीं त्या संस्थेच्या संबंधाचीं नसून स्वतंत्र आहेत. कित्येक शाळा व कॉलेजें इतकीं गच्च भरलीं आहेत कीं त्यांच्यांत अधिक विद्यार्थी घेण्याचें बंद करावें लागलें आहे. कॉलेजच्या उतरण्याच्या बाबी आहेत त्या आहेत. खर्च तर वाढत चालला आहे. तेव्हां त्यांनीं विद्यार्थ्यांना घेण्याचें बंद केलें आहे. कांहीं विद्यार्थ्यांचें नैतिक वर्तन इतकें घाणेरडें असतें कीं त्यामुळें सगळ्या हिंदी विद्यार्थ्यांसंबंधानें विलायतेंतील लोकांचें मन दूषित होतें. अशा वर्तनामुळें कांहीं हिंदी विद्यार्थ्यांना रॉयल ॲग्रिकल्चर कॉलेजमधून १९०९ सालीं हाकून द्यावें लागलें. कित्येक विद्यार्थी मडमाशीं लग्नें करतात, आणि परत जातांना त्यांना इकडेच सोडून जातात. कित्येक विद्यार्थी कॉलेजची फी व व्यापारी लोकांचें किंवा हॉटेलच्या मालकांचें देणें बुडवून चालते होतात. कित्येक विद्यार्थ्यांनीं अलीकडे इंग्रजाविषयींचा आपला द्वेषभाव पूर्णपणें प्रकट केला आहे. हे जर्मन किंवा फ्रेंच विद्यार्थ्यांशीं बोलतील चालतील, पण इंग्रजाशीं नाहीं. अशा कांहीं कारणांमुळें हिंदी विद्यार्थ्यां विषयीं एकंदरीनें फार प्रतिकूळ ग्रह होऊन कांहीं कॉलेजांनीं त्यांना न घेण्याचें ठरविलें आहे पण हिंदी विद्यार्थी असें समजतात कीं हिंदी विद्यार्थ्यांच्या सरकारी खात्यानेंच कॉलेज अधिकाऱ्यांचे कान फुंकून ही मनाई करविली आहे. ही शंका साफ खोटी आहे. परदेशी विद्यार्थ्यांना शिक्षणसंस्थांत घेण्यापासून उद्भवणाऱ्या अडचणींची यत्किंचित ही कल्पना तक्रारी करणारांना आहेशी दिसत नाहीं. या अडचणीमुळेंच जपान, जर्मनी, ईजिप्त, डच वगैरे सरकारांनीं आपापल्या देशातल्या विद्यार्थ्यांवर देखरेख करण्यासाठीं अधिकारी नेमिले आहेत. फ्रेंच सरकारही लवकरच तसें करणार आहे. विलायतेंतील शिक्षणसंस्थांना जरी सरकारांतून द्रव्यसाह्य मिळत असलें तरी त्यांना वाटेल तसे नियम करण्याची स्वतंत्रता आहे. असें असून सुद्धां या संस्था सरकारी अधिकाऱ्यांनीं शिफारस केलेल्या हिंदी विद्यार्थ्यांना शिक्षण संस्थांत घेतात हेच त्यांचे उपकार ह्मटले पाहिजेत. खुद्द इंग्लंडच्या लोकांच्या मुलांना या शाळांतून मनाई होते, आणि शिफारशी व युक्त्या लढविल्या खेरीज त्यांचा तेथें प्रवेश होत नाहीं. हिंदी विद्यार्थी एक तर उशीरा अर्ज पाठवितात आणी जागा मिळाली नाहीं ह्मणजे तक्रार करतात. बरें एकदाची जागा मिळाली तर आपल्या विद्यालयाचा अभिमान न धरतां उठल्यासुटल्या त्याची निंदा करतात. इंग्रज लोकांना आपल्या प्राचीन विद्यालयांचा अभिमान वाटत असल्या मुळें हिंदी विद्यार्थ्यांचा यामुळें त्यांना राग येतो. कित्येक विद्यार्थ्यांच्या मनांतून सिव्हिल सर्विसच्या परीक्षेला जावयाचें असते. पण त्यांचीं खरोखर तितकी पात्रता नसते. तुह्मी त्या भानगडींत पडूं नका असें मी (मि. आर्नोल्ड) त्यांना सांगितलें कीं ते रागावतात. विद्यार्थ्यांवर सरकारी देखरेख ठेवणाराकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सालोसाल वाढत आहे यावरून त्यांच्या विषयींची साशंकबुद्धि सार्वत्रिक नाहीं हें उघड होतें. याप्रमाणें मि. आर्नोल्ड यांनीं आपली बाजू पुढें मांडली आहे. तिच्या वाचनाच्या योगानें येवढेंच सिद्ध होतें कीं विलायतेंतल्या हिंदी विद्यार्थ्यां संबंधाचा प्रश्न त्यांच्यावर देखरेख करणारे आफिसर नेमल्यानें सहज सुटेल असें जें इंडिया कौंसिलच्या अधिकाऱ्यांस वाटत होतें तो त्यांचा निवळ भ्रम होता.

## आधुनिक गुरु.

### अवस्था तिसरी

### शिष्यें हातचीं सुटूं नयेत ह्मणून कांहीं चाली

अंक २७ वरून पुढें चालूं

आपलें वजन जात चाललें आहे असें गुरूस आढळून आलें कीं त्यांची दुसरी एक चाल आहे. त्यांचा आवडता प्रश्न 'कर्ता श्रेष्ठ कां कार्य श्रेष्ठ? उत्तर अर्थातच कर्ता श्रेष्ठ हेंच. यावर लगेच दुसरा प्रश्न. ध्याता श्रेष्ठ कां ध्यान श्रेष्ठ? या पूर्वोक्त प्रश्नांतील सादृश्य भावावरून शिष्य गडबडतो. आणि ध्यात्यास श्रेष्ठत्व देतो. पाळीव कुत्रीं अगर पाळीव रेडे हरवले असतां ते आपल्या धन्याचें ध्यान करतात. मग कुत्रीं धन्यापेक्षां कां श्रेष्ठ नाहींत? कुत्र्यांना सद्गुरुसंगात रहावयाला मिळतें. त्यांस श्रवणही घडतें. मुकुंदराय ह्मणतात— **पशुजनां श्रवणीं घालिशा। तरी कार्यसिद्धी होय तयाशी ॥ सद्भाव देखोनि कृपा करिशी। तरी निर्वाहक पाहिजे '॥** शिष्य निर्वाहक आहे किंवा नाहीं हें आधुनिक गुरु मुळीं तरी पहातात काय? ध्यानापेक्षां ध्याता श्रेष्ठ असें प्रस्थापन करण्यांत ब्रह्म पटवून देणारे ज्ञानी ब्रह्मापेक्षां श्रेष्ठ होत नाहींत काय? परंतु अशा विवेचनानें तीन संवत्सराच्या मुदतींतील जो काळ प्रथमतः शृंखला दृढ करतो तेच उत्तरार्धांत तिला उकलून टाकितो. गुरूंची आत्मश्लाघा एके वेळीं वंचनीय असते तीच पुढें हास्यायन होते. गुरुजी या हास्यायन क्रान्तींत कोंडमारा गुदमरा अनूभवीत असतात. तिसरी चाल शिष्यानें सांप्रदायावर दोष आणिला अशी ओरड करण्याची- गुरूंनीं निर्वाहक पाहिला नाहीं हाही दोष शिष्याचाच गुरूंनीं सद्भाव पाहिला असतो काय? नाहीं. शिष्या भोळसर आहे इतकें मात्र पाहतात. भोळा आहे असें दिसलें कीं त्यास माठाळलाच. मागाहून बसतात त्यास धाक दपटशा देत. हा दोष गुरूंच्या फसवेगिरीचा कां शिष्याच्या सद्भावाचा.

शिष्य फसवेगिरिस कंटाळतो- त्याचा धर्मभोळेपणा त्यास बराच त्रास देतो- ज्या सांप्रदायांत तो खेचला गेलेला असतो त्या सांप्रदायाच्या निंदेस आणि नाराजीस तो भीत असतो- ज्या वर्गांत त्यास त्याचे इच्छेविरुद्ध जबरदस्तीनें सामील केलेलें असतें त्यांतून आपली हाकलपट्टी होऊं नये ह्मणून तो धडपडत असतो. गुरु हें जाणतात. इतकें जाणण्या इतकें त्यांच्यांत कौटिल्य व शहाणपण असतें. तरीपण हरएक गोष्टीस मर्यादा असतेच. लक्ष दशलक्ष मनुष्यांत सारखा द्वेष, सारखें दोषाविष्करण जडेदह बनवून निमूटपणें सहनकरणारा एकतरी शिष्य आढळेल किंवा नाहीं याचा संशयच आहे. बरेच लोक खुशीनें एकांत वासांत गेले आहेत तो त्यांस आवडूंही लागला आहे परंतु ज्यांत मनुष्यांत सांपडणारी किंचित विचारशक्ति असेल किंवा बुद्धिमत्ता असेल तो बारानबारा चोवीस तास एक सारख्या टोंचणीखालीं राहूं शकणार नाहीं. त्यांत ती टोंचणी जर सत् गुरु त्याच्या स्वतःची भार्या आणि घरांतील हेररूपी गुरु पायक्रांत झालेलीं माणसें करीत असतील तर कोणासच सहन होणार नाहीं. मनुष्य अशा प्रकारचा बोजा कधींच अंगावर घेणार नाहीं. जो मनुष्य अशा प्रकारच्या वागणुकींत सुख मानीत असेल व आपला धिक्कार आणि पाणउतारा ज्यांच्यांत आपण मिळून रहावें अशी त्याची इच्छा असते त्यांच्याच कडून होत असून निमूटपणें सहन करीत असेल तर अशा मनुष्याच्या हर्षवैचित्र्याची आह्मांस कींवच येईल. असा कोणी मनुष्य असावा असे जे समजत असतील ते मुक्त अथवा वरील ओवींतील पशुजन असले पाहिजेत. व **" आह्मी गुरु आमचे पासून शिष्यानें विद्या घेतली सबब आह्मी वाकवूं तसें त्यानें वाकलेंच पाहिजे"** असें ह्मणणारा गुरु मुळीं मनुष्यच नव्हे. जो मनुष्य नाहीं तो मनुष्याचा गुरूच होऊं शकत नाहीं. या हेकाडपंतींत बऱ्याच कुटुंबाचे गृहसुखाचा भंग होत असलेला आह्मी पहात आहों. समाजात हें चालू झालें आहे, तें कधीं थांबेल तेव्हां खरें. एक पक्षी मानसिक निष्ठुरता, दुसरे पक्षी मानसिक दौर्बल्य हींच जागजागीं आढळून येतात. असले संबंध तुटतातच तुटतात. पण तुटतांना मानसिक दौर्बल्यावर कसले कसले प्रयोग होतात हें पुढें येईल.

#### उत्तरार्धांत

पूर्वी गुरुजींच्या बऱ्याच चाली सांगितलेल्याच आहेत त्याशिवाय त्यांची एक मुख्य चाल शिष्यांस फालतू पुस्तकें वाचू न देण्याची, शिवाय दुसरी एक चाल ह्मणजे अप्रातिषिद्ध पुस्तकांपैकीं फक्त गुरूबद्दल तळमळ वाढेल तेवढेच भाग वाचवावयाचे, व इतर भागांस फालतू ही संज्ञा देऊन अजिबात गाळावयाचे त्यांतून एक विशेष गोष्ट शिष्यिणीस शिकविलेली असते आणि ती ही कीं नेहमीं गुरूच्या स्वरूपांत मग्न असावें.!!!

आणखी एक रामबाण चाल अशी आहे कीं शिष्यांस इतर गुरूंकडे अथवा कोणत्याही साधुसंतांकडे जाऊं द्यावयाचें नाहीं. अशीच कोठें कोठें अशीही चाल आहे कीं एक ल्हानसा कळप करावयाचा. त्या कळपांतील सर्वांनीं गुरूची स्तुती करीत रहावयाचें. प्रत्येकानें निदान एक एक दोन दोन विधवा नाहीं तर पुरुषें नाहीं तर मुग्ध पण श्रीमान मनुष्य आणून त्याजकडून उपदेश घेववावयाचा. याच्या बद्दल गुरुजींनीं त्याच्या सर्व दोषांवर अष्टरतुभावानें पांघरूण घालावयाचें. बहुत करून सरकारी नोकर शिष्य असतात. ते लांच घेणारे नसतील तर तो गुण दुर्गुणात ढकलतात. घेणारे असतील तर त्याच्या अवगुणाचें समर्थनच केलें जातें. ज्ञान कर्म आणि भक्ति यांची पूर्ण फारकत करून ज्ञान्यास कोणतें ही कर्म बाधक नाहीं असें जाणवून दिलें जातें. हें जाणण्याचा अवकाश कीं ज्यास व्यवहारांत दुर्गुण ह्मणतों ते नुसते पक्के होतात, ऐवढेंच नाहीं, तर ते ज्यांच्यात नसतील त्यांचा छळ होऊं लागतो. आपला समाजच असा आहे कीं आपण ज्यास बरें ह्मणूं त्याचा, आपण लोकांची परवा न ठेवतां निलाजरेपणानें त्याच्या सर्व गुणांचें समर्थन करूं शकतों, व ज्याची निंदा करावयाची असेल त्याची खुशाल एकतर्फी निंदा करूं शकतें. लोकांतील न्याय्यान्याय्यपणाचें धोरण इतकें शिथील झालें आहे. लोकांतील विवेक नष्ट होणें, त्यांच्यात सारासार शून्यता येणें, वाटेल त्या बिलंद्राच्या कक्षेंत छपणें, इत्यादि सहज गुण अशा कळपांत शिरल्यानें आंगीं बाणतात. मग वेदांत पटण्यास अवधीच लागत नाहीं. कारण कळपास गुरु शिवाय दुसरें कांहींच दिसत नसतें. शिवाय ते गुरु कसे ही असले तरी तें समजून पडण्यास मार्गच रहात नाहीं. कोणी कांहीं ही बोलो त्यांचें ऐकूं नये व त्यावर विचार करूं नये. या सर्व चाली अति बिलंदरांच्या. यांच्या हून जरा कमी पोहोंच झालेल्या गुरूंना शिष्यांनीं डायरी ठेवावी लागते. ती दरमहा गुरु बहादुराकडे जाते. जप नाममात्र असतो. परंतु गुरु ध्यान आणि गुरु स्वरूप हीं प्राधान्य असतात. मूर्तिपूजेच्या जागीं फोटोग्राफ आणि कागद पूजा घरोघरीं दिसतात. डायऱ्या, ध्यान, स्वरूपमज्जन, एवढ्या करतांच कीं शिष्यानें दुसऱ्या भोंदूंकडे जाऊं नये. गेल्यास आपोआप कळावें. दुसऱ्या अवस्थेंत हे संबंध कसे तुटतात हें आलेंच आहे. ते तुटण्याबरोबर जरी गुरुमहात्म्य कमी होतें तरी त्या बरोबरच कुटुंबैक्य आणि स्त्रियांचे नैसर्गिक गुण लज्जा, मर्यादा, कोमलपणा, अकैतव इत्यादिही कशीं अस्तंगत होतात हें ही सांगितलेंच आहे. आतां हें वैभव पुनः मिळविण्याकारितां केवळ परोपकार बुद्धीनें गुरु लोक काय उपाय योजितात ते थोडक्यांत सांगतों.

[ अपूर्ण ]

## सर्वधर्मपरिषद

शिकागो येथें कित्येक वर्षांपूर्वी भरलेल्या सर्वधर्मपारिषदेप्रमाणें जपान, सीलोन, व हिंदुस्थान यांत धर्मपारिषदा भरविण्यासंबंधाची व्यवस्था करण्यासाठीं बिलायतेंतल्या युनिटेरियन असोशियन कडून आलेले रे॰ डा॰ संडरलंड यांनीं आपल्या कामासंबंधानें जो रिपोर्ट केला आहे त्यावरून दिवसेंदिवस धर्मौदार्याच्या विस्ताराचें प्रमाण वाढतें आहे असें दिसतें. कांहीं वर्षांपूर्वी हिंदुस्थानांतल्या लोकांना अशी धर्मपरिषद भरविण्याची कल्पनाच रुचली नसती, आणि अजूनही पुण्यातल्या कित्येक विक्षिप्त मंडळीला धर्मज्ञानाचा गड्डा काय तो हिंदुस्थानांतच आहे. विलायतेच्या लोकापासून आह्मी कांहीं एक शिकण्यासारखें नाहीं. असें वाटत असलें, तरी असल्या मंडळीचें विद्वान व सुशिक्षित मंडळींत हंसेंच होतें इतकी स्थिति शिक्षण प्रसारामुळें पालटली आहे. चीन, जपान, सीलोन इ. देशांतही असाच प्रकार दिसतो. जपानांत सध्याचे मुख्य प्रधान कौंट ओकुमा, टोकिओचे मेयर बॅरेन साकाताना व दुसरे प्रमुख व वजनदार गृहस्थ यांचें पूर्ण साह्य या धर्मपरिषदेच्या कल्पनेला मिळालें आहे. चीनमध्यें ही शांघाय येथील इंटर नॅशनल इंस्टिट्यूट नावाच्या एका बड्या संस्थेनें ही परिषद भरविण्याचें पतकरलें आहे. सीलोनमध्यें ही परिषद दोनच दिवस भरेल. तेथें मात्र तिला कोणी वजनदार गृहस्थानें साह्य करूं नये हें आश्चर्य आहे. कारण, सीलोनमध्यें धर्मौदार्य व्यवहारांत तरी इतकें दिसतें कीं एकाच कुटुंबात बाप बौद्ध, आई हिंदु किंवा मूर्तिपूजक आणि मुलगा ख्रिस्ती असे धर्मांचे तीन प्रकार असून हे तिघे ही एका कुटुंबांत सुखानें नांदत असल्याचीं अनेक उदाहरणें आह्मांस प्रत्यक्ष माहित आहेत. हिंदुस्थानांत मात्र ही परिषद चार निरनिराळ्या कोपऱ्यांत ह्मणजे कलकत्ता, मुंबई, मद्रास व लाहोर अशा चार ठिकाणीं भरणार असून डॉ॰ रवींद्रनाथ टागोर डा. जगदीशचंद्र बोस, जस्टिस इमाम, डॉ. सर रामकृष्ण भांडारकर, प्रि. वासवानी, कूचबिहारचे महाराज, बडोद्याचे श्री. गायकवाड सरकार प्रभृतींचें साह्य मिळालें आहे.

## सृष्टीचें संयोग--सौंदर्य.

### [ डाक्टर बॉबिट यांच्या ग्रंथाधारें ]

### ३ एकत्व

अंक २४ वरून पुढें चालूं

उपनिषदांचा असा एक सिद्धान्त आहे कीं एकच सद्वस्तु सृष्टीमध्यें नाना रूपांनीं नटलेली आहे. सर्व विश्वाच्या रचनेच्या मूळाशीं हें एकत्व दिसून येईल. आणि हें एकत्व किंवा एकात्मता विश्वमय आहे. सृष्टींतील सर्व पदार्थमात्रांमध्यें आणि मनास दृग्गोचर होणाऱ्या सृष्टीमध्येंही ती सारखीच प्रत्यक्षानुमेय होते. या एकात्मते मुळेंच सर्व पदार्थमात्र पूर्णत्वास पोहोंचतात, त्यांचें एकीकरण होऊं शकते. ते सर्वच एका मध्याबिंदूभोंवती परिवर्तन करीत असतात. पदार्थ मात्राच्या नानाविध संयोगानें वाटेल ती शरीर रचना बनवितां येते. सृष्टीमध्यें जी एकसारखी अव्याहत वाढ चालली आहे तिचे बुडाशीं हीच एकात्मता वसत आहे. सृष्टीची उत्क्रान्तिच सृष्टीला पूर्णत्वाला नेणारी आहे. तेव्हां एकत्व हें सार्वत्रिक उत्क्रान्ति तत्त्वाचें मूळबीज होय. सृष्टीकडे पाहिलें ह्मणजे दिसून येईल कीं नानाविध मार्गांनीं ही तिची एकात्मता दृश्य होत असते. हा एकात्मतेचा सिद्धान्त सर्व विश्वाचा नियामक असल्यामुळें त्याची कांहीं उदाहरणें पाहूं.

स्फटिकामध्यें निरनिराळ्या पुष्कळ आकृति असतात त्यांत सामान्य आकृति ह्मणजे त्रिकोण हा त्रिकोण जेव्हां समभुज असतो, तेव्हां त्याच्या तीन कोनांचे तीन बिंदु व तिन्ही भुजांतील तीन मध्याबिंदु मिळून या सहा बिंदूंना मध्यवर्ती असा एक निराळाच बिंदु, असतो. स्फटिकामधील षट्कोन आकृति घेतली तर त्याचे दोन मध्यवर्ती बिंदू असतात. कांहीं आकृति अशा असतात कीं त्यांच्या मध्यवर्ती बिंदूंच्या ऐवजीं रेषाच असतात. आणि या मध्यें रेषेमुळेंच दुसऱ्या रेषा समतोल रहातात. वर्तुळामध्यें तर त्याच्या परिघावरच्या अनंत रेषा मध्याबिंदूपासून सारख्या समांतर आकर्षून ठेविलेल्या असतात. असंख्य कोटि वर्तुळांच्या आकृतींनीं बनलेले असे कांहीं सूक्ष्म कृमी असतात कीं ते जेव्हां एकत्र बसूं लागतात तेव्हां त्यांचा समूह पर्वतप्राय दिसतो. वृक्षाच्या पानाची आकृतिही असेंच एकत्व स्थापित करिते. पानाच्या ज्या असंख्य बारीक शिरा असतात त्यांचा केंद्र एका बिंदूंतच असतो. कांहीं कांहीं पानांच्या शिरा तर इतक्या सूक्ष्म व संलग्न असतात कीं त्या प्रत्येक शिरेच्या आकृतीला एक एक निराळा

मध्यबिंदु असतो आणि अशा सर्व मध्य बिंदूंचा एक निराळा मध्यबिंदु असतो. कांहीं शंखाच्या आकृति तर घुमटासारख्या असून त्यांचा मध्यबिंदु अगदीं शिरोभागीं असतो. कांहीं पानें व फुलें हीं एकदम एखाद्या मध्य भागांतून अशीं बाहेर निघतात कीं त्यांच्या त्या रूपरेषा अगदीं मनोहर दिसतात. निवडुंग फुलतो तेव्हां त्या फुलांचा गर्भतंतु इतका दर्शनीय होतो कीं त्याच्या भोंवतालच्या पाचपांचशें केसरांच्या रांगाच्या रांगा त्याला वेष्टून विलक्षण शोभा आणितात.

वृक्षाचीं पानें, त्यांच्या शाखा, त्याचा मोहोर हीं जेव्हां एकत्र पहावीं तेव्हां त्यांच्या त्या आकृतींमध्यें मध्यबिंदु कसे खुलतात, त्यांच्या सौंदर्याच्या रेषा वृक्षाची वाढ किती अद्भुत तऱ्हेची डोळ्यासमोर उभ्या करितात, आणि एका सामान्य पर्णामध्यें देखील किती विलक्षण आकृति, वर्तुळें व अर्धवर्तुळें एकत्र झालीं असतात हें क्षणभर वनस्पतीच्या सृष्टीकडे दृष्टी फिरविली असतां तत्काळ कळून येण्यासारखें आहे. मूळची एकच आकृति अनंत सौंदर्यमय आकृतींना प्रसवते आणि सर्व सृष्टी हृदयंगम करिते. या सर्वांचें मूळ गूढ एकात्मता हें होय. हीं पानें, गवतें किंवा फुलें इतक्या विलक्षण तऱ्हांनीं वाढत असतात तथापि पृथ्वीच्या पृष्ठ भागावर उभें सरळ वाढण्याचा त्याचा धर्म हा सर्व वनस्पतींच्या सृष्टीचें एक सामान्य लक्षण किंवा या लक्षणद्वारा तिची दिसून येणारी तिची एकात्मता समजून घेणें अत्यंत मौजेचें होय. एखाद्या प्रच्छाय जुनाट व अतिविस्तृत अशा वटवृक्षाकडे जर आपण नजर फेंकली तर कितीतरी एकएक वस्तूंचें हें सुंदर निराळें भुवनच बनलें आहे अशा विस्मयानें मनुष्य अगदीं थक्क होऊन जाईल.

मनुष्यदेहाकडे जर ही एकत्वाची दृष्टि फिरविली तर असें आढळून येईल कीं या शरीर रचनेंत सहस्त्रावधि केंद्रें आहेत. त्यांतील कांहीं मुख्य केंद्रापैकीं मास्तिष्क व पृष्ठवंश हे आहेत कारण त्यांच्या ताब्यांत सर्व मज्जातंतूंचें साम्राज्य आहे. आणि हृदय हें एक तसेंच दुसरें मुख्य केंद्र असून त्याच्या सत्ताश्रीनें सर्व रक्तवाहिन्या आपापलें काम बिनचूक करीत असतात.

सृष्टीमध्यें आंदोलन, स्फुरण, पतन, पुरःसरण आदिकरून ज्या निरनिराळ्या गती दृष्टीस पडतात त्या सर्व गणिताच्या सिद्धान्तानें बांधिलेल्या आहेत. कांहीं गति लाटांची आकृति रेखाटतात, कांहीं दीर्घ वर्तुळाकार चालतात, कांहीं अंडाकृती प्रमाणें दिसतात, कांहीं शंकु प्रमाणें दिसतात, कांहीं गोपुच्छाप्रमाणें रचना दर्शवितात. इत्यादि गती नानाविध आहेत खऱ्या पण त्यांची वर्गवारी केली असता त्या गतींची दिशा गणिताच्या सिद्धान्ताप्रमाणें एकएक निरनिराळी ठरलेली आहे.

वृत्तदर्पणांतील भिन्नाभिन्न वृत्तें पहा अगर गायनकलेंतील निरनिराळे राग घ्या. त्या सर्वांना नियामक मात्रारचना, गणरचना किंवा स्वररचना असते. त्यांचे आरोह व अवरोह हेही नियमित टप्याचे असतात. गाण्याला जी मधुरता येते ती त्या गाण्यांतील मुख्य स्वर व त्याला बहार आणणारे दुसरे संयुक्त स्वर यांच्या एकतानतेनेंच होय.

तर्क शास्त्रांत देखील मुख्य नियम असा आढळतो कीं त्यामध्यें एखादी गृहित कल्पना किंवा सिद्धान्त असतो. आणि बाह्य उदाहरणांवरून ती गृहीत गोष्ट सिद्ध करण्याची एक पद्धत किंवा ही गृहित गोष्ट बाह्य गोष्टींना कसकशी लागूं पडते हें दाखविण्याची दुसरी पद्धत. आणि सर्व विद्यांमध्यें आणि कलामध्यें त्यांच्या ओजस्वितेचें मुख्य लक्षण हेंच कीं त्यांचीं सर्व महारत्नें एका सूत्रांत ग्रथित किंवा संकलित केल्यामुळें तीं परस्पर शोभादायक होतात.

प्रकाश सुद्धां सूर्यासारख्या एखाद्या तेजस्वी गोलापासून असंख्यात रश्मींनीं बहिःस्फूट होतो. जी गोष्ट सूर्याला लागूं तीच अगदीं सामान्य दीपासही तशीच लागूं पडते.

सर्व वर्ण जेव्हां एकवटतात तेव्हां त्यांचा संयुक्त रंग ह्मणजे शुभ्र वर्ण होय. आणि स्फटिकामधून अगर इन्द्रधनुष्यामधून हे नानावर्ण पृथक पृथक असे दिसतात तरी देखील ते एकमेकांत इतके एकजीव झालेले असतात कीं त्यांच्या त्या निरनिराळ्या छटांचा नवा समुदायच दृष्टीस पडतो.

गुरुत्वाकर्षण ही सर्व स्थूल सृष्टीची मुख्य शक्ति होय. ही आकर्षणशक्ति अगदीं नियमबद्ध आहे. आणि ह्मणूनच भूगोल आपल्या भोंवतीं फिरत असतां ही त्यावरील सर्व वस्तु एकसारख्या डोलत असून तितक्याच स्थिरहि आहेत. या आकर्षणशक्तीनें सर्व वस्तुजात एका विवक्षित मध्यबिंदूकडे ओढला जातो आणि या शक्तीच्या सांखळ्या हि अगणीत आहेत परमाणू जेव्हां संलग्न होतात तेव्हां त्यांच्या या संसक्तिनें घन पदार्थ स्थूल आकाराचे होतात आणि या परमाणूंच्या संसक्तीनें प्रवाही पदार्थ वर्तुळाकार बनतात पण गुरुत्वाकर्षण शक्तीनें परमाणूंच्या राशींचे निरनिराळे गोल बनतात आणि ते गोल ह्मणजे बुध, शुक्र, गुरु, शनि, प्रजापती, वरुण इत्यादि ग्रहाप्रमाणें कोट्यावधि मैलांच्या अंतरावरून आपआपल्या सूर्याभोंवतीं निरानिराळ्या कक्षा करून फिरते राहतात. हा आपला सूर्य एवढा मोठा खरा परंतु खगोलवेत्त्यांच्या दृष्टीनें तो या अखील चराचर अनंत कोटी ब्रह्मान्डांत एखाद्या सामान्य परमाणू प्रमाणेंच आहे. आपल्या सूर्यासारखे कोट्यावधि सूर्य नुसत्या एका आकाशगंगेच्या फन्यामध्यें दृश्यमान आहेत. हे सर्व सूर्य आपापल्या सूर्यमाले सह निराळ्याच एका केंन्द्राभोंवतीं फिरत असतात. तेव्हा सारांश हा कीं सर्व वस्तुजातीला फिरविणारा एकएक नियामक असतो. आणि हा नियामक ओळखून काढणें हीच खरी दिव्य दृष्टी होय.

स्थूल सृष्टीला जसा हा एकत्वाचा सिद्धान्त लागू पडतो तसा मनःसृष्टीमध्यें हि एकत्वाचा नियम आढळून येईल. बाह्य ज्ञानेंद्रियांना किंवा कर्मेंद्रियांना जशी सर्व स्थूल सृष्टी गम्य आहे तसें मन आदिकरून अंतःकरणांनीं बहिष्करणा प्रमाणेंच व्यापार चालवितां येतात. बाह्य सृष्टीच्या शद्बांनीं या अंतर सृष्टी विषयीं मनुष्य पुष्कळदां उद्गार काढीत असतात. याचें बीज तरी दोहों मध्यें जो एकत्वाचा अबाधित सिद्धान्त दिसून येतो तोच होय. उदाहरणार्थ, आपण ह्मणतों कीं जसें अग्नीचें तेज तसें मनोविकाराचेंही तेज होय. सूर्याच्या प्रकाशाला अनुरोधून आपण ज्ञानाच्या प्रकाशाकडे बोट करितों. सुंदर स्वरसंयोग ऐकून किंवा हृदयंगम रंगांचा मिलाफ पाहून आपण ह्मणत असतों कीं फलाण्या गृहस्थाच्या मनोवृत्ति कितीतरी सुंदरशा एकवटल्या आहेत. मनाच्या कित्येक विचार सरणीला आपण प्रशान्त व गंभीर ह्मणतों. एखाद्याचे कान हरणाप्रमाणें गायनलोलुप व [illegible] आहेत; तसेंच, डोळ्या विषयी बोलताना ते पाणीदार व तेजस्वी आहेत असें आपण ह्मणतों. फार तर काय कांहीं शद्ब अन्तःकरण होरपळून टाकतात किंवा अन्तःकरण आनन्दानें उचंबळून आलें असेंही ह्मणण्यांत येतें. सारांश मन व शरीर हीं एकात्मतेच्या धोरणावर सारखीं चालतात व त्याचा परस्पर संबंधही तसाच आहे. आणि तो इतका दृढ आहे कीं पुष्कळदा मनाच्या गोष्टी पाषाणाला ही कवींनीं लावून दाखविल्या आहेत. जसें उत्तररामचरितांत "अपि ग्रावा रोदिति" इत्यादि. सर्व सृष्टीमध्यें ही एकात्मता असल्या कारणानें ज्ञात पदार्थावरून अज्ञात पदार्थाविषयीं आपणाला अनुमानें काढितां येतात आणि सर्व ज्ञानाच्या अभिवृद्धीमध्यें हेंच तत्व गोंवलेलें दिसून येईल.

## आकाशवाणी.

एकनाथ माहाराजांनीं ह्मटलें आहे–

**" कीं भेटतो देव ह्मणुनी काय लोकांस सांगावा "**

आह्मांस तर आकाशवाणी झाली होती, परंतु आह्मी झालों तरी मनुष्यच. आमचे हातून जी चूक झाली होती ती ही कीं, संतोपदेश विसरून जाऊन आह्मी ती वाणी जशीच्या तशीच लोकांस कळविली. कलियुगांत मंत्रसामर्थ्य नष्ट होत चाललें आहे, प्रजा दिवसें दिवस आचारभ्रष्ट होत चालली आहे. षड्दर्शनें काय किंवा वेदवेदांगें ह्मणजे काय हें ज्यांस ऐकून देखील माहीत नाहीं असे लोक देवाची स्पर्धा करून राहिले आहेत. मनुस्मृति ६/३७ मध्यें पुढील सिद्धांत सांपडतो;

अनधीत्य द्विजो वेदाननुत्पाद्य तथा प्रजाम्।
अनिष्ट्वा चैव यज्ञैश्च मोक्षमिच्छन् व्रजत्यधः॥

या सिद्धांताकडे दुर्लक्ष करून वाटेल तो मनुष्य राक्षसी संपत्तीचा आश्रय घेऊन मोक्षार्थी किंवा मोक्षकांक्षी होतो. इतकेंच नाहीं तर सगुण उपासना मार्गांतील देवताचा अपमान करून त्यास तुच्छ मानतो. अशा कालांत कोणास आकाशवाणी झालीच तर तीवर भरंवसा तरी ठेवावा कोणी? त्यांत ज्या गोष्टी गुह्य ठेवावयाच्या अशा पैकीं एक गोष्ट, आह्मी प्रगट करून चुकलों होतों. यामुळें आह्मास झालेली आकाशवाणी यथार्थ होते किंवा नाहीं याबद्दल शंका वाटू लागली होती. परंतु अद्याप निदान आकाशवाण्याचें तरी तेज नष्ट झालें नाहीं हें खास. शिवाय आमचे निदर्शनास हेंही आलें कीं, जी वाणी अन्यथा ठरेल ती आकाशवाणीच नव्हे. तसेच जरी कांहीं चुकाही झाल्या असल्या तरी ज्यास आकाशवाणी होतेच त्यांवर देवता कोप करून त्या वाणीस अयथार्थत्व आणीत नाहींत. आमचा दोष इतकाच होता कीं आह्मांस झालेली आकाशवाणी आह्मी प्रगट केली. परंतु तिचा लाभ आमचे बरोबर आमच्या मित्रमंडळीस मिळावा या उदात्त हेतूशिवाय आमचा ती प्रगट करण्यात अन्य हेतु असताच तर ती खरीच झाली नसती अशी आह्मास पूर्ण खात्री आहे.

## अभिनंदन.

मध्य प्रांताला कौंसिल मिळून त्या कौंसिलांतील वऱ्हाड तर्फेच्या सभासदांच्या जागेकरितां उभे राहिलेल्या उमेदवारांचीं नांवें बाहेर पडतांच वऱ्हाडांतील बहुतेक लोकांच्या मनांची ओढ त्या उमेदवारापैकीं अगदीं योग्य अशा रा. ब. मुधोळकर, रा. ब. दामले व रा रा. अण्णा साहेब जोशी यांच्या निवडणुकीकडे जावी यांत नवल नाहीं. इच्छा शक्ती (Will power) चा जोर काहीं कमी नसतो! बऱ्याच लोकांच्या सदिच्छा एकत्र झाल्याव त्यांचा इष्ट परिणाम झाल्यावांचून बहुतेक रहात नाहीं. त्याप्रमाणें रा० ब० मुधोळकर हे म्युनीसिपालिट्यांतर्फे व रा० ब० दामले डिस्ट्रिक्ट बोर्डांतर्फे बहुमतानें कौंसिलदार निवडून आल्याची खुश खबर गेल्या आठवड्यांत आली आहे. उभयतां, राव बहादारांचें त्यांच्या या बहुमानाच्या जागेंत ते यशस्वी झाल्याबद्दल आह्मी मनःपूर्वक अभिनंदन करून आपल्या जागाची जबाबदारी ओळखून लोकहितार्थीं कामें चोखरीतीनें बजावण्याची सद्बुद्धि व आयुरारोग्य त्यांस ईश्वरानें द्यावें अशी त्याचेपाशीं अनन्य प्रार्थना करितों! बाकी राहिलेल्या जमीनदारांच्या तर्फेच्या जागी ही वरील नियमानुसार रा० रा० अण्णासाहेबच निवडून येतील व पुढील अंकीं त्यांचेंही अभिनंदन करण्याची गोड कामगिरि करण्याचा प्रसंग येईल अशी आह्मी आशा करितों.

## आगगाडी

### (वऱ्हाडच्या कौंसिलची ट्रेन)

वऱ्हाड तर्फेच्या सभासदांची आगगाडी जणूं काय तयार होऊन उभी आहे! तिला फक्त एंजिन जोडावयाचें राहिलें आहे. रा. ब. मुधोळकर, व रा. ब. दामले हे दोन्ही ब्रेक आपलीं कामें चांगल्या रीतीनें बजावतील. रा. ब. दामले निर्लोभ निस्पृह आहेत किंबहुना क्रिकेट मधील एखादा खेळाडू जोरांत येणाऱ्या चेंडूला थांबविण्याला मोठा खंबीर असतो तशा पद्धतीचे हे मुत्सद्दी आहेत. रा. बा. मुधोळकर हे तर घाट ब्रेकासारखे भक्कम आहेत किंवा जहाज न डगमगूं देणाऱ्या दांडग्या नांगरासारखे आहेत. पण या दोहोंच्या कार्याला चांगली गति देणारें असें भक्कम एंजिन पाहिजे. रा. रा. जोशी हे जेव्हां कामतील तेव्हां त्यांच्या प्रासादिक कल्पना, कार्य प्रज्वलित करण्याची धमक व यशःश्री मिळविण्याची ओजस्विता ही वरील जोड गोष्टींच्या कार्याला नवा नवा जोम आणतील अशी आह्मांस उमेद आहे.

# वऱ्हाडवृत्त

**हवामानः**—गेल्या आठवड्यात हवा फार चमत्कारिक होती. सकाळीं आकाश आभ्राच्छादित असून दुपारीं तीन चार वाजतां जरासें सूर्यदर्शन होऊन फिरून सायंकाळ पासूनच अगर रात्रीं आठ नऊ वाजेपासून पावसाची झिमांझम अगर निदान मुरमुर तरी सुरू असे. कालचे रविवारीं किंचित् उघाड पडून हवा बरी झाली. हवेंत गारठा असून वारा मधून मधून जोराचा वहात आहे निंदणीचें काम जिकडे तिकडे जारीनें सुरू आहे. पिकाची स्थिती उत्तम आहे. रोगराई विशेष नाहीं. एकंदर पाऊस १२ इंचांवर झाला आहे!

रा. रा. एफ्. ए. आर. सॅपाकिन्स, असिस्टंट सुपरिंटेंडेंड ऑफ पोलिस, इलिचपूर सबडिव्हिजन्, जिल्हा उमरावती यास त्यांनीं चार्ज दिल्या तारखेपासून हिंदुस्थान सरकार, होमडिपार्टमेंटच्या मातहात दिल्यामुळें त्यांचे जागीं रा. रा. ए. पी. जॅक्, आसि. डि. सु. पोलिस, हुशंगाबाद, यांस इलिचपर सबडिव्हिजनला बदलण्यात आलें आहे.

खानबहादुर हाफीजमहमद विलायतुल्ला यांनीं वाशीम सबडिव्हिजनचा चार्ज घेतला ह्मणजे रा. रा. इ. सी. गिबसन, आय. सी. एस. असिस्टंट कमिशनर, वाशीम, यांस आकोला जिल्ह्याला नेमण्यांत आलें आहे

रजेवरून परत आल्यावर रा. रा. मूलचंद शुकल, मुन्सीफ, नरसिंगपूर मध्यप्रांत यांस वऱ्हाडांत मेहकर येथें नेमण्यांत आलें.

रा० रा० मूलचंद शुकल यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला ह्मणजे रा० रा० धुंडिराज विश्वनाथ पराजपे यास त्याच कामावर वाशीम येथें बदलण्यात आलें.

रा. रा. एच. सी. ग्रीनफील्ड, आय. सी. एस. असिस्टंट कमिशनर उमरावती, यांस वऱ्हाडांतील जमिनीच्या हक्क नोंदणीच्या कामावर नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. सी. के. सीमन आय. सी. एस. असिस्टंट कमिशनर आकोला, यांस मॅजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार देण्यात आले आहेत.

श्रीमती कुमारी जी. एम्. ब्राउटन्, सीनिअर इंस्पेक्ट्रेस ऑफ् स्कूल्स मध्यप्रांत, यांस ता. १ सप्टेंबर १९१४ किंवा त्या वेतील त्या तारखेपासून एक महिना आणि वीस दिवसांची हक्काची रजा देण्यांत आली असून त्यांचे जागीं श्रीमती कुमारि डी० कॉक्वियर, असिस्टंट इंस्पेक्ट्रेस ऑफ स्कूल्स नागपूर यांस ऑफिशिएटिंग इंस्पेक्ट्रेस स्कूल्स मध्यप्रांत नेमण्यांत आलें आहे.

---

## नोटीस

विद्यमान सिनियर सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टांत

कि. टी. मु. नं. ७ पे. ता. १९-८-१४

१९१४

भागीरथीबाई जवजे रामचंद्र डोणगांवकर हल्लीं रा. मलकापूर } अर्जदार.

अर्ज— सक्सेशन सर्टिफिकिट मिळण्याकारितां.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार इनें आमचे कोर्टांत सक्सेशन सर्टिफिकिट मिळण्या करितां तारीख ९ ५-१४ रोजीं अर्ज दाखल केला आहे. सदर्हू अर्जाच्या चौकशीची तारीख १९-८ १९१४ नेमली आहे. तरी ज्यांची कांहीं पण अर्जाविरुद्ध तक्रार असेल त्यांनी आमचे कोर्टांत १९-८-१४ रोजीं समक्ष १० वाजतां हजर व्हावें तसें न केल्यास अर्जदार इजला सर्टिफिकिट दिलें जाईल मग कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाहीं. आमच्या सहीशिक्यानिशी असे.

R. N. Trivedi.

सिनियर सबजज्ज , आकोला.

नो. नं. १६

---

## नोटीस

सन १८६५ चा हिन्दुस्थानांतील वारस्याचा अक्ट कलम २९०, किंवा सन १८८१ चा प्रोबेट आणि अडमिनिसट्रेशन ॲक्ट कलम ६९ अन्वयें हुकूम.

विद्यमान डिस्ट्रिक्ट जज्ज यांचें कोर्ट मुक्काम आकोला

कि. दिवाणी मुकदमा नंबर ४९ सन १९१४ इसवी. अर्जदार

बडी मर्द सुकदेव लोहार रा. आकोला.

विषयः—मयत सुकदेव याचा बेवारस माल मिळण्याबद्दल.

ज्या पेक्षां मयत सुकदेव
बापाचें नांव शिवराम
जात लोहार राहणार आकोला
तहसिल आकोला जिल्हा आकोला
याचा बेवारस माल मिळण्यासाठीं वरील अर्जदार इने या कोर्टास अर्ज केला आहे व सदर्हू अर्जाची चौकशी या कोर्टांत तारीख १० माहे आगष्ट सन १९१४ इ० रोजीं आकोला येथें करण्यांत येईल,

त्यापेक्षां ज्याचा मयत सुकदेव मजकूर याच्या मालमत्तेवर आपल्या हक्क संबंधा विषयीं दावा असेल त्या सर्व लोकांस या लेखानें नोटीस देण्यात येत आहे कीं, त्यानें सर्वांनीं कोर्टांत हाजर राहून प्रोबेट दिले जाण्यापूर्वी जी कारवाई करण्यांत येइल ती पाहावी,

आज तारीख १४ माहे जुलै सन १९१४ इ० रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली

शिक्का.

G. W. Bapat
A. D. J.
for
डि. जज. आकोला

नो० नं० १७

---

## नोटीस

नोटीस बेशमी सखाराम वा॥ हरी माळी रा० वाडेगांव ता० बाळापूर यांसीः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येत आहे कीं तुमची मुलगी पार्वती ही माझी मोहुर्ताची बायको असून मोहुर्तास तीन वर्षे झालीं. तेव्हां तिजला माझे घरीं तुह्मी सारखे वर्षभर राहू दिले नाहीं व आतां तर अगदीच तुह्मी आपले घरीं ठेऊन घेतले पाठवीत नाहीं. ही तुमची रीत चांगली नाहीं. आह्मी तिजला मोहुर्ताचे वेळीं कांहीं आटक शेतीबद्दल कबूल केली परंतु ती जर न नादली तर ती कबुली रद्द असे. सर्व पंचाचे समक्ष झाले करितां नोटीसीनें कळविण्यांत येत आहे, नोटीस पावतांच आमचे बायकोस पाटवून द्यावं न पाठविल्यास मग आह्मास सरकारतर्फे तजवीज करणें भाग आहे हें पक्कें समजावें कळावें. ता० २२।७।१४

सही

हीरामण महादेव याची निशाणी
दस्तुर कृष्णाजी केशव
नो. नं. १८

---

## नोटासि

नोटीस बेशमी रा. रा. बळीराम वल्द नागोजी जात कुणबी उमर वर्ष ९३ धंदा शेतीचा राहणार आकोली व टाकळी प्रो माना पो० कामरगांव तालुके मुर्तिजापूर जि० आकोला यांसी:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझ्या जवळून मजला थापा देऊन प्रॉमेसरी नोट रुपये ५०० पांचश्याची तारीख १८।३।१४ इ० रोजीं आकोले मुक्कामीं नारायण हरी नळेगांवकर याचे हातून लिहून घेतली आहे. त्या प्रॉमेसरी नोटचे रुपये तुह्मी मजला मुळींच दिले नाहींत व या पूर्वीं माझ्या जवळून एक करारनामा साधे कागदावर लिहून घेतला आहे. तो करारनामा पांडुरंग सखाराम पटवारी रा० आकोली ता॥ मुर्तिजापूर यांचे हातचा आहे. असे दोन्ही दस्तऐवज माझ्या जवळून तुह्मी मजला फसवून लिहून घेतले आहेत. ही तुमची लबाडी मजला प्रॉमेसरी नोटचे रुपये दिले नाहींत त्याजवरून माझे लक्षात आली. आतां या नोटिशीनें कळविलें जातें कीं माझ्या नांवचे वर लिहिलेले दोन्ही दस्तऐवज ही नोटीस पोहचले तारखे पासून च्यार दिवसाचे आंत मजला परत करावे. तसें न केल्यास सदरहू दोन्ही दस्तऐवज बातल असून ते वापस घेण्या करितां रितीप्रमाणे तजवीज करणें भाग पडेल व मग तुमचेवर ह्या नोटिसीचा व एकंदर कारवाईचा खर्च भरून घेतला जाईल कळावें तारीख २३ माहे जुलै सन १९१४ इसवी.

सही

तुकाराम वा॥ श्यामाजी दस्तुर खुद
टाकळी खुर्द पो॥. कामरगाव

नो. नं. १९

---

## नोटीस

पार्वती मर्द हीरामण माळी रा० वाडेगांव ता० बाळापूर यांसीः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येत आहे कीं तूं माझी मोहुर्ताची बायको असून मोहुर्त लावल्यास तीन वर्षे झालीं. तेव्हा पासून तूं सारखी च्यार महिने माझे घरीं राहिली नाहीं. व आतां तर गावात माहेर असल्यामुळें अगदी बापाचेच घरीं जाऊन बसलीस यास्तव माझे घराचा फारच खराबा केला. सबब नोटीसीनें कळवितों कीं नोटीस पावतांच माझे घरीं यावे. पुनः बापाचे घरीं जाऊं नये. मोहुर्ताचे वेळीं मी ज्या ज्या गोष्टी कबूल केल्या होत्या त्या तूं न नांदल्यास त्या गोष्टी तुजला मिळणार नाहींत असें त्याच वेळीं सांगितले व तूंही कबूल केले कीं मर्जीप्रमाणें न वागल्यास मग काहींच लागणार नाहीं यामुळें आपला विचार पाहावा. पुढें मी सरकार तर्फे तजवीज करीन. तुझे बापावर सुद्धा गैर काम केल्या बद्दल काम चालवीन हें पक्कें समजावें कळावें ता. २२।७।१४

द० वामन रामचंद्र सही

नो.नं २० हीरामण माहादेव याचे हातची

---

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. रावजी सखाराम पाटील साहु दुकान मौजे तित्रोज पो. शेगाव त. खामगांव व जी. बुलडाणे यांस खाली सही करणार सोनाबाई मर्द नामदेव पा॥. दुधाळे तर्फे मालक नामदेव वा॥. जैराम पाटील रा. दुधाळे यांजकडून कळविण्यात येते कीं तुह्मी आह्मास तारीख ७-२-१९११ ई. रोजीं दीडहजारचें १५०० पुर्जे दोन करून देवून व्याज दरमाहा दरशेकडां ०१२ आणे प्रॉ॥. करून रकम संमत १९६८ चे पौष शु॥ ५चे देण्याचे करार केले परंतु अद्याप आह्माला आपण फक्त रुपये २५० वसूल दिलें बाकी रकम ऐन रुपये १२५० व आज पावेतोंचे व्याज तुमचेंकडे येणें आहे तर आपणास रकम मागितली असतां आठ दिवसानीं देतों पंध्रा दिवसानी देतों अशा थापी दिल्या. करितां या नोटीशीनें जाहीर करितो कीं नोटीस पावल्या पासून १५ पंध्रादिवसाचे आंत आमची रकम व्याजासुद्धां देवून आमचे हातची पावती घ्यावी व तुमचे पुर्जे चीत करून घेऊन जावे तसें नकेल्यास आह्मी कोर्टांत फिर्याद करून रकम वसूल घेवू त्याचा कोर्टखर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावे तारीख २३-७ १४ ई. सही

नामदेव जैराम पा॥ राहणार
दुधाळे दस्तुर खुद पो. हाथरूण

नो. नं. २१

---

## मुद्दाम अगोदर हें वाचावें.

शेंकडों लोकांस गुण आला आहे. काळजीसारखा दुसरा रोगच नाहीं. कांहो, इतकी काळजी कां करतां. तुमची इच्छा हीच आहेना? व्यापारांत फायदा व्हावा नोकरींत बढती मिळावी, परीक्षा पास व्हावी, संतति व्हावी, कर्जमुक्त व्हावें, घरांत कलह, होऊं नये, शरीरांत सौख्य व्हावें, कोणतीही बाधा होऊं नये, इतक्या गोष्टी बद्दल काळजी करण्यास नको असेल तर प्रसिद्ध मांत्रिक माणिकप्रभु येथील रामचंद्र तात्या ह्यांचा **जगप्रसिद्ध अद्भुत ताईत** जवळ ठेवा. ह्मणजे सर्व गोष्टी मनाप्रमाणें होतील ताईताचे गुणाची ह्या देशांत व परदेशांत ख्याति आहे. अनुभव घेऊन पहावा. गुण न आल्यास पैसे परत मिळतील. कोणतीही शंका घेऊं नका. कोणते वर्तमान पत्रावरून मागणी केली हें कळवावें- नंबर १ चा ताईत ह्याची किंमत रुपये ८ - नंबर २ चा ताईत किंमत रुपये ४ - नं. ३ चा ताईत किंमत रु. १। ट. व्ही पी. खर्च ०५ आणे. नंबर १ च्या ताईता पासून १५ दिवसांत गुण येईल. नंबर २ च्या ताईतापासून एक महिन्यात गुण यईल. नं. ३ च्या ताईत गुण २ महिन्यानीं येईल. जशी जरूरी असेल त्याप्रमाणें मागणी करावी

पत्ताः—वासुदेव रावजी लेले

नो. नं. २२ मिरज.

| | | |
|---|---|---|
| तांबूल नवरत्न | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| नवरत्न टेबलेट | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| नवरत्न तमाखु | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| मद्रासी नस | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| गजकर्णाचें मलम | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| केश काढण्याचें तेल | केंश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| चन्द्रकान्त बाम | मेंदूला व डोक्याला आत उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट– चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार– आकोला.

नो. नं. ११



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १३



## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4½ CRORES.

VESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80,05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32 356 |
| 1903 | 41,07,009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C.P. Berar & Khandesh,*
NAGPUR.

N. No. 12



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी साळ्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे ॲनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

घरमा सायरप

कमरयाही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १४



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

### आयोडाईज्ड सार्सापारिला.



हा सार्सापारिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वच संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १९


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवमाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## खोकला.

क्षयाखेरीज असलेला कितीही जोरदार खोकला ४।५ दिवसांत बरा होतो. क्षयाचा खोकला मात्र १२ दिवसांत बरा होतो. या विकारावर या गोळ्या कधीच मागें हटल्या नाहींत. असें चवदा वर्षांच्या अनुभवानें सांगतों. २० गो० ड० किं० १ रुपया.

## वज्रदंती मलम.

या मलमानें अनेक प्रकारच्या जखमा, खरूज, कंडू वगैरे विकार तावडतोब नाहींसे होतात. तसेंच स्त्रियांचे स्तनास व्रणरोग असता, त्यास देशपरत्वें अनेक नांवें आहेत. तो विकार या मलमानें इजा न होतां तावडतोब बरा होतो. मलम ड. १ रु.

## कॉलरा ( पटकी. )

हा विकार घामीचा आहे, व तो केव्हां होईल याचाही नेम नसतो. याकरितां या गोळ्यांचा संग्रह सदोदित जवळ असला पाहिजे. कारण औषध संग्रही नसेल तर मरण येतें. कारण पटकी हा विकार ३ तासांचा असतो; असा सर्वत्रांचा अनुभव आहे. तरी ही पटकी हटकून बरी करण्याविषयीं आमच्या गोळ्या केवळ रामबाण आहेत. रोगी कसाही बेजार असो, या गोळ्यांचा उपयोग करितांच रोगी खात्रीनें उतरतो, असा सर्वत्र अनुभव आहे. तरी या गोळ्यांचा प्रत्येकानें अवश्य संग्रह करावा. २० गो० ड० किंमत २ रुपये.

## वातनाशक गोळ्या व तेल.

वातविकारानें या देशांत पुष्कळच बेजार आहेत. तरी आमच्या गोळ्या व तेल यांनीं सर्व प्रकारचे वातविकार, अंगास कळा येऊन अंग दुखणें, आमवात, शिरागत, सन्निवात, अर्धांगवायु इ० विकार फार जलद बरे होतात. ३० गो०ड० किं० २ रु० व ८ ताळे तेल बा० ३ रु० एकूण ५ रु०

## कर्णव्रणनाशक अपूर्व तेल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें पू, रक्त व पाणी वाहणें, ठणका, सूज, कंडू, दाह, कोणत्याहा प्रकारचे कानातील व्रण वेदना इ० विकार कितीही वयाचे मनुष्यास कोणत्याही कारणानी प्राप्त झालेले असाध्य व्रण इजा न होतां फारच जलद बरे होऊन बधिरता नाहींशी होते. १। भार तेलाची बाटली किं० १ रु.

## स्त्रियांची धुपणी.

( तांबडी व पांढरी मिश्र ) व तत्संबंधी अशक्तता, पांडुरता व कृशता इ० विकार असाध्य असले तरी खात्रीनें व जलद बरे होऊन शरीर मजबूत व सतेज बनतें. अनुभवानें पूर्ण खात्री होईलच. २० गो० ड० किं० १ रु.

## स्त्रियांचा बाळंतरोग नाशक, पेंडसे यांचें नारळाचें पोईतील रामबाण औषध.

या रोगानें हजारों स्त्रिया ओषध असून, केवळ हयगयीनें मृत्युमुखांत पडत आहेत. या रोगावर वरील गोळ्या खरोखरच प्रतिज्ञेच्या आहेत. रोग कितीही जुनाट व जोरदार असला तरी तज्जन्य विकारांसह तावडतोब बरा होऊन, शरीर निरोगी व मजबूत होतें. क्षयादि जोरदार रोगही यानें त्वरित बरे होतात. ३० गो. ड. किं. ४ रु. रोग सात दिवसांत हटकून नाहींसा होतो.

## मलशुद्धीचें अप्रतिम चूर्ण.

या चूर्णाच्या सेवनानें पहिल्या दिवसापासून मलशुद्धि [illegible] लागते. बद्ध [illegible]

## अत्यंत खात्रीचीं औषधें.

| औ. नांव. — औ. गुण | दर तोळ्यास किं. रु. |
|---|---|
| वसंतकुसुमाकर—पूर्णपौष्टिक व धातुज्वर, जीर्णज्वर, मेह, क्षय, इ० ना० | १५ |
| लघुमास्लिनीवसंत—नेत्ररोग, अग्निमांद्य, व जीर्णज्वर इ० ना० .... | १॥ |
| सुवर्णराजवंगेश्वर-वीर्यवर्धक, पौष्टिक व धातुविकार, पर्मा, धुपणी इ. ना. | ६ |
| पंचामृतपर्पटी—ग्रहणी, अतिसार, बाळंतरोग, इ. ना. व पूर्ण शक्तिवर्धक | ४॥ |
| महायोगराजगुगुळ—पक्षघात, अर्धांगवायु आमवात, अग्निमांद्य, रजोदोष व मोठाल वायु, इ० ना० .... ... .... .... | ४ |
| शूलकुठार पोटशूल, कफवात अग्निमांद्य व संग्रहणी इ० ना० ... | २ |
| अग्निकुमार—शूल, वायु, अजीर्ण, अग्निमांद्य व संग्रहणी इ० ना० ... | १ |
| गोक्षुरादिगुग्गुल—प्रमेह, धुपणी व मूळव्याधी इ० ना० .... ... | १ |
| त्रिभुवनकीर्ति—हिमज्वर, खोकला व अनेक ताप इ० ना०... .... | १॥ |
| स्मृतिसागर रस—अपस्मार, उन्माद व भ्रम इ० ना० .... .... | ५ |
| गंधकरसायन—[९६पुटी] सर्व कुष्टें वातरक्त व वायु इ. ना. व रक्तशोधक | ४ |
| गंधकरसायन [ १२ पुटी ]—कुष्ट, वात व अग्निमांद्य इ० नाशक व रक्तशोधक. .... .... .... .... ... | १ |
| गुळवेलीचें सत्व—धातुविकार, वांति मुलांची खर, जीर्णज्वर, दाह, पित्तरोग इ० ना० व शक्तिवर्धक १ तो० .... .... .... | ।· |
| रौप्यभस्म—उरःक्षतक्षय, पांडु, यकृत्, सूज, खोकला, वायु इ० नाशक व अत्यंत पौष्टिक .... .... .... .... | ६ |
| तीक्ष्णलोहभस्म ( शतपुटी )—मूळव्याधि, कृमि, प्लीहा, वायु, पांडु, शूल, मेह, व क्षय, इ० ना० व पूर्ण पौष्टिक .... .... | ९ |
| ताम्रभस्म—अग्निमांद्य, गुल्म, उदर, शूल व कवळ इ० ना० .... | ४ |
| अभ्रकभस्म [ शतपुटी ] क्षय, वात, मधुमेह, श्वास, कास इ० ना० .... | १५ |
| अभ्रकभस्म सहस्रपुटी—पांडु, भगंदर, सूज, खर व धातुविकार इ०ना. | ४० |
| मौक्तिकभस्म – क्षय, मेह, धुपणी, कडकी, जीर्णज्वर इत्यादि नाशक व पूर्ण धातुवर्धक .... .... .... .... .... | १० |
| प्रवाळभस्म—[ सूर्यपुटी ]—खर, जीर्णज्वर, पित्त, मेह इ० ना० .... | २ |
| मंडूरभस्म-[ शतपुटी ] क्षय, ग्रहणी, कामला, अतिमांद्य, ज्वर व पांडुरोग, इ० ना० .... .... .... .... | २ |
| मंडुरभस्म—अशक्तता, पांडुरोग, ग्रहणी व अतिसार इ० ना० .... | २ |
| सुवर्णमाक्षिकभस्म-पित्तविकार, खर, पांडु, कामला, धातुविकार इ० ना० व पुष्टिवर्धक .... .... .... .... .... | २ |
| मदनकामेश्वर—धातुस्तंभक व पौष्टिक .... .... .... | १॥ |
| लाक्षातैल—हनुस्तंभ, त्वग्वात, अर्दित, आमवात, जडत्व इ०ना०५तो० | १ |
| महानारायण तैल—पक्षघात, संधिवात, आमवात, त्यांचे सर्व उपद्रव व इतर मोठमोठे वायु यांजवर अप्रतिम २ तो. ... .... | १ |
| सीतोपलादि चूर्ण—क्षय, खोकला, दाह, जीर्णज्वर व अशक्तता इत्यादि नाशक २ तोळ्यास .... .... .... .... | -॥- |
| बदामपाक—धातुवर्धक, पौष्टिक व मेह प्रदर [ धुपणी ], क्षय, पांडु, इत्यादि नाशक ८० तोळे. .... .... ... .... | ४ |
| सालंमिश्री पाक—अति शक्तिवर्धक व क्षय, कडकी, मुलांची खर, मेह इत्यादि नाशक ८० तो. .... ... .... .... | ४ |
| गोक्षुर [गोखरू] पाक—धातुविकार, पांडु, धुपणी, कडकी व मूळव्याधि इत्यादि नाशक ८० तो. .... ... .... ... | ६ |
| जीरकपाक [जीरेपाक]—जीर्णज्वर, मेह, कडकी व प्रदर इत्यादि नाशक [illegible] | [illegible] |
| दशमूलारिष्ट—मूत्रविकार, ग्रहणी, क्षय, अम्लपित्त, दमा, खोकला, अरुचि, पांडुरोग, वायु, वांति, धुपणी इ० ना० वीर्यवर्धक आणि ८० तो० .... .... .... .... .... | ५ |
| खादिरारिष्ट—सर्व कुष्टें, खरूज, गजकर्ण, वातरक्त, विसर्प व सूज इ० ना० ८० तो० ... .... .... .... | ४ |
| द्राक्षारिष्ट—उरःक्षत, कंठरोग, दमा, खोकला, अग्निमांद्य व मलावरोध इ० नाशक व पौष्टिक ८० तो० .... .... ... | [illegible] |
| विडंगारिष्ट—गळवें, अश्मरी, गुल्म, मेह, भगंदर, गंडमाळा, कफ, दमा व खोकला इ० ना० व पौष्टिक ८० तोळे .... .... | [illegible] |
| कचोऱ्याचें सत्व—मूत्रविकार, कृमि, दाह, उन्हाळे, धातुविकार व जीर्णज्वर इ० ना० १ तो०.... .... .... .... | ८= |
| शंखद्राव—गुल्म, उदर, अग्निमांद्य, कवळ व वायू, इ. साधारण रोगनाशक १ तोळ्यास. १ रुपया. | |
| शंखद्राव—[ फार मोठा ] उदर, गुल्म, कवळू, व अजीर्ण इ० जोरदार रोगावर १ तोळ्यास .... .... .... .... | ३ |
| प्रसारिणी तेल—पंगु, खंज इ० नानाविध वायूंवर २॥ तोळे. .... | १ |
| निर्गुंड्यादितेल-सूज, गृध्रसीवायु व कोणत्याही प्रकारचें इतर वायु इ. ना. ८ तो. | १ |
| गजकर्ण—खरूज, नायटे, किडवळ, आगपैण २ तो० पुडीस .... | ·।≠ |
| दंतबलवर्धक पूड—ही दातांस चोळल्यानें दंतसंबंधी पु, रक्त, कीड, व्रण इ० विकारांवर ड० किं० .... .... .... | ·।= |
| विंचवाचें विष—विंचवाचे विषावर रामबाण, ड० किंमत.... .... | -॥- |
| वातरक्तपित्ती—[महाव्याधी] विसर्प, सुनबाहिरी व कुष्ट रोगावर वस्ताद ३० तोळ्यासचे डबीस किंमत ३ रु. व मलम १ रु. मिळून किं. | ४ |
| वृषणवृद्धि [ अंतर्गल ]—वर खात्रीच्या गोळ्या व मलम. दोन्हींचा उपयोग एकदम करावा. २४ गो.ड. १॥रु. व मलमास ८ आ. मि. | २ |
| मधुमेहनाशक अप्रतिम गुटिका—मधुमेहाशिवाय धातुविकारही या औषधानें बरे होतात. ६० गो. ड. ... ... ... | ४ |
| अपूर्व नेत्रांजन—वडस, बिंदु, फुलें, कांच, साहरा, मोर, गळती, इत्यादि जुनाट रोगांवर अपूर्व गुणकारी. १॥ तो. अंजनाची डबीस. .... | १ |
| मगजशुद्धि-कापशांचे तेलाचें अप्रतिम बर्फ—नेत्रविकार, मस्तकशूल, इत्यादि दुःसाध्य रोगावर अचुक गुणकारी ड० किं० .... | १ |
| दम्यावरील गोळ्या—वाटेलतसा दमा, श्वास, कास यांवर तावडतोब गुण देणारे २० गो. ड. ... ... .... ... | १ |
| हेमधात्रीतैल—हें सुगंधी तैल अनेक वनस्पतींच्या अर्कांनीं तयार केलें आहे. मस्तक, डोळे, तळहात व तळपायांची आग इ० विकारावर खात्रीनें गुणकारी आहे. बा. किंमत .... ... ... | १॥ |

## विशेष सूचना व व्यवस्था.

आमच्या आर्यवैद्यकाची श्रेष्ठता व त्यांतील औषधांचा अनुभव सर्वत्रांस कळावा म्हणून आमची औषधें आम्हीं विशेष परिश्रमानें; मोठ्या प्रमाणावर अति उत्तम तयार करून, मुद्दाम खालील सवलतीनें देण्याची व्यवस्था केली आहे. सवलतीची मुदत १५ दिसेंबर १९१४ पासून १५ फेब्रुवारी १९१५ पर्यंतच ठेविली आहे. त्याचे आंत प्रत्येकानें सवलतीचा फायदा घेऊन, आपल्या आर्यवैद्यक पद्धतीनें तयार केलेली औषधें [illegible] खात्री करून घ्यावी. आमच्या औषधांची प्रसिद्धी सर्वत्र पूर्वीपासूनच झाली

Regd. NO N. 150
वऱ्हाडसमाचार.

## खोकला.

क्षयाखेरीज असलेला कितीही जोरदार खोकला ४।५ दिवसांत बरा होतो. क्षयाचा खोकला मात्र १२ दिवसांत बरा होतो. या विकारावर या गोळ्या कधीच मागें हटल्या नाहींत. असें चवपा वर्षांच्या अनुभवानें सांगतों. २० गो० ड० किं० १ रुपया.

## वज्रदंती मलम.

या मलमानें अनेक प्रकारच्या जखमा, खरूज, कंडू वगैरे विकार तावडतोब नाहींसे होतात. तसेंच स्त्रियांचे स्तनास व्रणरोग असता, त्यास देशपरत्वें अनेक नांवें आहेत. तो विकार या मलमानें इजा न होतां तावडतोब बरा होतो. मलम ड. १ रु.

## कॉलरा ( पटकी. )

हा विकार घामीचा आहे, व तो केव्हां होईल याचाही नेम नसतो. याकरितां या गोळ्यांचा संग्रह सदोदित जवळ असला पाहिजे. कारण औषध संग्रहीं नसेल तर मरण येतें. कारण पटकी हा विकार ३ तासांचा असतो; असा सर्वत्रांचा अनुभव आहे. तरी ही पटकी हटकून बरी करण्याविषयीं आमच्या गोळ्या केवळ रामबाण आहेत. रोगी कसाही बेजार असो, या गोळ्यांचा उपयोग करितांच रोगी खात्रीनें उतरतो, असा सर्वत्र अनुभव आहे. तरी या गोळ्यांचा प्रत्येकानें अवश्य संग्रह करावा. २० गो० ड० किंमत २ रुपये.

## वातनाशक गोळया व तेल.

वातविकारानें या देशांत पुष्कळच बेजार आहेत. तरी आमच्या गोळ्या व तेल यांनीं सर्व प्रकारचे वातविकार, अंगास कळा येऊन अंग दुखणें, आमवात, शिरागत, संधिवात, अर्धांगवायु इ० विकार फार जलद बरे होतात. ३० गो०ड० किं० २ रु० व ८ ताळे तेल बा० ३ रु० एकूण ५ रु०

## कर्णव्रणनाशक अपूर्व तेल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें पू, रक्त व पाणी वाहणें, ठणका, सूज, कंडू, दाह, कोणत्याही प्रकारचे कानांतील व्रण वेदना इ० विकार कितीही वयाचे मनुष्यास कोणत्याही कारणानी प्राप्त झालेले असाध्य व्रण इजा न होतां फारच जलद बरे होऊन बधिरता नाहींशी होते. ११ भार तेलाची बाटली किं० १ रु.

## स्त्रियांची धुपणी.

( तांबडी व पांढरी मिश्र ) व तत्संबंधी अशक्तता, पांडुरता व कृशता इ० विकार असाध्य असले तरी खात्रीनें व जलद बरे होऊन शरीर मजबूत व सतेज बनतें. अनुभवानें पूर्ण खात्री होईलच. २० गो० ड० किं० १ रु.

## स्त्रियांचा बाळंतरोग नाशक, पेंडसे यांचें नारळाचें पोईतील रामबाण औषध.

या रोगानें हजारों स्त्रिया औषध असून, केवळ हयगयीनें मृत्युमुखांत पडत आहेत. या रोगावर वरील गोळ्या खरोखरच प्रतिशिच्या आहेत. रोग कितीही जुनाट व जोरदार असला तरी तज्जन्य विकारांसह तावडतोब बरा होऊन, शरीर निरोगी व मजबूत होतें. क्षयादि जोरदार रोगही यानें त्वरित बरे होतात. ३० गो. ड. किं. ४ रु. रोग सात दिवसांत हटकून नाहींसा होतो.

## मलशुद्धीचें अप्रतिम चूर्ण,

या चूर्णाच्या सेवनानें पहिल्या दिवसापासून मलशुद्धि मूळ [illegible] गते. बद्ध कोष्ठता, अजीर्ण, मोडशी, अरुचि, [illegible] वि विकार त्वरित जाऊन भरपूर अन्न पचूं लागतें. सं [illegible] र ध्यानांत ठेवण्याची गोष्ट हीच कीं, याच्या सेवनानें को [illegible] ठा साफ नसल्यानें जे दुःसाध्य विकार होतात ते कधींही प्राप्त होत [illegible] । अमूल्य गुण आहे. ५ तो० चूर्ण किं० १ रु०

संस्कृत मूळ व मर [illegible] सह किं ५ मु. [illegible]

## क्षुधावर्धक अप्रतिम गुटिका.

या सेवन केल्यानें सात दिवसांत अजीर्ण, मळमळ, अरुचि, साधारण ज्वर, पोट फुगणें, मलावरोध इत्यादि विकार जाऊन भूक चांगली लागते, ढेंकरा नाहींशा होतात. सर्वप्रकारें प्रकृति उत्तम होते. ३० गो. ड. किं. १ रुपया.

## कुटुंबरक्षणीआर्यवनौषधपेटिका.

आमचा कारखाना आज सतत २५ वर्षे सुरू असून, आमचे कारखान्यांतील औषधें अत्यंत गुणकारी ठरल्यामुळें आमच्या औषधांचा खप या देशांत व इतर भागीं फारच होत आहे; ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. आमचा मुख्य उद्देश देशी औषधांचा प्रसार करणे हाच असल्यामुळें, कित्येक खेड्यापाड्यांत देशी औषधें मिळण्याची सोय नसते व इतर वैद्यही मिळण्याची पंचाईत, यामुळें नेहमीं होणारे रोगांस औषधें न मिळाल्यामुळें त्यांस दुःख भोगावें लागतें ही दुःखद स्थिति दुर व्हावी व देशी औषधें खेड्यापाड्यांतही मिळावीं इतक्याच सद्हेतूनें आम्ही सर्व रोगहारक छोटा दवाखाना ऊर्फ प्रवासी पेटी बनविली आहे. ही पेटी उत्तम सागाची बनविली असून तशीच उत्तम मजबूतही केलेली आहे व तींत सर्व औषधें उत्तम ठेवावयाची व्यवस्था केलेली आहे. यामुळें नेहमीं प्रवासांत ही पेटी पाहिजे त्या ठिकाणी नेता येते.

### भाग १.

या पेटींत उपदंश, प्रमेह, ताप, दमा, खोकला, रेचक गोळया, पटकी, आमांश, वातरोग, पित्तावर, कफरोग, वातविध्वंस, वंग, लोह, प्रवाळ, मंडूर, माक्षिक, वसंत, विंचु, सर्पदंश, दंतरोग, गजकर्ण, मगजशुद्धि, मदनामृतसंजीविनी, व्रणरोग, व सुगंधी अत्तर अशी २६ औषधें या पेटींत आहेत. या पेटीची किंमत ५ रुपये व पोष्ट खर्च १२ आणे पडेल.

## स्वदेशी वनौषधी सार्सापरेला.

आम्ही महाप्रयासानें अनेक वनस्पतीचे अर्कांपासून, हा सार्सापरिला तयार केला आहे व तो आपल्या गुणाबद्दल जगप्रसिद्धही आहे. प्रमेह [ पर्मा ], उपदंश [ गर्मी ], जीर्णज्वरापासून अंगांत मुरलेली कडकी, शरीरांत असलेली भयंकर उष्णता इत्यादि अनेक कारणांनी रक्त तप्त होऊन तें दूषित होतें व असा रक्ताचा बिघाड झाल्यानें सर्वांगास कंडू, खरूज, व्रण, नायटे, इत्यादि रक्तदोषांपासून होणारे विकार उत्पन्न होतात. कचित् प्रसंगीं अशारीतीनें बिघडलेल्या रक्तापासून महाव्याधीसारखा भयंकर विकारही उत्पन्न होता. याकरितां वरील कारणांपासून किंवा अन्य कोणत्याही कारणापासून ज्याचें रक्त अशुद्ध झालें असेल त्यांनीं रक्तशुद्धीकरितां आमच्या या अप्रतिम सार्सापरिल्याचा अवश्य उपयोग करावा. रक्तशुद्धि करणारीं आजकाल जीं काहीं औषधें आहेत, त्या सर्वांत आमचा हा अचूक गुणकारी सार्सापरेला फारच अप्रतीम ठरला आहे. वरील रक्तदोषापासून होणारे रोग टाळण्याकरितां व अशुद्ध रक्ताची शुद्धि करण्याकरितां याचा अवश्य उपयोग होतो, याची खात्री लाखो ग्राहकांस झालेली असून याच्या अप्रतीम गुणाबद्दल लाखो सर्टिफिकिटें मिळालीं आहेत. उत्तम गुणास ४ बाटल्या लागतात. दर बाटलीस किंमत १ रुपया. एकदम ४ बाटल्या घेणारांस पोष्ट खर्च माफ. इतरांस पोष्ट खर्च ५ आणे निराळा पडेल.

## अत्यंत खात्रीचीं औषधें.

| औ. नांव. | औ. गुण दर तोळ्यास | किं. रु. |
|---|---|---|
| वसंतकुसुमाकर | पूर्णपौष्टिक व धातुज्वर, जीर्णज्वर, मेह, क्षय, इ० ना० | १५ |
| लघुमालिनीवसंत | नेत्ररोग, अग्निमांद्य, व जीर्णज्वर इ० ना० .... | १॥ |
| सुवर्णराजवंगेश्वर | वीर्यवर्धक, पौष्टिक व धातुविकार, पर्मा, धुपणी इ. ना. | ६ |
| पंचामृतपर्पटी | ग्रहणी, अतिसार, बाळंतरोग, इ. ना. व पूर्ण शक्तिवर्धक | ४॥ |
| महायोगराजगुगुळ | पक्षघात, अर्धांगवायु आमवात, अग्निमांद्य, रजोदोष व मांठाळ वायु, इ० ना० .... ... .... .... | ४ |
| शूलकुठार | पोटशूल, कफवात अग्निमांद्य व संग्रहणी इ० ना० ... | २ |
| अग्निकुमार | शूल, वायु, अजीर्ण, अग्निमांद्य व संग्रहणी इ० ना० ... | १ |
| गोक्षुरादिगुग्गुल | प्रमेह, धुपणी व मूळव्याधी इ० ना० .... ... | १ |
| त्रिभुवनकीर्ति | हिमज्वर, खोकला व अनेक ताप इ० ना०... .... | १॥ |
| स्मृतिसागर रस | अपस्मार, उन्माद व भ्रम इ० ना० .... .... | ५ |
| गंधकरसायन | [९६पुटी] सर्व कुष्टें वातरक्त व वायु इ. ना. व रक्तशोधक | ४ |
| गंधकरसायन | [ १२ पुटी ]—कुष्ट, वात व अग्निमांद्य इ० नाशक व रक्तशोधक. .... .... .... .... ... | १ |
| गुळवेलीचें सत्व | धातुविकार, वांति मुलांची खर, जीर्णज्वर, दाह, पित्तरोग इ० ना० व शक्तिवर्धक १ तो० .... .... .... | ·।· |
| रौप्यभस्म | उरःक्षतक्षय, पांडु, यकृत्, सूज, खोकला, वायु इ० नाशक व अत्यंत पौष्टिक .... .... .... .... | ६ |
| तीक्ष्णलोहभस्म ( शतपुटी ) | मूळव्याधि, कृमि, प्लीहा, वायु, पांडु, शूल, मेह, व क्षय, इ० ना० व पूर्ण पौष्टिक .... .... | ९ |
| ताम्रभस्म | अग्निमांद्य, गुल्म, उदर, शूल व कवलु इ० ना० .... | ४ |
| अभ्रकभस्म [ शतपुटी ] | क्षय, वात, मधुमेह, श्वास, कास इ० ना० .... | १५ |
| अभ्रकभस्म सहस्रपुटी | पांडु, भगंदर, सूज, खर व धातुविकार इ०ना. | ४० |
| मौक्तिकभस्म | क्षय, मेह, धुपणी, कडकी, जीर्णज्वर इत्यादि नाशक व पूर्ण धातुवर्धक .... .... .... .... .... | १० |
| प्रवाळभस्म | [ सूर्यपुटी ]—खर, जीर्णज्वर, पित्त, मेह इ० ना० .... | २ |
| मंडूरभस्म | [ शतपुटी ] क्षय, ग्रहणी, कामला, अतिमांद्य, ज्वर व पांडुरोग, इ० ना० .... .... .... .... | २ |
| मडुरभस्म | अशक्तता, पांडुरोग, ग्रहणी व अतिसार इ० ना० .... | २ |
| सुवर्णमाक्षिकभस्म | पित्तविकार, खर, पांडु, कामला, धातुविकार इ० ना० व पुष्टिवर्धक .... .... .... .... .... | २ |
| मदनकामेश्वर | धातुस्तंभक व पौष्टिक .... .... | १॥ |
| लाक्षातैल | हनुस्तंभ, त्वग्वात, अर्दित, आमवात, जडत्व इ०ना०५तो० | १ |
| महानारायण तैल | पक्षघात, संधिवात, आमवात, त्यांचे सर्व उपद्रव व इतर मोठमोठे वायु यांजवर अप्रतिम २ तो. ... .... | १ |
| सीतोपलादि चूर्ण | क्षय, खोकला, दाह, जीर्णज्वर व अशक्तता इत्यादि नाशक २ तोळ्यास .... .... .... .... | -॥- |
| बदामपाक | धातुवर्धक, पौष्टिक व मेह प्रदर [ धुपणी ], क्षय, पांडु, इत्यादि नाशक ८० तोळे. .... .... ... .... | ४ |
| सालंमिश्री पाक | अति शक्तिवर्धक व क्षय, कडकी, मुलांची खर, मेह इत्यादि नाशक ८० तो. .... ... .... .... | ४ |
| गोक्षुर [गोखरू] पाक | धातुविकार, पांडु, धुपणी, कडकी व मूळव्याधि इत्यादि नाशक ८० तो. .... ... .... ... | ६ |
| जीरकपाक [जीरेपाक] | जीर्णज्वर, मेह, कडकी व प्रदर इत्यादि नाशक ८० तोळे .... .... | ३॥ |
| कुमार्यासव | अति पौष्टिक, पाचक व उदर, वायु, गुल्म, शूल, अग्निमांद्य, ग्रहणी इत्यादि नाशक ८० तोळे... ... .... | ४ |
| नारायण तेल | अनेक वायुनाशक ८ तो. .... ... .... | १ |
| शंखभस्म | शूल, यकृत्, गुल्म, अतिसार, वायु व कवलु इ० ना० .... | ·॥· |
| हरितालभस्म | कुष्ट, ज्वर, व व्रण इ० ना० .... .... .... | २ |
| वंगभस्म | प्रमेह, उरःक्षत, पांडु, खर इ० ना० व शक्तिवर्धक .... | २ |
| नागभस्म | क्षय, कुष्ट, इ० ना० व शक्तिवर्धक .... ... | २ |
| मोठावातविध्वंस | माठाल्या सर्व वायूंवर पूर्ण गुणकारक... .... | ४ |
| लवंगादिवटी | खोकल्यावर वस्ताद .... .... .... ... | -॥- |
| वज्रक्षार | [नं. २] प्रदर, सूज, गुल्म, कवलु, अजीर्ण व शूल इ. ना. २तो. | ·॥· |
| ग्रहणीकपाट | ग्रहणी, अतिसार व मलवरोध इ० नाशक... .... | १॥ |
| समीरपन्नग | अनेक वायु, महाश्वास, ज्वर, खोकला व दमा इ. ना.... | ६ |
| नागामृतगुटिका | कस्तुरी, मिश्र—ज्वर, शैत्य व सन्निपात इ. ना. .... | ४ |
| बोलबद्धरस | धुपणी, मूळव्याधि व रक्तप्रमेह इ० ना० .... ... | २ |
| चंद्रप्रभा | धुपणी, प्रमेह, क्षय, पांडु मूत्रकृच्छ्र इ० ना० .... .... | २ |
| घोडागोळी | सर्वरोगहारक ... ... .... .... | ४ |
| सूतशेखर | आम्लपित्त, गुल्म, शैत्य, वांति, श्वास, व कास इ. ना. ... | ५ |
| पिप्पल्यासव | गुल्म उदर, क्षय, संग्रहणी, व पांडु इ. नाशक ८० तो. | ३ |
| हेमगर्भ | वायु, कफ, श्वास, अतिसार, क्षय, खोकला, शूल, इ० ना० | १५ |
| रससिंदूर | दमा, खोकला कफ, महाश्वास, ज्वर, वायु, क्षय, प्रमेह, कवलू, शूल संग्रणी, व वांति, इ० नाशक व पौष्टिक... ... | ३ |
| सुवर्णमालिनीवसंत | जीर्णज्वर, क्षय, पांडु, कडकी, अशक्तता व धुपणी इत्यादि नाशक.... .... .... .... ... | ७ |
| महामृत्युंजय | सर्व ज्वरनाशक. .... .... .... .... | २ |
| श्वासकुठार | श्वास, कास, उचकी व कफ इत्यादि नाशक. .... | २ |
| आनंदभैरव | खोकला, अतिसार, शैत्य व कफ इत्यादि नाशक. ... | १॥ |
| प्रतापलंकेश्वर | वायु, बाळंतरोग, कफ व सन्निपात इत्यादि नाशक. .... | २ |
| बृहत्शंखवटी | शूल, अजीर्ण, वात व पोट फुगणें इत्यादि नाशक. .... | २ |
| योगराजगुग्गुल | आमवात, संधिवात, व त्वग्वात इत्यादि नाशक. .... | १ |
| प्रदररिपु | धुपणी व मूळव्याधी इत्यादि नाशक व रक्तशोधक. .... | ६ |
| कालकूट रस | ज्वर व सन्निपात इत्यादि नाशक. .... .... | ५ |
| डाळिंबपाकगुटिका | अतिसार, रक्तातिसार इत्यादि नाशक. .... | -॥- |
| कुडेपाकगुटि | ग्रहणी व अतिसार इत्यादि नाशक. .... .... | -॥- |
| लघुवातविध्वंस | वायु, ग्रहणी, कृमि व शूल इत्यादि नाशक. .... | १ |
| द्राक्षासव | ग्रहणी, उरःक्षत, क्षय, पांडु, अतिसार, खोकला, इत्यादि नाशक ८० तोळे. ... .... .... .... | ४ |
| बालसूर्योदय | सन्निपात, वांति, मेह, पांडु इ० ना० .... ... | ६ |
| लक्ष्मीविलास | पौष्टिक व क्षय, उन्माद, व्रण व पांडु इ० ना० .... | १५ |
| सुदर्शन चूर्ण | सर्व ज्वर, ज्वराचे उपद्रव, जीर्णज्वर इ० ना० ४ तो० | ·॥· |
| हिंग्वादिचूर्ण | पोटदुखी, वायु, अग्निमांद्य व अरुचि इ० ना० ८ तो० | ·॥- |
| त्रिफलादि चूर्ण | पांडुरोग, कामला व मलावष्टंभ, नेत्ररोग, धातुविकार इ० ना० ८ तो० .... .... .... .... | -॥· |
| कुटजारिष्ट | संग्रहणी, आमविकार, कास, ज्वर, अग्निमांद्य, अरुचि व बालरोग इ० ना० ८० तो० .... .... .... | ३॥ |
| प्लेगवर गुणकारी रामबाण औषध | डबीची किं. १॥ मलम -॥- मिळून | २ |
| दशमूलारिष्ट | मूत्रविकार, ग्रहणी, क्षय, अम्लपित्त, दमा, खोकला, अरुचि, पांडुरोग, वायु, वांति, धुपणी इ० ना० वीर्यवर्धक आणि ८० तो० .... .... .... .... .... | ५ |
| खादिरारिष्ट | सर्व कुष्टें, खरूज, गजकर्ण, वातरक्त, विसर्प व सूज इ० ना० ८० तो० ... .... .... .... .... | ४ |
| द्राक्षारिष्ट | उरःक्षत, कंठरोग, दमा, खोकला, अग्निमांद्य व मलावरोध इ० नाशक व पौष्टिक ८० तो० .... .... .... | ४ |
| विडंगारिष्ट | गळवें, अश्मरी, गुल्म, मेह, भगंदर, गंडमाळा, कफ, दमा व खोकला इ० ना० व पौष्टिक ८० तोळे .... .... | ४ |
| कचोऱ्याचें सत्व | मूत्रविकार, कृमि, दाह, उन्हाळे, धातुविकार व जीर्णज्वर इ० ना० १ तो०.... .... .... .... | ८= |
| शंखद्राव | गुल्म, उदर, अग्निमांद्य, कवलु व वायू, इ. साधारण रोगनाशक १ तोळ्यास. १ रुपया. | |
| शंखद्राव | [ फार मोठा ] उदर, गल्म, कवलू, व अजीर्ण इ० जोरदार रोगावर १ तोळ्यास .... .... .... .... | ३ |
| प्रसारिणी तेल | पंगु, खंज इ० नानाविध वायूंवर २॥ तोळे. .... | १ |
| निर्गुंड्यादितेल | सूज, गृध्रसीवायु व कोणत्याही प्रकारचें इतर वायु इ. ना. ८ तो. | १ |
| गजकर्ण | खरूज, नायटे, किडवळ, आगपैण २ तो० पुडीस .... | ·।= |
| दंतबलवर्धक पूड | ही दातांस चोळल्यानें दंतसंबंधी पू, रक्त, कीड, व्रण इ० विकारांवर ड० किं० .... .... .... | ·।= |
| विंचवाचें विष | विंचवाचे विषावर रामबाण, ड० किंमत.... .... | -॥- |
| वातरक्तपित्ती | [महाव्याधी] विसर्प, सुनबाहिरी व कुष्ट रोगावर वस्ताद ३० तोळ्यासचे डबीस किंमत ३ रु. व मलम १ रु. मिळून किं. | ४ |
| वृषणवृद्धि [ अंतर्गल ] | वर खात्रीच्या गोळ्या व मलम. दोन्हीचा उपयोग एकदम करावा. २४ गो.ड. १॥रु. व ममलमास ८ आ. मि. | २ |
| मधुमेहनाशक अप्रतिम गुटिका | मधुमेहाशिवाय धातुविकारही या औषधानें बरे होतात. ६० गो. ड. ... ... ... | ४ |
